म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र.

REFBK-0002551

मराठी सातव्या इयत्तेंतील मुलांच्या उपयोगाकरितां
मुद्दाम लिहिलेले

—नागरिकत्वावरील—

प्राथमिक पाठ.

जनसेवा ही ईश्वर सेवा, तत्त्व निरंतर मनीं धरा,।
'ईश्वर म्हणजे प्रेम' वाक्य जें पढला तें जगिं खरें करा ॥

लेखक

पद्मेश्वर शिवराम निंबकर,

बी. ए., एस्. टी. सी. डी.,

असि० डे० ए० इन्स्पेक्टर, पुणें.

[सर्व हक्क लेख

REFBK-0002551

आहेत.]

REFBK-0002551

के १८४६] [इ. स. १९२४

किंमत आठ आणे.

प्रकाशकः—महेश्वर शिवराम निंबकर,
५६३ सदाशिव पेठ, पुणें शहर.

मुद्रकः—अनंत सखाराम गोखले,
'विजय प्रेस', ५७० शनवार, पुणें.



अनुक्रमणिका

पाठक्रम	पाठाचें नांव	पृष्ठ
१	आमचा देश	१
२	मुंबई इलाखा	४
३	आमचें तात्त्विक ध्येय	६
४	आमचा समाज...	८
५	हिंदुस्तानचा नागरिक	१०
६	ब्रिटिश साम्राज्य	१३
७	साम्राज्यांतर्गत स्वराज्य	१५
८	जबाबदार राज्यपद्धति	१७
९	ब्रिटिश साम्राज्यामध्यें हिंदुस्तानचा दर्जा ...	१९
१०	साम्राज्यापासून होणारे फायदे	२१
११	ब्रिटिश सम्राट्	२३
१२	इंग्लंडची राज्यव्यवस्था	२५
१३	भारतमंत्री व त्याचें कौन्सिल.	२८
१४	हिंदुस्तानसरकार	३०
१५	हिंदुस्तानसरकारचें बजेट	३२
१६	हिंदुस्तानसरकारचें लष्कर	३४
१७	रेल्वे	३६
१८	पोस्ट व तारखातें	३९
१९	पोस्ट व तारखातें (पुढें चालू)	४१
२०	कायदेमंडळें	४३
२१	स्टेट कौन्सिल	४५
२२	लेजिस्लेटिव्ह असेंब्ली	४७
२३	मुंबई प्रान्तिक सरकार	४९

देण्याचा प्रसंग येतोच. बरें, जे लोक आज मतदार आहेत त्यांना तरी आपल्या जबाबदारीची जाणीव कोठें आहे ? कोणत्याही निवडणुकीमध्यें पाहिलें तर प्रतिनिधींची निवड लायकीपेक्षां ओळखीमुळें जास्त झालेली दिसेल. जर मतदारवर्ग आपलें काम बरोबर करील तरच मिळालेल्या स्वराज्याच्या हप्त्यापासून लोकांचें हित होईल.

मतदार लोकांस शिक्षण दिल्याखेरीज ते तयार होणार नाहींत. त्यांस शिक्षण देण्याचे मार्ग अनेक आहेत. उमेदवार निवडणुकीच्या वेळेला जीं व्याख्यानें देतात त्यामुळें मुख्यतः हें शिक्षण मिळतें. परंतु दोनचार उमेदवारांचीं कांहीं थोडीं व्याख्यानें वर्ष दोन वर्षांनीं झाल्यानें हें शिक्षण पूर्ण होणें शक्य नाहीं. त्याकरितां शाळांतून प्रयत्न झाला पाहिजे. हल्लीं इतिहास व भूगोल या विषयांच्या जोडीला थोडी राज्यकारभाराची माहिती देण्यांत येते. क्रमिक पुस्तकांमधून नागरिकत्वाला पोषक असे कांहीं धडेही आहेत. परंतु तेवढ्यानें नागरिकत्वाचें शिक्षण पूर्ण होणें शक्य नाहीं. म्हणून एक स्वतंत्र पाठात्मक पुस्तक लिहावें असें आम्हीं योजिलें. मराठी सातव्या इयत्तेंतील मुलांना, सहाव्या इयत्तेंतील मुलींना, ट्रेनिंग कॉलेजां-मधील पहिल्या वर्षांतील विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना उपयोग व्हावा म्हणून हें पुस्तक लिहिलें आहे.

एवढ्याच पुस्तकाच्या वाचनानें जरूर तो कार्यभाग होईल असें आम्ही म्हणत नाहीं. परंतु कोणत्या दिशेनें शिक्षकानें हा विषय शिकविण्याचा प्रयत्न करावा याची रूपरेषा या पुस्तकांत देण्याचा प्रयत्न केला आहे. शहरांमधील नागरिकांपेक्षां खेडेगांवांतील नागरिकांच्या गरजांकडे जास्त लक्ष दिलें आहे. कारण त्यांनाच आज शिक्षणाची खरी गरज आहे. विषयाचें विवेचन पूर्णपणें केलें तर पुस्तक अवजड होईल म्हणून फक्त जरूर तेवढीच माहिती दिली आहे. नागरिकत्वाचा श्रीगणेशा शिकविण्या-चीच फक्त आमची महत्त्वाकांक्षा आहे. ती थोडीबहुत तरी पूर्ण झाली तरी आमच्या श्रमांचें साफल्य झालें असें आम्ही समजूं.

पुस्तककर्ता म्हणून जनतेपुढें येण्याचा आमच्यावरील हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें कित्येक ठिकाणीं भाषा, मांडणी वगैरे गोष्टी सदोष असण्या-चा संभव आहे. या व इतर दोषांबद्दल वाचकवर्ग क्षमा करील अशी

पाठक्रम	पाठाचें नांव	पृष्ठ
२४	मुंबईसरकारचें उत्पन्न व खर्च ...	५१
२५	जमीनमहसूल	५४
२६	प्रचलित न्यायपद्धति	५७
२७	शिक्षण	६०
२८	शिक्षणाची व्यवस्था	६३
२९	पोलीसखातें	६६
३०	तुरुंग	६८
३१	लोकोपयोगीं कामें करणारें खातें	७०
३२	शेतकीखातें	७३
३३	सहकारी पतपेढ्या .. .. — ...	७६
३४	आरोग्य ... . — ...	७९
३५	औद्योगिकखातें ... . — ...	८२
३६	दुष्काळनिवारण ... .. — ...	८४
३७	प्रान्तिक किरकोळ खातीं ... .. — ...	८६
३८	सरकारी नोकर...	८९
३९	मुंबई प्रान्तिक कायदेंकाउन्सिल	९१
४०	उमेदवार व त्यांनीं पाळावयाचे नियम	९४
४१	मतदारांविषयीं माहिती	९७
४२	महाराष्ट्रांतील पक्षभेद	१००
४३	महाराष्ट्रापुढील कार्य	१०४
४४	स्थानिक स्वराज्य व ग्रामपंचायती	१०६
४५	म्युन्सिपालिट्या...	१०९
४६	लोकलबोर्ड	१११
४७	मजुरांचे संघ	११२
४८	राजेसाहेबांचा जाहीर संदेश ...	११५

वा. पै. ४६३०
23-3-24

प्रस्तावना

"I hope ways and means will be found to train the young man for increasing responsibility in civil life." ०

"—समाजावर पडणारी जास्त जबाबिदारीचीं कामें चांगल्या तऱ्हेनें करितां येतील असें शिक्षण देण्याचीं साधनें सांपडतील अशी मला आशा आहे.—"

—सर के. व्ही. रेड्डी.

उत्तम नागरिक बनविणें हेंच शिक्षणाचें ध्येय समजतात. आमचे शिक्षक लोक अशी भाषाही नेहमीं वापरतात. परंतु नागरिक या शब्दाची व्याप्ति किती आहे, याची उमज मात्र फारच थोड्यांना असते. प्रत्येक मनुष्याला नागरिक म्हणून कांहींतरी कर्तव्य असतेंच. आपल्या स्वतःच्या गरज़ा एकट्याला भागवितां येत नाहींत. गांवांत नाक्याजवळ कंदील पाहिजे असें एकाद्या नागरिकाला वाटेल तर त्यानें तो कसा लावावा ? स्वतःच्या खर्चानें तो लावील तर एकट्याचा खर्च आणि सर्वांची सोय असा प्रकार व्हावयाचा. बरें, परार्थ म्हणून त्यानें तो लावावा तर सर्व खर्च करण्याचें सामर्थ्य त्याच्या आंगीं नसतें. म्हणून सामुदायिक रीतीनें वर्गणी जमवून तो कंदील लावण्याचा प्रघात पडला आहे. अशींच दुसरीं पुष्कळ कामें असतात. तीं सर्व करण्याकरितांच पंचायती, कमिट्या, कायदेमंडळें वगैरे संस्था अस्तित्वांत आल्या आहेत.

या सर्व संस्थांचा थोडाबहुत संबंध प्रत्येक नागरिकाशीं असतो. त्याला सार्वजनिक सोयीच्या गोष्टी कोणत्या हें कळलें पाहिजे, त्याकरितां वर्गणी किती द्यावी लागेल याचा त्याला हिशेब पाहिजे, तिची व्यवस्था लावण्याकरितां प्रामाणिक व लायक माणसांची त्यानें निवड केली पाहिजे, व पुढें हें काम व्यवस्थित होत आहे किंवा नाहीं हें त्यानें पाहिलें पाहिजे. जी गोष्ट ग्रामपंचायतींची, तीच स्थानिक स्वराज्याची व कायदेमंडळांची. प्रत्येक नागरिक हा सर्व संस्थांचा मतदार नसला तरी कोठें ना कोठें तरी त्याला मत

आशा आहे. कोठें फरक करण्याबद्दल कांहीं सूचना आल्यास त्यांचा विचार दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं अवश्य करण्यांत येईल.

मूळची हस्तलिखित प्रत वाचून योग्य त्या सूचना केल्याबद्दल आमचे कित्येक स्नेही व हितचिंतक, माहिती मिळविण्याच्या कामीं ज्या पुस्तकांचा व वर्तमानपत्रांचा उपयोग झाला त्यांचे लेखक, प्रुफें तपासण्याच्या कामीं अत्यंत मेहनत घेऊन मदत केल्याबद्दल आमचे मित्र, छपाईचें काम निकडीनें व काळजीपूर्वक केल्याबद्दल 'विजय छापखान्या'चे मालक रा० गोखले, या सर्वांचा ग्रंथकर्ता अतिशय ऋणी आहे.

पुणें,
ता. १५।९।२४.

ग्रंथकर्ता.

देशगीत

प्रियकर हिंदिस्तान ! । अमुचा । प्रियकर हिंदिस्तान ! ॥धृ०॥
हींच सुखाची, सौभाग्याची, सर्व गुणांची खाण !। खरोखर ।
सर्व गुणांची खाण. । अमुचा प्रियकर हिंदिस्तान. ॥ १ ॥

चिंता ह्यांची करूं सर्वदा, ह्याचा धरुं अभिमान ! खरोखर ।
ह्याचा धरुं अभिमान.। अमुचा प्रियकर हिंदिस्तान. ॥ २ ॥

देउं धनाला, देउं मनाला, ह्यास्तव देऊं प्राण ! खरोखर ।
ह्यास्तव देऊं प्राण !। अमुचा प्रियकर हिंदिस्तान. ॥ ३ ॥

स्वदेशसेवा रुचे न तो नरदेह जसा निष्प्राण, । खरोखर ।
केवळ तो निष्प्राण. । तो नच हिंदी जाण !। अमुचा प्रियकर
हिंदिस्तान ॥ ४ ॥

प्रिय देशाचें अमुच्या देवा, नित्य करी तूं त्राण. । खरोखर ।
नित्य करीं तूं त्राण. ॥ अमुचा प्रियकर हिंदिस्तान. ॥ ५ ॥

२५१२

नागरिकत्वावरील प्राथमिक पाठ.

नं. ८८३०
कं. ३-५८
ग्रंथ संग्रह
कं. ३-५८

पाठ पहिला.

आमचा देश.



पृथ्वीचा नकाशा.

मुलांनों, तुम्हांला हा जो नकाशा दिसत आहे हा पृथ्वीचा आहे. पृथ्वी गोलाकार असून तिचे दोन भाग कल्पिलेले आहेत. एक पूर्व गोलार्ध आणि दुसरा पश्चिम गोलार्ध. या दोन गोलार्धांमिळून एकंदर सहा खंडें झालीं आहेत. त्यांपैकीं उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका हीं मोठीं खंडें पश्चिम गोलार्धांत आहेत, व युरोप, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया व आशिया हीं पूर्व गोलार्धांत आहेत.

नकाशामध्यें या खंडाचा भाग पांढऱ्या रंगांत दाखविला आहे, तो सोडून बाकीचा सर्व भाग पाणी आहे. जमिनीच्या तिपटीपेक्षां जास्त पाणी आहे. पाण्याचेसुद्धां मोठाले भाग केले आहेत. त्यांना महासागर म्हणतात. हिंदी, अटलांटिक, पॅसिफिक, आर्तिक आणि अंटार्टिक असे पांच महासागर आहेत. महासागरांखालीं जमीन आहे. धरणकिंपामुळें किंवा अन्य कारणांनीं जमीन वर येऊन बेटें झालीं आहेत. यांची संख्या आकाशांतील ताऱ्यांप्रमाणें असंख्य आहे.

इतर खंडें एकमेकांपासून अलग दिसतात; पण युरोप व आशिया हा एकच असा जमिनीचा प्रचंड भाग दिसत आहे. उरल पर्वत व उरल नदी या खंडांच्या सरहद्दी म्हणून समजण्यांत आल्या आहेत. परंतु त्या निव्वळ एकाद्या देशाच्या सरहद्दी दिसतात. पुष्कळ भूगोलकर्ते या विस्तीर्ण जमिनीच्या भागाला एक संयुक्त खंड मानितात. त्याचें नांव युरेशिया आहे. आपण हीं दोन खंडें निराळीं मानूं. कारण दोन्ही खंडांच्या संस्कृति अगदीं भिन्न आहेत. युरोपियन संस्कृतीला पश्चिमेकडील अगर पाश्चिमात्य संस्कृति म्हणतात. पूर्वेकडील म्हणजे आशिया खंडाची संस्कृति पौर्वात्य समजण्यांत येते.

आपला हिंदुस्तान देश हें एक मोठें द्वीपकल्प असून तें आशिया खंडाच्या अगदीं दक्षिणेस आहे. जणूं काय, आशिया खंडाला यानें आपल्या डोक्यावर घेतलें आहे. हिमालय, हिंदुकूश व काराकोरान या पर्वतांची यानें चुंबळ केली आहे. ओझ्याच्या भारामुळें याच्या डोक्यावरून घामाच्या प्रचंड धारा चालल्या आहेत. या धारा याच गंगा, सिंधु व यमुना वगैरे नद्या होत. या नद्यांमुळें सिंधूचें एक व गंगेचें एक अशीं दोन सुपीक खोरीं झालीं आहेत. गंगेचें खोरें जगामध्यें प्रसिद्ध आहे.

या खोऱ्यांच्या दक्षिणेस पर्वतांच्या ओळी आहेत. त्यांना हिंदुस्तान देशाचा कडदोरा समजण्यास हरकत नाहीं. त्याच्याखालील भागाला

दक्षिण हिंदुस्तान अगर डेक्कन म्हणतात. डेक्कनच्या उत्तर भागाचा पश्चिमेकडील भाग हाच आपला महाराष्ट्र होय. हल्लीं महाराष्ट्राचे राजकीय भाग म्हणून वैशिष्ट्य राहिलें नाहीं; तरी पण भाषा, चालीरीति, विचारसरणी हीं इतर लोकांच्याहून भिन्न आहेत. महाराष्ट्राचा इतिहास स्वतंत्र असून तो तितकाच उज्ज्वल आहे.

महाराष्ट्राचे सह्याद्रि पर्वतामुळें दोन भाग झाले आहेत. पश्चिमेकडील भागाला कोंकण व पूर्वेकडील भागाला देश म्हणतात. कोंकणची हवा साधारण उष्ण असून दमट आहे. येथील लोक बुद्धिमान् आणि कष्टाळू आहेत. श्रमाचें चीज होण्याइतकीं परिस्थिति नसल्यामुळें सुशिक्षित लोक आपलीं घरें सोडून दुसरीकडे राहाण्यास गेले आहेत. जमिनी कमी दर्जाच्या व लोकसंख्या जास्त, यांमुळें पिकें चांगलीं आलीं तरी अन्नाचा तुटवडा पडतो. गरीब लोकांना आपलें पोट भरण्याकरितां मुंबईस यावें लागतें. तांदूळ, नागली व वरी हीं मुख्य धान्यें कोंकणांत पिकतात. फणस, आंबे, नारळ व सुपारी हीं फळें तेथें होतात.

देशावरील लोक शरिरानें काटक आहेत. जमिनी कसदार आणि सुपीक असल्यामुळें हे लोक बळकट असतात. शिवाजीला मावळे लोकांची लढाईच्या कामीं जास्त मदत झाली, तरी पुढें मराठ्यांच्या सैन्यामध्यें पुणें, सातारा या जिल्ह्यांतील लोक प्राधान्येंकरून असत. देशाच्या पूर्व भागामध्यें पाऊस कमी पडतो. दुष्काळाचें स्वरूप उग्र असतें. यामुळें येथील लोकांनासुद्धां पोट भरण्याकरितां मुंबईस मजुरीला जावें लागतें.



नकाशामध्यें या खंडाचा भाग पांढऱ्या रंगांत दाखविला आहे, तो सोडून बाकीचा सर्व भाग पाणी आहे. जमिनीच्या तिपटीपेक्षां जास्त पाणी आहे. पाण्याचेसुद्धां मोठाले भाग केले आहेत. त्यांना महासागर म्हणतात. हिंदी, अटलांटिक, पॅसिफिक, आर्तिक आणि अंटार्टिक असे पांच महासागर आहेत. महासागरांखालीं जमीन आहे. धरणकिंपामुळें किंवा अन्य कारणांनीं जमीन वर येऊन बेटें झालीं आहेत. यांची संख्या आकाशांतील ताऱ्यांप्रमाणें असंख्य आहे.

इतर खंडें एकमेकांपासून अलग दिसतात; पण युरोप व आशिया हा एकच असा जमिनीचा प्रचंड भाग दिसत आहे. उरल पर्वत व उरल नदी या खंडांच्या सरहद्दी म्हणून समजण्यांत आल्या आहेत. परंतु त्या निव्वळ एकाद्या देशाच्या सरहद्दी दिसतात. पुष्कळ भूगोलकर्ते या विस्तीर्ण जमिनीच्या भागाला एक संयुक्त खंड मानितात. त्याचें नांव युरेशिया आहे. आपण हीं दोन खंडें निराळीं मानूं. कारण दोन्ही खंडांच्या संस्कृति अगदीं भिन्न आहेत. युरोपियन संस्कृतीला पश्चिमेकडील अगर पाश्चिमात्य संस्कृति म्हणतात. पूर्वेकडील म्हणजे आशिया खंडाची संस्कृति पौर्वात्य समजण्यांत येते.

आपला हिंदुस्तान देश हें एक मोठें द्वीपकल्प असून तें आशिया खंडाच्या अगदीं दक्षिणेस आहे. जणूं काय, आशिया खंडाला यानें आपल्या डोक्यावर घेतलें आहे. हिमालय, हिंदुकूश व काराकोरान या पर्वतांची यानें चुंबळ केली आहे. ओझ्याच्या भारामुळें याच्या डोक्यावरून घामाच्या प्रचंड धारा चालल्या आहेत. त्या धारा याच गंगा, सिंधु व यमुना वगैरे नद्या होत. या नद्यांमुळें सिंधूचें एक व गंगेचें एक अशीं दोन सुपीक खोरीं झालीं आहेत. गंगेचें खोरें जगामध्यें प्रसिद्ध आहे.

या खोऱ्यांच्या दक्षिणेस पर्वतांच्या ओळी आहेत. त्यांना हिंदुस्तान देशाचा कडदोरा समजण्यास हरकत नाहीं. त्याच्याखालील भागाला

दक्षिण हिंदुस्तान अगर डेक्कन म्हणतात. डेक्कनच्या उत्तर भागाचा पश्चिमेकडील भाग हाच आपला महाराष्ट्र होय. हल्लीं महाराष्ट्राचे राजकीय भाग म्हणून वैशिष्ट्य राहिलें नाहीं; तरी पण भाषा, चालीरीति, विचारसरणी हीं इतर लोकांच्याहून भिन्न आहेत. महाराष्ट्राचा इतिहास स्वतंत्र असून तो तितकाच उज्ज्वल आहे.

महाराष्ट्राचे सह्याद्रि पर्वतामुळें दोन भाग झाले आहेत. पश्चिमेकडील भागाला कोंकण व पूर्वेकडील भागाला देश म्हणतात. कोंकणची हवा साधारण उष्ण असून दमट आहे. येथील लोक बुद्धिमान् आणि कष्टाळू आहेत. श्रमाचें चीज होण्याइतकीं परिस्थिति नसल्यामुळें सुशिक्षित लोक आपलीं घरें सोडून दुसरीकडे राहाण्यास गेले आहेत. जमिनी कमी दर्जाच्या व लोकसंख्या जास्त, यांमुळें पिकें चांगलीं आलीं तरी अन्नाचा तुटवडा पडतो. गरीब लोकांना आपलें पोट भरण्याकरितां मुंबईस यावें लागतें. तांदूळ, नागली व वरी हीं मुख्य धान्यें कोंकणांत पिकतात. फणस, आंबे, नारळ व सुपारी हीं फळें तेथें होतात.

देशावरील लोक शरिरानें काटक आहेत. जमिनी कसदार आणि सुपीक असल्यामुळें हे लोक बळकट असतात. शिवाजीला मावळे लोकांची लढाईच्या कामीं जास्त मदत झाली, तरी पुढें मराठ्यांच्या सैन्यामध्यें पुणें, सातारा या जिल्ह्यांतील लोक प्राधान्येंकरून असत. देशाच्या पूर्व भागामध्यें पाऊस कमी पडतो. दुष्काळाचें स्वरूप उग्र असतें. यामुळें येथील लोकांनासुद्धां पोट भरण्याकरितां मुंबईस मंजुरीला जावें लागतें.

पाठ दुसरा.

मुंबई इलाखा.

हिंदुस्तान देशामध्यें सार्वभौम सत्ता ब्रिटिश सरकारची आहे. देशामध्यें दोन प्रकारचे मुलूख आहेत. एक इंग्रजी अमलाखालील व दुसरा संस्थानिकांच्या ताब्यांतील. संस्थानिकांच्या ताब्यांतील भाग

आपण सोडून देऊं. बाकीचा दोनतृतीयांश भाग प्रत्यक्ष इंग्रज सरकारच्या अमलाखालीं आहे. याची लोकसंख्या सुमारें सव्वीस कोटी आहे. राज्यकारभाराच्या सोयीकरितां याचे भाग केले आहेत, त्यांना इलाखे म्हणतात. आपण ज्या इलाख्यांत राहातों त्याचें नांव मुंबई इलाखा आहे.

मुंबई इलाख्याचे चार पोटभाग केले आहेत. या चारी पोटभागांच्या चार निरनिराळ्या भाषा आहेत. सर्वांत उत्तरेकडील भाग सिंध प्रांत हा अगदीं तुटक आहे. येथें पाऊस फार कमी पडतो. वाळवंटें फार; त्यामुळें लोकवस्ती पातळ आहे. बहुतेक गांवें व शहरें सिंधूनदीच्या कांठानें वसलीं आहेत. सिंधूनदीला धरणें बांधून कालवे काढले आहेत. सक्कर येथें मोठें धरण बांधून एक मोठा कालवा खणण्याचें काम सुरू आहे. येथील लोक सिंधी भाषा बोलतात. मुसलमान लोकांची वस्ती हिंदूंच्या तिप्पट आहे. हे लोक हिंदूंपेक्षां जास्त मागासलेले आहेत. पंजाब इलाखा या भागाला लागून असल्यामुळें पंजाबी लोक व सिंधी लोक यांचें दळणवळण, शरीरसंबंध वगैरे जास्त आहेत. पंजाब प्रांतामधील मालाची निर्यात कराची बंदरांतून जास्त होते. त्यामुळें सिंधी लोक व पंजाबी लोक यांचे आर्थिक हितसंबंधही दिवसेंदिवस वाढत आहेत.

गुजराथ प्रांतामध्यें ब्रिटिश अमलाखालीं मुलूख फार थोडा आहे. काठेवांड, पालनपूर व बडोदा या संस्थानांनीं दोनतृतीयांशापेक्षां जास्त भाग व्यापिला आहे. राहिलेल्या भागामध्यें अहमदाबाद हें शहर सर्वांत मोठें असून त्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. पूर्वीपासून तें गुजराथ प्रांताची राजधानी म्हणून समजलें गेलें आहे. या प्रांतांत कापूस पिकतो व अहमदाबाद शहरीं कापडाच्या गिरण्याही आहेत. गुजराथी लोकांची भाषा भिन्न असली तरी हे लोक महाराष्ट्रांतील नागरिकांच्या कांहींसे परिचयाचे आहेत. गुजराथमधील प्रसिद्ध संस्थान

बडोदें हें मराठ्यांचेंच आहे. तेथील गायकवाड हे पूर्वींचे मराठे सरदार दमाजी गायकवाड यांचे वंशज आहेत. तेथें पुष्कळ दाक्षिणी लोक जाऊन राहिले आहेत. शिवाय गुजराथ व महाराष्ट्र हे एकमेकांला लागलेले प्रांत आहेत. साधारण गुजराथी माणसाला मराठी कळतें व मराठा मनुष्याला गुजराथी समजतें. मुंबई शहरामध्यें दोन्ही समाजांचा संबंध जास्त येतो. या सर्व कारणांवरून गुजराथी व मराठी लोकांमध्यें बंधुभावाचें नातें उत्पन्न होत आहे, असें मानण्यास हरकत नाहीं.

दक्षिण महाराष्ट्रामध्येंसुद्धां आपलेकडील बरीच मंडळी जाऊन राहिली आहेत. या भागामध्यें महाराष्ट्रीय संस्थानें आहेत. हा प्रांत अतिशय लहान असल्यामुळें व कांहीं जिल्ह्यांतील बरीच लोकसंख्या मराठी बोलणारी असल्यामुळें, जरी तेथील भाषा कानडी आहे तरी, दक्षिण महाराष्ट्र हा भाग महाराष्ट्राहून निराळा आहे असें वाटत नाहीं. भूपृष्ठ, हवामान, चालीरीति वगैरे बाबींत महाराष्ट्र व दक्षिण महाराष्ट्र यांमध्यें बरीच साम्यता आहे. उद्योगधंदे व इतर समृद्धि करणाऱ्या अर्वाचीन बाबी यांचा मात्र दक्षिण महाराष्ट्रांत पूर्ण अभाव आहे. मुंबई-खेरीज या प्रांताला दुसरें सोयीचें बंदर नाहीं व मुंबई हें लोहमार्गानें काय किंवा जलमार्गानें काय दक्षिण महाराष्ट्राला लांबच पडतें.

पाठ तिसरा.

आमचें तात्त्विक ध्येय.

आमची संस्कृति फार प्राचीन आहे. सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेलें पाश्चिमात्य लोक ज्या वेळीं अगदीं रानटी स्थितींत होते त्या वेळीं आर्य लोक फार सुधारलेले होते. आध्यात्मिक व आधिभौतिक शास्त्रांमध्यें त्यांनीं केलेले शोध पाहून पाश्चिमात्य लोकांनीं माना डोलविल्या

आहेत. आर्यांच्या अगोदर येथें वास्तव्य करीत असलेले अनार्य लोक हेही अगदीं रानटी नव्हते. आर्यांच्या पाठीमागून आलेले मुसलमान लोक यांनीं बांधून ठेविलेल्या इमारती अद्यापि त्यांच्या संस्कृतीची साक्ष देत आहेत. याच लोकांनीं आम्हीं केलेले भूमिति, बीजगणित वगैरे शास्त्रांमधील शोध युरोप खंडांत नेले. त्यांना शास्त्रीय स्वरूप देऊन तेच शोध अगर सिद्धांत आज पाश्चिमात्य लोक आपणांला दाखवीत आहेत व आपण त्यांची महति गात आहों.

या देशांत भौतिकशास्त्रांची वाढ पुष्कळ झाली होती; तरी पण लोकांचा कल निवृत्तीकडे विशेष होता. साधारण ज्ञानी मनुष्यालाही आपण लोकांच्या अडचणी दूर करण्याकरितां आपल्या बुद्धीचा उपयोग करावा, एकादा शास्त्रीय शोध लावून लोकांच्या सुखांत भर घालावी, असें वाटत नसे. स्वतः पुनर्जन्माच्या फेऱ्यांमधून सुटावें, म्हणून मोक्ष-प्राप्ति मिळविण्याकरितां तो संन्यास घेई. साधारण प्रापंचिक मनुष्य-सुद्धां आपला प्रपंचाचा मार्ग गौण समजून हस्तेंपरहस्तें संन्यासवृत्तीनें राहाणाऱ्या माणसाला मदत करी. मनुष्य उपजतच सुखलोलुप असतो. म्हणून सुखाकडे असलेला त्याचा कल वाढूं न देण्याकरितांच पढलेले लोक आपली सर्व बुद्धिमत्ता व शक्ति खर्च करीत. यामुळें भौतिक-शास्त्रांची वाढ खुंटली.

पाश्चिमात्य देशांत विशेषतः इंग्लंडमध्यें वाढत्या लोकसंख्येला देशांत पिकणारें धान्य अपुरें पडूं लागलें. यामुळें लोकांचें शोध करण्याकडे लक्ष लागलें. निरनिराळे शोध लवकरच लागले. इतर देशांमधून कच्चा माल मिळूं लागला. देशांत उद्योग वाढले, संपत्ति वाढली व इंग्लंडची भरभराट झाली. आम्ही महाराष्ट्रामधील लोकतर आपल्या गांवाच्या-बाहेर काय चाललें आहे याची चौकशीही करीत नसूं. देशावर राज्य कोण करीत आहे याची आम्हीं कधीं परवा केली नाहीं. धार्मिक छळ होऊं लागला यामुळें लोक थोडे जागे झाले. पुढें महाराष्ट्राचा

भाग्योदय झालाही. परंतु पुन्हां धार्मिक स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर तो झोंपीं गेला. इंग्रजी राज्यामध्यें भौतिकशास्त्रांच्या प्रगतीपासून होणारे फायदे प्रत्यक्ष अनुभवास आले आणि गेल्या महायुद्धामध्यें, त्यांचा दुरुपयोग केला तर कसा अनर्थ होतो हेंही दृष्टीस पडलें. पाश्चिमात्य सुधारणांचा पूर्ण पगडा ज्या लोकांवर बसला होता त्या लोकांना जरा थांबून शांतपणें विचार करावा लागला, आणि पाश्चिमात्य लोकांची आधिभौतिकशास्त्रें आणि आपलें आध्यात्मिक ध्येय यांमधून मार्ग काढिला पाहिजे ही विचारसरणी त्यांना पटली. आणि म्हणून फलाची आशा न करितां कर्म करीत राहा, असें जें श्रीकृष्णानें अर्जुनाला सांगितलें तीच शिकवण महाराष्ट्राला आतां मिळत आहे. निष्काम कर्मयोग हें महाराष्ट्राचें आज तात्त्विक ध्येय आहे.

पाठ चवथा.

आमचा समाज.

महाराष्ट्रीय लोक साधारपणें पुराणप्रिय आहेत. एकाद्या नवीन सुधारणेचा स्वीकार ते करणार नाहींत असें नाहीं. परंतु कोणी तशी गोष्ट शिकवूं लागला तर मात्र आरंभीं त्यांचा संताप झाल्याखेरीज राहाणार नाहीं. सामाजिक सुधारक आणि पुराणमतवादी यांच्यामध्यें मागील शतकाच्या शेवटच्या दशकांत भयंकर रण माजून राहिलें होतें. परंतु समाजसुधारकांना त्यावेळीं जो जय मिळाला नाहीं, तो शिक्षणाच्या प्रसारानें व सुधारकांच्या शांत शिकवणीनें आतां मिळाला आहे. आमचे लोक धर्म ईश्वरनिर्मित समजतात. तो मानवी असून कालमानाप्रमाणें त्याच्यांत बदल करण्याचा आपणांला अधिकार आहे; ही सुधारकांची विचारसरणी धर्माभिमानी लोकांस पटत नाहीं.

धर्मसुद्धां इतका व्यापक झाला आहे कीं, त्यांत प्रत्येक सामाजिक गोष्टीचा संबंध येतो. त्यामुळें सामाजिक सुधारणेला धार्मिक बंडाचें स्वरूप येतें. आणि जगामध्यें जेथें जेथें धार्मिक बंड उभारलें गेलें तेथें तेथें पुराणमतवादी लोकांकडून प्रथम असाच विरोध झाला आहे. आमच्या समाजाचा विरोध हासुद्धां मनुष्यस्वभावाला अनुसरूनच होता. आतां सार्वत्रिक शिक्षण, परदेशगमन, बालविवाहाला बंदी वगैरे सुधारणा अमलांत आल्या आहेत. आणि इतर गोष्टींमधील विरोधाचें स्वरूप थोडें सौम्य झालें आहे.

राष्ट्रीय भावनाः—हिंदुस्तानचा इतिहास पुष्कळ उज्ज्वल आहे, परंतु तो जसा राजनिष्ठेनें अगर स्वामिनिष्ठेनें ओथंबलेला आहे तसा तो देशनिष्ठेनें नाहीं. राष्ट्रीय भावना ही चीज तर आमच्या इतिहासांत दिसतही नाहीं. समान-हितत्व हें राष्ट्रीयत्वाची कल्पना उत्पन्न करितें. इंग्रज सरकारच्या अमदानींत सर्वांचें हित एक झालें आहे. राष्ट्रीय भावना प्रज्वलित केल्याचें श्रेय हिंदी राष्ट्रीय सभेलाही दिलें पाहिजे. आपणांला राष्ट्रीय भावना वाढावी अशी इच्छा असेल तर हा महार, हा मुसलमान हा भेदभाव आपण विसरून जाऊन सार्वजनिक हिताचा प्रश्न येईल तेव्हां आपले खासगी हितसंबंध बाजूला ठेवावयास आपण शिकलें पाहिजे.

शारीरिक सुधारणाः—अलीकडे लोकांमध्यें शरिराचा कमकुवतपणा वाढल्या प्रमाणावर असल्याचें दिसून येतें. शरीरबल व वाढती लोकसंख्या यांवर देशाचें वैभव अवलंबून असतें. खेडेगांवीं खुली हवा भरपूर असून रोगराई कमी असते. परंतु दुष्काळामुळें आपल्या महाराष्ट्रामध्यें शहरांची वाढ झपाट्यानें होत आहे. शहरांतील आरोग्य कृत्रिम उपायांनीं राखिलेलें असतें. त्यांनाही पैसा फार लागतो. आपल्या म्युनिसिपालिट्या सधन नाहींत आणि म्हणून शहरांमधून गरीब लोकांचें आरोग्य चांगलें राहात नाहीं.

बडोदें हें मराठ्यांचेंच आहे. तेथील गायकवाड हे पूर्वींचे मराठे सरदार दमाजी गायकवाड यांचे वंशज आहेत. तेथें पुष्कळ दक्षिणी लोक जाऊन राहिले आहेत. शिवाय गुंजराथ व महाराष्ट्र हे एकमेकांला लागलेले प्रांत आहेत. साधारण गुजराथी माणसाला मराठी कळतें व मराठी मनुष्याला गुजराथी समजतें. मुंबई शहरामध्यें दोन्ही समाजांचा संबंध जास्त येतो. या सर्व कारणांवरून गुजराथी व मराठी लोकांमध्यें बंधुभावाचें नातें उत्पन्न होत आहे, असें मानण्यास हरकत नाहीं.

दक्षिण महाराष्ट्रामध्येंसुद्धां आपलेकडील बरीच मंडळी जाऊन राहिली आहेत. या भागामध्यें महाराष्ट्रीय संस्थानें आहेत. हा प्रांत अतिशय लहान असल्यामुळें व कांहीं जिल्ह्यांतील बरीच लोकसंख्या मराठी बोलणारी असल्यामुळें, जरी तेथील भाषा कानडी आहे तरी, दक्षिण महाराष्ट्र हा भाग महाराष्ट्राहून निराळा आहे असें वाटत नाहीं. भूपृष्ठ, हवामान, चालीरीति वगैरे बाबींत महाराष्ट्र व दक्षिण महाराष्ट्र यांमध्यें बरीच साम्यता आहे. उद्योगधंदे व इतर समृद्धि करणाऱ्या अर्वाचीन बाबी यांचा मात्र दक्षिण महाराष्ट्रांत पूर्ण अभाव आहे. मुंबई-खेरीज या प्रांताला दुसरें सोयीचें बंदर नाहीं व मुंबई हें लोहमार्गानें काय किंवा जलमार्गानें काय दक्षिण महाराष्ट्राला लांबच पडतें.

पाठ तिसरा.

आमचें तात्त्विक ध्येय.

आमची संस्कृति फार प्राचीन आहे. सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेलें पाश्चिमात्य लोक ज्या वेळीं अगदीं रानटी स्थितींत होते त्या वेळीं आर्य लोक फार सुधारलेले होते. आध्यात्मिक व आधिभौतिक शास्त्रांमध्यें त्यांनीं केलेले शोध पाहून पाश्चिमात्य लोकांनीं माना डोलविल्या

आहेत. आर्यांच्या अगोदर येथें वास्तव्य करीत असलेले अनार्य लोक हेही अगदीं रानटी नव्हते. आर्यांच्या पाठीमागून आलेले मुसलमान लोक यांनीं बांधून ठेविलेल्या इमारती अद्यापि त्यांच्या संस्कृतीची साक्ष देत आहेत. याच लोकांनीं आम्हीं केलेले भूमिति, बीजगणित वगैरे शास्त्रांमधील शोध युरोपं खंडांत नेले. त्यांना शास्त्रीय स्वरूप देऊन तेंच शोध अगर सिद्धांत आज पाश्चिमात्य लोक आपणांला दाखवीत आहेत व आपण त्यांची महति गात आहों.

या देशांत भौतिकशास्त्रांची वाढ पुष्कळ झाली होती; तरी पण लोकांचा कल निवृत्तीकडे विशेष होता. साधारण ज्ञानी मनुष्यालाही आपण लोकांच्या अडचणी दूर करण्याकरितां आपल्या बुद्धींचा उपयोग करावा, एकादा शास्त्रीय शोध लावून लोकांच्या सुखांत भर घालावी, असें वाटत नसे. स्वतः पुनर्जन्माच्या फेऱ्यांमधून सुटावें, म्हणून मोक्ष-प्राप्ति मिळविण्याकरितां तो संन्यास घेई. साधारण प्रापंचिक मनुष्य-सुद्धां आपला प्रपंचाचा मार्ग गौण समजून हस्तेंपरहस्तें संन्यासवृत्तीनें राहाणाऱ्या माणसाला मदत करी. मनुष्य उपजतच सुखलोलुप असतो. म्हणून सुखाकडे असलेला त्याचा कल वाढूं न देण्याकरितांच पढलेले लोक आपली सर्व बुद्धिमत्ता व शक्ति खर्च करीत. यामुळें भौतिक-शास्त्रांची वाढ खुंटली.

पाश्चिमात्य देशांत विशेषतः इंग्लंडमध्यें वाढत्या लोकसंख्येला देशांत पिकणारें धान्य अपुरें पडूं लागलें. यामुळें लोकांचें शोध करण्याकडे लक्ष लागलें. निरनिराळे शोध लवकरच लागले. इतर देशांमधून कच्चा माल मिळूं लागला. देशांत उद्योग वाढले, संपत्ति वाढली व इंग्लंडची भरभराट झाली. आम्ही महाराष्ट्रामधील लोकतर आपल्या गांवाच्या-बाहेर काय चाललें आहे याची चौकशीही करीत नसूं. देशावर राज्य कोण करीत आहे याची आम्हीं कधीं परवा केली नाहीं. धार्मिक छळ होऊं लागला त्यामुळें लोक थोडे जागे झाले. पुढें महाराष्ट्राचा

भाग्योदय झालाही. परंतु पुन्हां धार्मिक स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर तो झोंपीं गेला. इंग्रजी राज्यामध्यें भौतिकशास्त्रांच्या प्रगतीपासून होणारे फायदे प्रत्यक्ष अनुभवास आले आणि गेल्या महायुद्धामध्यें, त्यांचा दुरुपयोग केला तर कसा अनर्थ होतो हेंही दृष्टीस पडलें. पाश्चिमात्य सुधारणांचा पूर्ण पगडा ज्या लोकांवर बसला होता त्या लोकांना जरा थांबून शांतपणें विचार करावा लागला, आणि पाश्चिमात्य लोकांची आधिभौतिकशास्त्रें आणि आपलें आध्यात्मिक ध्येय यांमधून मार्ग काढिला पाहिजे ही विचारसरणी त्यांना पटली. आणि म्हणून फलाची आशा न करितां कर्म करीत राहा, असें जें श्रीकृष्णानें अर्जुनाला सांगितलें तीच शिकवण महाराष्ट्राला आतां मिळत आहे. निष्काम कर्मयोग हें महाराष्ट्राचें आज तात्त्विक ध्येय आहे.

पाठ चवथा.

आमचा समाज.

महाराष्ट्रीय लोक साधारपणें पुराणप्रिय आहेत. एकाद्या नवीन सुधारणेचा स्वीकार ते करणार नाहींत असें नाहीं. परंतु कोणी तशी गोष्ट शिकवूं लागला तर मात्र आरंभीं त्यांचा संताप झाल्याखेरीज राहाणार नाहीं. सामाजिक सुधारक आणि पुराणमतवादी यांच्यामध्यें मागील शतकाच्या शेवटच्या दशकांत भयंकर रण माजून राहिलें होतें. परंतु समाजसुधारकांना त्यावेळीं जो जय मिळाला नाहीं, तो शिक्षणाच्या प्रसारानें व सुधारकांच्या शांत शिकवणीनें आतां मिळाला आहे. आमचे लोक धर्म ईश्वरनिर्मित समजतात. तो मानवी असून कालमानाप्रमाणें त्याच्यांत बदल करण्याचा आपणांला अधिकार आहे; ही सुधारकांची विचारसरणी धर्माभिमानी लोकांस पटत नाहीं.

धर्मसुद्धां इतका व्यापक झाला आहे कीं, त्यांत प्रत्येक सामाजिक गोष्टीचा संबंध येतो. त्यामुळें सामाजिक सुधारणेला धार्मिक बंडाचें स्वरूप येतें. आणि जगामध्यें जेथें जेथें धार्मिक बंड उभारलें गेलें तेथें तेथें पुराणमतवादी लोकांकडून प्रथम असाच विरोध झाला आहे. आमच्या समाजाचा विरोध हासुद्धां मनुष्यस्वभावाला अनुसरूनच होता. आतां सार्वत्रिक शिक्षण, परदेशगमन, बालविवाहाला बंदी वगैरे सुधारणा अमलांत आल्या आहेत. आणि इतर गोष्टींमधील विरोधाचें स्वरूप थोडें सौम्य झालें आहे.

राष्ट्रीय भावनाः—हिंदुस्तानचा इतिहास पुष्कळ उज्ज्वल आहे, परंतु तो जसा राजनिष्ठेनें अगर स्वामिनिष्ठेनें ओथंबलेला आहे तसा तो देशनिष्ठेनें नाहीं. राष्ट्रीय भावना ही चीज तर आमच्या इतिहासांत दिसतही नाहीं. समान-हितत्व हें राष्ट्रीयत्वाची कल्पना उत्पन्न करितें. इंग्रज सरकारच्या अमदानींत सर्वांचें हित एक झालें आहे. राष्ट्रीय भावना प्रज्वलित केल्याचें श्रेय हिंदी राष्ट्रीय सभेलाही दिलें पाहिजे. आपणांला राष्ट्रीय भावना वाढावी अशी इच्छा असेल तर हा महार, हा मुसलमान हा भेदभाव आपण विसरून जाऊन सार्वजनिक हिताचा प्रश्न येईल तेव्हां आपले खासगी हितसंबंध बाजूला ठेवावयास आपण शिकलें पाहिजे.

शारीरिक सुधारणाः—अलीकडे लोकांमध्यें शरिराचा कमकुवतपणा वाढत्या प्रमाणावर असल्याचें दिसून येतें. शरीरबल व वाढती लोकसंख्या यांवर देशाचें वैभव अवलंबून असतें. खेडेगांवीं खुली हवा भरपूर असून रोगराई कमी असते. परंतु दुष्काळामुळें आपल्या महाराष्ट्रामध्यें शहरांची वाढ झपाट्यानें होत आहे. शहरांतील आरोग्य कृत्रिम उपायांनीं राखिलेलें असतें. त्यांनाही पैसा फार लागतो. आपल्या म्युनिसिपालिट्या सधन नाहींत आणि म्हणून शहरांमधून गरीब लोकांचें आरोग्य चांगलें राहात नाहीं.

औद्योगिक उन्नतिः—या बाबींत तर आम्ही फारच मागें आहों. आपण अद्यापपर्यंत मागें राहिलों याचें कारण आमचा देश सुपीक हें होय. खावयास पंचाईत पडेपर्यंत मनुष्य कांहींएक हालचाल करीत नाहीं. आतां थोडीतरी हालचाल करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. आपणाला यंत्राच्या साहाय्यानें चाललेल्या उद्योगांबरोबर आतां तोंड द्यावें लागणार आहे. आपल्याजवळ भांडवल नाहीं, औद्योगिक चातुर्य नाहीं व यंत्रशिक्षण नाहीं. उद्योगाशिवाय भांडवल जमत नसतें व या दोहोंशिवाय यंत्रशिक्षण नाहीं. दुसरे आपणांला शिकवितील ही आशा करणें फुकट आहे.

उद्योग करण्याची निष्ठा, प्रेम आणि प्रामाणिकपणा या गुणांची आपणांला जरूरी आहे. शिवाय धूर्तपणा व धाडसप्रियता हेही गुण पाहिजेत. सुसंस्कृत व अब्रूदार लोकांनीं हें काम हातीं घेतलें तर भांडवल जमेल; परंतु शिष्ट लोकांचीं मुलें औद्योगिक शिक्षण घेण्याचा प्रयत्न करीत नाहींत. कांहीं ठराविक धंदे तेवढे सभ्य व बाकीचे असभ्य या समजुतीमुळें चित्रकला, गायनकला, नाट्यकला व शिल्पशास्त्र यांचीसुद्धां चांगली वाढ होत नाहीं. इतर देशांमधून श्रम करून प्रामाणिकपणें आपला चरितार्थ चालविणारा मनुष्य सभ्य समजला जातो. हेंच त्या देशांच्या उन्नतीचें मुख्य कारण होय.

पाठ पांचवा.

हिंदुस्तानचा नागरिक.

नगरांत राहाणारा तो नागरिक, असा कोणी नागरिक या शब्दाचा अर्थ करितात. परंतु शहरांत राहाणारे तेवढे नागरिक व खेड्यांत राहाणारे नागरिक नव्हत, असें कोणीं समजूं नये. आपल्या मुंबई

इलाख्यांत शेंकडा १९ लोक शहरांत राहाणारे आहेत आणि शेंकडा ८१ खेडेगांवांतील शेतकरी आहेत. मग शेतकरी नागरिक नव्हत तर कोण? अगदीं प्राचीनकाळीं आपल्या इकडे व पाश्चिमात्य देशांतही शहराशहराची स्वतंत्र राज्यें असत. कायदेबद्ध राज्यपद्धति तेव्हांच सुरू झाली. एकादा कायदा पास झाल्यास तो सर्वांना बंधनकारक होत असे. रोमसरकारनें केलेल्या कायद्यांखालीं जे लोक येत, त्यांना रोमचे नागरिक म्हणत असत. हिंदुस्तानसरकारनें केलेले कायदे ज्यांना पाळावे लागतात ते हिंदुस्तानचे नागरिक असें समजलें पाहिजे.

अलीकडे नागरिक या शब्दाचा अर्थ याहीपेक्षां जास्त समजण्यांत येतो. नागरिक म्हटला म्हणजे तो जगाच्या पाठीवर कोठेंही असो; त्याचें वर्तन ज्या देशाचा तो नागरिक असेल त्याचा दर्जा वाढविणारें असलें पाहिजे. आपल्या देशाला कमीपणा येईल असें कृत्य त्यानें करतां कामा नये. राजनिष्ठा आणि देशाभिमान हे दोन मुख्य गुण त्याच्या अंगीं असले पाहिजेत. कोणत्याही सरकारच्या मदतीला चांगले देशाभिमानी नागरिक पाहिजेत. नाहींतर, पेट्रोलशिवाय जशी मोटार निर्जीव, तशी त्या सरकारची स्थिति होईल.

कुटुंबांतील माणसानें जसें कोणतेंही काम आपल्या मगदुराप्रमाणें कां होईना, पण कुटुंबाच्या हिताकरितांच करावयाचें असतें—कुटुंबामध्यें बाप, मोठे मुलगे बाहेर कामाला जातात, लहान मुलगे गुरांच्या गोठ्यांत कांहींतरी काम करीत असतात अगर धडे करीत असतात, आई स्वयंपाक घरांत भाकऱ्या भाजीत असते व लहान मुली आपल्या आईभोंवतीं हिंडत असतात व तिला एकादी वस्तु आणून देतात, म्हणजे प्रत्येक माणूस आपल्या कुटुंबाकरितां कांहींतरी करीत असतें—त्याप्रमाणेंच प्रत्येक हिंदी गृहस्थानें पोटाकरितां कांहीं उद्योग करीत असतां हिंदुस्तान हें एक कुटुंब आहे व आपण त्या कुटुंबापैकींच एक आहों, अशा जाणिवेनें वागलें पाहिजे. आपल्या वागणुकीनें देशाचें व त्याबरोबर

ब्रिटिश साम्राज्याचें नुकसान होत असेल तर ती वागणूक आपण सोडिली पाहिजे व देशाकरितां वाटेल तो स्वार्थत्याग करावयास तयार झालें पाहिजे. प्रत्येक हिंदी नागरिकाच्या मनांत प्रथम देशाविषयीं विचार आला पाहिजे. देशाच्या प्रश्नावर निकाल देतांना त्यानें जातगोत विसरलें पाहिजे.

जसें हिंदुस्तान हें एक कुटुंब आहे, त्याचप्रमाणें ब्रिटिश साम्राज्य हेंही एक कुटुंबच आहे. लॉर्ड किचनेर यांचा पाण्यांत बुडून अंत झाल्याची बातमी जेव्हां विद्युत्संदेशानें सर्व साम्राज्यभर पसरली, तेव्हां कुटुंबांतील मुख्य पुरुष निवर्तल्यामुळें जसें दुःख होतें, त्याप्रमाणें साम्राज्यांतील सर्व लोकांना दुःखाचा मोठा धक्का बसला. 'आपला देश हेंच आपलें घर' असें प्रसिद्ध इटालियन देशभक्त मॅझिनीनें म्हटलें आहे, तें खरें आहे. गेल्या युद्धांत फ्रान्समध्यें साम्राज्यामधील सर्व दर्जांचे व जातींचे लोक खांद्याला खांदा लावून लढले, ते कशाकरितां? आपल्या घराकरितां नव्हे, तर काय?

कित्येक लोकांची अशी समजूत आहे कीं, आपण मोठे हातवारे करून आमचा देश मोठा, आमचा इतिहास ओजस्वी, आमची संस्कृति उज्ज्वल, आमचे पूर्वज पराक्रमी म्हणून व्याख्यानें दिलीं, कीं आम्ही उत्कृष्ट नागरिक झालों. नुसती वडिलांची कीर्ति सांगणाऱ्या लोकांची गणना पढतमूर्खांत होते हें आपणांला माहीत आहे. देशाचा अगर साम्राज्याचा मोठेपणा नरवीर तानाजी मालुसरे किंवा नेल्सन यांसारख्या लोकांच्या कृतींवर अवलंबून असतो. नुसत्या बडबडीनें देशाचें वैभव वाढत नसून तें कृतीनें वाढतें, हें प्रत्येक हिंदी नागरिकानें लक्षांत ठेवावें.

आपल्या देशाचा जगांत कोठेंही अपमान झाला म्हणजे खऱ्या नागरिकाला किती दुःख होतें हें जपानमध्यें नुकत्याच घडलेल्या एका गोष्टीवरून चांगलें दिसून येतें. अमेरिकेंत एशियाटिक लोकांना

मज्जाव करणारा कायदा पास झाला, म्हणून एका जपानी नागरिकानें 'हारीकारी' म्हणजे आत्महत्या केली!

पाठ सहावा.

ब्रिटिश साम्राज्य.

ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधीं मावळत नाहीं असें म्हणतात. पृथ्वीच्या पाठीवर या साम्राज्याचा इतका विस्तार झाला आहे कीं, पृथ्वी आपल्या आंसाभोंवतीं फिरत असतां सूर्याच्यासमोर पृथ्वीचा कोणताही भाग आला तरी त्यावर थोडाबहुत ब्रिटिश मुलूख सांपडेलच. दिवसाच्या चोवीस तासांमध्यें केव्हांही कोणीं विचारलें तर ब्रिटिश साम्राज्याच्या भागांत कोठेंतरी सूर्यप्रकाश आहेच असें दाखवितां येईल. पंधरा रेखांशांत एक तासाचा फरक पडतो. परंतु पृथ्वीच्या पाठीवर असे पंधरा रेखांश क्वचितच सांपडतील, कीं त्यांत इंग्रज सरकारच्या ताब्यांतलें एकतरी बेट नाहीं.

हल्लीं साम्राज्याचा विस्तार एक कोटी तीस लक्ष चौरस मैल झाला आहे. म्हणजे पृथ्वीवरील एक पंचमांश जमीन या साम्राज्यानें व्यापिली आहे. साम्राज्याची लोकसंख्या चाळीस कोटी आहे. म्हणजे ती पृथ्वीवरील लोकसंख्येच्या एक चतुर्थांश आहे. शिवाय जगाचा कोणताही भाग घेतला तर तेथें इंग्रजी व्यापारी दृष्टीस पडावयाचा नाहीं असें नाहीं. साम्राज्याची एवढी भरभराट झाली याचें कारण इंग्रज लोकांच्या आंगचे गुण होत. विशेषतः कर्तबगारी, हुषारी, धैर्य व धाडस या गुणांची मदत त्यांना जास्त झाली आहे. इंग्रज लोक जातात तेथें शांति, दया व न्याय प्रस्थापित करितात म्हणून यांच्या या अफाट साम्राज्याला स्थैर्य आलें आहे.

साम्राज्याचें मुख्य ठिकाण ग्रेटब्रिटन हा देश समजला जातो. यालाच साम्राज्याची मातृभूमि मानितात. ब्रिटिश साम्राज्यांत वसाहती, प्रोटेक्टोरेट, क्राऊन कॉलनीज आणि डिपेन्डन्सीज अशा चार प्रकारचे देश आहेत. कानडा, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड व न्यू फाउन्डलंड या मुख्य वसाहती होत. यांना आपलें स्वत:चें सैन्य व आरमार ठेवण्याचा अधिकार आहे.अंतर्व्यवस्था पाहाण्याकरितां यांना प्रातिनिधिक संस्था देण्यांत आल्या आहेत. फक्त परकी देशाबरोबर मातृभूमीच्या सरकारच्या संमतीखेरीज यांना युद्ध अगर तह करतां येत नाहीं. कित्येक ठिकाणीं देशी राजा असून युरोपियन लोक उद्योगाकरितां जाऊन राहिले आहेत. अशा ठिकाणीं संरक्षण व सुराज्य यांची शाश्वति यावी म्हणून तीं ठिकाणें साम्राज्याच्या पांघरुणाखालीं घेतलीं आहेत. यांनाच प्रोटेक्टोरेट (संरक्षित) म्हणतात. बेच्चुआनालंड असें एक आफ्रिकेमध्यें प्रोटेक्टोरेट आहे. तिसरा प्रकार क्राउन कॉलनीज् (परावलंबी वसाहती). सिंहलद्वीप अगर पूर्व आफ्रिका हीं क्राउन कॉलनीजचीं उदाहरणें होत. यांचा कारभार पाहाण्याकरितां विलायतेंत मंत्रिमंडळांत एक सेक्रेटरी असतो. चवथा भाग डिपेन्डन्सीजचा. हिंदुस्तान व इजिप्त या मोठ्या डिपेन्डन्सीज् (परावलंबी) आहेत. त्या सर्वांशीं इंग्लंडवर अवलंबून आहेत.

साम्राज्याची मुख्य बळकटी सैन्य व आरमार यांच्यावर अवलंबून आहे. ब्रिटिश आरमाराची बरोबरी करणारें आरमार जगांत दुसरें कोठें नाहीं. याच्या योगानें सर्व साम्राज्यभर दळणवळण व्यवस्थित चालतें. युद्धाच्या प्रसंगीं सैन्याची हालचाल फार सुलभ रीतीनें करतां येते. त्याचप्रमाणें दारूगोळा व इतर युद्धसामग्री दोस्त राष्ट्रांना पोंचवितां येते व शत्रूंना मिळणारी कुमक बंद करतां येते. आरमाराच्या मदतीनें इंग्लंडनें सागर व महासागर यांचा जणूं काय ताबाच घेतला आहेसें दिसतें.

स्वत: इंग्लंड सर्व बाजूंनीं पाण्यानें वेष्टिलेलें असलें तरी अंतस्थ

शांतता राहावी, साम्राज्याच्या कोणत्याही भागांत बंडाळी झाली तर उपयोगीं पडावें म्हणून खडें सैन्य ठेवून त्याचीं ठिकाणें सर्व साम्राज्यभर जागजागीं पसरून ठेविलीं आहेत. इंग्लंडमध्यें फ्रान्स किंवा इतर युरोपियन देशांप्रमाणें लष्करी शिक्षण सक्तीनें देत नाहींत; तरी गेल्या महायुद्धांत सक्तीचें अवलंबन करण्यांत आलें आणि आज घटकेला सैन्याच्या बाबतींतसुद्धां इंग्लंडची नंबर बराच वर लागेल.

लष्करी ठिकाणें, आरमारी ठिकाणें व कोलिंग म्हणजे कोळसा पुरविणारीं स्टेशनें ह्या तीन मुख्य खांबांवर ब्रिटिश साम्राज्याची उभारणी झालेली आहे.

पाठ सातवा.

साम्राज्यांतर्गत स्वराज्य.

महाराष्ट्रीयांना स्वराज्य हा शब्द नवीन नाहीं. पूर्वीं शिवाजीनें स्थापिलेलें स्वराज्य दीडशें वर्षें टिकलें होतें. मात्र त्या वेळची स्वराज्याची कल्पना व आतांची कल्पना यांमध्यें फार फरक आहे. पूर्वीं आपल्या देशचा राजा असला कीं स्वराज्य होत असे. आतां लोकांचें राज्य म्हणजे स्वराज्य ही कल्पना दृढमूल झाली आहे. लोकांनीं निवडून दिलेले प्रतिनिधि सांगतील त्याप्रमाणें राज्यकारभार चालावयाचा असतो. अशा प्रतिनिधींच्या संस्थांना कौन्सिलें म्हणतात. दुसरींही कित्येक नांवें आहेत. इंग्लंडमधील या प्रतिनिधींच्या संस्थेला पार्लमेंट म्हणतात.

स्वराज्याची ही अर्वाचीन कल्पना पाश्चिमात्य देशांत प्रथम उद्भवली. ब्रिटिश पार्लमेंट हें या संस्थेचें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ग्रेटब्रिटननें आपल्या वसाहतींमध्यें अशाच संस्था सुरू केल्या आहेत. त्या चांगल्या तऱ्हेनें चालत आहेत. हिंदुस्तानांत त्यांचें अनुकरण व्हावें म्हणून आज

पुष्कळ वर्षें प्रातिनिधिक तत्त्वांवर आपल्या इकडे स्थानिक संस्था—लोकलबोर्डें व म्युनिसिपालिट्या—सरकारनें चालवून, त्या वाटेनें प्रातिनिधिक संस्था चालविण्याचें शिक्षण लोकांना दिलें आहे.

स्थानिक संस्था यशस्वी झाल्यामुळें देशांतील सुशिक्षित लोकांना धीर आला. त्यांनीं इ. स. १८८५ सालीं हिंदी राष्ट्रीय सभा भरवून तिच्या मार्गानें आपल्या अडचणी सरकारपुढें मांडण्यास सुरवात केली. राष्ट्रीय सभेच्यां बैठकींनें लोकांना राजकीय शिक्षण मिळालें, व त्यांच्या आकांक्षा वाढल्या. इ. स. १९०४ पासून देशामध्यें तरुण राष्ट्रीय पक्ष डोकावूं लागला. त्याचा उत्साह मावळूं नये म्हणून कै० डॉ० दादाभाई नौरोजी यांनीं इ. स. १९०६ मध्यें कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं साम्राज्यांतर्गत स्वराज्याचें ध्येय हिंदी लोकांपुढें ठेविलें. त्यावेळेपासून राजकारणामध्यें नवीन जोम आला. लोकांच्या राजकीय आकांक्षा वाढल्या, त्या तृप्त करण्याच्या हेतूनें त्यावेळचे उदार स्टेट सेक्रेटरी लॉर्ड मोर्ले यांनीं इ. स. १९०९ मध्यें एक सुधारणांचा हप्ता दिला. इतिहासामध्यें याला मोर्ले-मिंटो-सुधारणा असें नांव मिळालें आहे. या हप्त्यानें हिंदुस्तानचें समाधान झालें नाहीं. पुढें इ. स. १९११ मध्यें राजेसाहेब हिंदुस्तानांत येऊन गेले. दिल्ली येथें दरबार भरविला; कलकत्ता येथील राजधानी दिल्लीस नेली; बंगालची फाळणी रद्द झाली; तरी लोकांची भूक थांबेना.

पुढें इ. स. १९१४ मध्यें महायुद्ध सुरू झालें. त्यावेळीं हिंदी सैन्य युरोपमधील रणक्षेत्रामध्यें ब्रिटिश शिपायांबरोबर खांद्याला खांदा लावून लढलें. पहिल्या चकमकींमध्यें या सैन्यानें बाजू बरीच सांवरली असें म्हणतात. हिंदुस्तानांत सैन्यभरती भरपूर झाली. संस्थानिक, धनिक लोक व सामान्य जनता यांच्याकडून पैशांची मदतही पुष्कळ झाली. हिंदुस्तान पूर्वीपासून राजनिष्ठ आहे; पण त्याची राजनिष्ठा कसोटीला लागली नव्हती. महायुद्धामुळें उत्पन्न झालेल्या संकटसमयीं

ती ब्रिटिश जनतेला पटली, व आतां हिंदुस्तानला जबाबदारीचें स्वराज्य देण्यास हरकत नाहीं, असें इंग्लिश लोकांस वाटूं लागलें.

इकडे हिंदुस्तानांतील व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिज हे चांगले मुत्सद्दी होते. या देशांत अगदीं थोडें सैन्य ठेवून बाकी सर्व सैन्य त्यांनीं समरांगणीं पाठविलें. दुसरा एकादा भित्रा व्हाइसरॉय असता, तर त्यानें एवढी धडाडी दाखविली नसती, व हिंदुस्तानालाही आपली मर्दुमकी व साम्राज्यावरील प्रेम दाखविण्याची संधि मिळाली नसती.

पाठ आठवा.

जबाबदार राज्यपद्धति.

महायुद्धामुळें हिंदुस्तानावर इंग्लंडचा विश्वास बसला. राजकीय हक्क दिल्यानें हिंदी लोक साम्राज्याशीं फटकून वागणार नाहींत, असें सरकारला वाटूं लागलें. अशा वेळीं आपलें धोरण इंग्लंडनें जाहीर करावें, असा हिंदुस्तानसरकारचा आग्रह चालला होता. कौन्सिलमधील एकोणीस सभासदांनीं राजकीय हक्कांचा मसुदा करून तो पार्लमेंटला सादर केला होता. त्यालाच धरून हिंदी राष्ट्रीय सभा व मॉस्लेम लीग या मोठ्या संस्थांनींही संगनमत करून एक योजना तयार केली होती. लोकांचे चळवळीचें कामही जोरानें चाललें होतें.

अशा वेळीं सरकार स्वस्थ बसूं शकलें नाहीं. पार्लमेंटमध्यें त्या वेळचे स्टेटसेक्रेटरी मि. मॉंटेग्यु यांनीं तारीख २० ऑगस्ट १९१७ रोजीं हिंदुस्तानविषयक पार्लमेंटचें धोरण जाहीर केलें. यावेळीं जबाबदार राज्यपद्धति हें आपलें ध्येय सांगून तें मिळविण्याकरितां हिंदी लोकांना राज्यकारभाराचा अनुभव यावा म्हणून, हिंदुस्तानांत जाऊन तेथील लोक व सरकार यांच्याशीं खल करून, स्वराज्याचा

पहिला हप्ता किती असावा हें ठरविण्याकरितां बादशहांनीं आपणाला हिंदुस्तानांत जाण्याची परवानगी दिली आहे, असें मि. मॉंटेग्यु म्हणाले. तसेंच स्वराज्याचा हप्ता ठरविण्याचा अधिकार पार्लमेंटला आहे च दिलेल्या हप्त्याचा उपयोग करून हिंदी लोक सहकारितेनें आपली लायकी सिद्ध करतील तेव्हांच पुढील प्रगति होणार आहे असें भारतमंत्र्यानें निक्षून सांगितलें.

यावेळीं 'जबाबदार राज्यपद्धति ही शब्दयोजना नव्यानें करण्यांत आली. राज्यकारभार चालविणारा मनुष्य लोकमताला जबाबदार असला पाहिजे, त्याचा पगार मंजूर करण्याचा अधिकार लोकप्रतिनिधींना पाहिजे, ही कल्पना जबाबदार राज्यपद्धतीमध्यें प्रामुख्यानें वास करते.

ठरल्याप्रमाणें भारतमंत्री आले, साक्षीपुरावे झाले, मोठमोठ्या लोकांच्या गांठी घेतल्या, आणि शेवटीं एक मोठा रिपोर्ट तयार केला. त्या रिपोर्टाच्या आधारें 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट'चा मसुदा तयार झाला. तो पार्लमेंटपुढें चर्चेला आला, तेव्हां एक पार्लमेंटरी कमिटी नेमिली. तिच्यापुढें पुष्कळ हिंदी लोकांच्या साक्षी झाल्या. शेवटीं तिनें मंजूर केलेला मसुदा पार्लमेंटमध्यें पास झाला. हाउस ऑफ लॉर्डस्-मध्यें या कायद्याचें बाळंतपण त्या वेळचे दुय्यम हिंदी भारतमंत्री लॉर्ड सिंह यांनीं केलें. कायद्यावर बादशहांची सही झाली. यावेळीं बादशहांनीं पाठविलेल्या जाहीर संदेशाचे उतारे शेवटच्या पाठांत दिले आहेत.

पुढें निवडणुकीचे नियम व मतदारसंघ बनविण्याकरितां साउथबरो कमिटी देशभर फिरली. हिंदुस्थानसरकार व प्रांतिक सरकारें यांचेमधील गुंतागुंतीचे आर्थिक संबंध सोडविण्याकरितां मेस्टन कमिटी आली. अशा रीतीनें कायद्याचें काम पुरें झाल्यावर नवीन निवडणुकी झाल्या आणि असेंब्ली व कौन्सिलें उघडण्याचे समारंभ सम्राट् पांचवे जार्ज यांचे चुलते ड्यूक ऑफ कॅनॉट यांचे हस्तें मोठ्या समारंभानें साजरे करण्यांत आले.

पाठ नववा.

ब्रिटिश साम्राज्यामध्यें हिंदुस्तानचा दर्जा.

साम्राज्याची लोकसंख्या चाळीस कोटी आहे, हें पूर्वी सांगितलेंच आहे. यांपैकीं तीस कोटी हिंदी लोक आहेत. म्हणजे साम्राज्यामध्यें तीन चतुर्थांश हिंदी लोकांचा भरणा आहे. हिंदुस्तानामध्यें, कच्चा माल होतो त्यावर बऱ्याच ब्रिटिश गिरण्या चालतात. साम्राज्याच्या व्यापारापैकीं निम्मा व्यापार हिंदी लोकांबरोबर चालतो. सारांश, हिंदुस्तानचें महत्त्व इंग्लिश लोकांना फार वाटतें. साम्राज्यामध्यें तो आहे ही गोष्ट ब्रिटिश लोकांना भूषणावह आहे; हिंदुस्तान ब्रिटिश साम्राज्याचा मुकुटमणि आहे. असा देश साम्राज्यांत राहावा, अशी इंग्लिश लोकांची इच्छा असणें स्वाभाविकही आहे.

आतां सर्व बाजूंनीं हिंदुस्तानचा दर्जा वाढत आहे. जगामधील प्रमुख संस्थांमध्यें हिंदुस्तानचे प्रतिनिधि बसूं लागले आहेत. राष्ट्रसंघ म्हणून एक संघ गेल्या युद्धाच्या शेवटीं अशीं युद्धें टाळण्याकरितां काढण्यांत आला आहे. त्याच्यावर हिंदुस्तानसरकारनें आपले प्रतिनिधि पाठविले आहेत. नामदार लॉर्ड सिंह हे राष्ट्रसंघाच्या बैठकीला हजर राहाणारे पहिले हिंदी प्रतिनिधि होत.

मजुरांच्या अडीअडचणींचा विचार करण्याकरितां अशीच एक जगांतील मजुरांच्या प्रतिनिधींची सभा सालोसाल भरते. मजूरसंघामध्यें तर हिंदुस्तानचा दर्जा फार मोठा आहे. इतर देशांप्रमाणें आमचा मजूरवर्ग एके ठिकाणीं एकवटलेला नसला, तरी देशामध्यें मजुरी करून राहाणारांची संख्या फार मोठी आहे. म्हणून मजूरसंघांच्या सभेला हिंदुस्तानचा प्रतिनिधि जातो. हिंदी मजूरसंघांनींच पसंत केलेल्या मनुष्याला हिंदुस्तानसरकार पाठवितें. आपल्याकडील मजुरांचे

कैंवारी रा० रा० नारायण मल्हार जोशी, भारत-सेवक यांची या कामीं प्रथम योजना झाली होती.

वर लिहिलेल्या गोष्टी जगामध्यें हिंदुस्तानचा दर्जा वाढविणाऱ्या आहेत. परंतु आमचा दर्जा साम्राज्यांत वाढेल त्याप्रमाणें तो जगांत वाढणार आहे. गेल्या महायुद्धामध्यें साम्राज्याची शक्ति एकवटून तिच्या मदतीनें इंग्लंडचे मुख्य प्रधान लॉइड जॉर्ज यांनीं तें युद्ध जिंकिलें. अशा वेळीं साम्राज्याची एकी बळकट व्हावी म्हणून साम्राज्यपरिषद् भरविण्याचा प्रघात पडला. या साम्राज्यपरिषदेला हजर राहाण्याकरितां हिंदुस्तान सरकारनें लॉर्ड सिंह, नामदार शास्त्री व सर सप्रू असे हिंदी प्रतिनिधि क्रमानें पाठविले. यांनीं हजर राहून आपल्या विद्वत्तेनें परिषदेवर चांगली छाप पाडिली आहे. सर तेजबहादुर सप्रू यांनीं केलेली कामगिरी विशेष वाखाणण्याजोगी आहे.

या सर्व गोष्टींवरून सरकारच्या मनामध्यें हिंदी लोकांचा दर्जा वाढावा अशी इच्छा आहे, हें उघड दिसतें. तो वाढविण्याचा शक्य तितका प्रयत्न सरकार करीत आहे. ब्रिटिश लोकांचें हिंदुस्तानविषयक प्रश्नांसंबंधीं लक्ष वाढत्या प्रमाणावर आहे. पार्लमेंटमध्यें हिंदुस्तानचें नांव निघत नाहीं असा दिवस विरळा. कांहीं लोकांनीं तर हिंदुस्तानविषयक प्रश्नांचा ऊहापोह करण्याकरितां स्वत:ला वाहून घेतलें आहे.

अशा परिस्थितींत जीं कामें हिंदी लोकांच्या खांद्यावर पडत आहेत तीं सर्व ते मोठ्या शिताफीनें करीत आहेत. राष्ट्रसंघांमध्यें नेक नामदार शास्त्री अगर साम्राज्यपरिषदेमध्यें सर सप्रू यांनीं आपलें काम उत्तम प्रकारें केलेंच; परंतु इतर प्रतिनिधींवरसुद्धां आपली छाप ठेवून ते परत आले. असे लोक आपणांमध्यें आहेत, याबद्दल आपणांला अभिमान वाटला पाहिजे, व आणखी असे निर्माण व्हावे अशी आपण परमेश्वराची प्रार्थना केली पाहिजे. कारण असेच लोक जास्त निर्माण झाल्यानें हिंदुस्तानचा दर्जा वाढणार आहे.

पाठ दहावा. २५५

साम्राज्यापासून होणारे फायदे.

'साम्राज्यांतर्गत स्वराज्य' हें आतां हिंदुस्तानचें राजकीय ध्येय ठरल्यासारखें झालें आहे. यानें हिंदुस्तानचें पूर्ण समाधान होणार आहे. कारण असें स्वराज्य भोगणाऱ्या वसाहतींना कोणतीही विशेष अडचण भासत नाहीं. इंग्रजी राज्यापासून आमचेही पुष्कळ फायदे झाले आहेत. आमच्यावर एकतंत्री अंमल सुरू झाल्या-कारणानें हिंदुस्तानास राष्ट्राची कळा येत आहे. इंग्रजलोकांच्या सहवासानें आमच्यामध्यें मुत्सद्देगिरी येत आहे. सर्वांगी उन्नति म्हणजे काय हें आम्हांला कळून आलें आहे. इंग्रजांपासून जे आमचे अनंत फायदे झाले आहेत ते इतरांच्या हातून कालत्रयींही झाले नसते. "शांतता, कायद्याची सर्वत्र सारखी अंमलबजावणी, अपराध्यांचा बंदो-बस्त, सार्वजनिक आरोग्य, व्यापारसमृद्धि, शेतकीसुधारणा, खनिज व उद्भिज्ज संपत्तीची अभिवृद्धि, विद्यादानाच्या अनुपम सोयी, प्रामाणिक सरकारी नोकरांची पैदास, लेखनस्वातंत्र्य, यंत्रादि सुखसामुग्रीचा परिचय आणि स्वातंत्र्याची अभिरुचि" हे त्यांपैकीं कांहीं फायदे येथें दिले आहेत.

वर दाखविलेल्या फायद्यांमुळें आपण साम्राज्यसरकाराशीं कृतज्ञ राहिलें पाहिजे. हिंदुस्तान देश हा इंग्लंडसारखा चोहोंबाजूंनीं पाण्यानें वेष्टिलेला नाहीं. त्याला पाण्याकडून व जमिनीकडून, दोहोंबाजूंनीं परचक्राची भीति आहे. त्याला लागून बलाढ्य राष्ट्रें आहेत. त्यापासून पूर्वीं हिंदुस्तानाला पुष्कळच त्रास झालेला आहे. यापुढें त्यांचें निवारण करावयाचें तर कोणत्यातरी बलाढ्य राष्ट्राबरोबर हिंदु-स्तानला स्नेहसंवर्धन करावें लागेल. आपला बचाव करण्यास ब्रिटिश-

साम्राज्य सर्वांशीं समर्थ आहे. त्यानें आपल्यावर अनंत उपकार केले आहेत. साम्राज्यांत राहून सर्व गोष्टी साधतील अशी आपली खातरी आहे. आणि म्हणून 'साम्राज्यांतर्गत स्वराज्य' हें ध्येय आपणां सर्वांना आतां मान्य झालें आहे.

गेल्या महायुद्धामध्यें बेल्जमसारख्या राष्ट्रावर जर्मनीसारख्या बलाढ्य राष्ट्राकडून झालेला जुलूम इतःपरं होऊं नये, म्हणून एक राष्ट्रसंघ काढण्यांत आला आहे. प्रत्येक राष्ट्राला स्वतःच्या बचावाकरितां सैन्य पाहिजे इतकें ठेवितां येत नाहीं; म्हणून राष्ट्रसंघानें सैन्य ठेवावें व त्याकरवीं दुर्जन राष्ट्रांचें पारिपत्य करावें असा विचार आहे. मग आपलें साम्राज्य हें तरी एक लहानशा राष्ट्रसंघाप्रमाणेंच आहे. साम्राज्याचें सैन्य साम्राज्यांतील कोणत्याही भागाकरितां लढेल व कोणत्याही शत्रूचें निर्दालन करील; या सैन्याचा खर्च साम्राज्यावर वांटला जाईल. म्हणजे एरवींचें सैन्य ठेवून हिंदुस्तानाला खर्च आला असता त्यापेक्षां कमी सैन्य ठेवून व कमी खर्च करून शत्रूंपासून या देशाचें संरक्षण होईल.

तसेंच सुधारलेलीं राष्ट्रें आपलीं आरमारें वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. आरमार अगर सैन्य वाढलें म्हणजे त्याचा उपयोग करावा असें या राष्ट्रांना वाटणें अगदीं साहाजिक आहे. उद्यां कोणत्या राष्ट्राची दृष्टि हिंदुस्तानाकडे वळेल हें आज सांगतां येत नाहीं. प्रत्येकाची ती वळेल अशी भीति आहे. अशा प्रसंगीं हिंदुस्तानाजवळ उत्तम आरमार नसेल तर त्याचा बचाव होणार नाहीं. नवीन आरमार तयार करणें हें फार खर्चाचें काम आहे. इंग्लंडचें आरमार आपल्या मदतीला धांवून येण्याचा संभव आहे, तोंपर्यंत इतर कोणत्याही देशाचें आरमार हिंदुस्तानच्या किनाऱ्याकडे वळणार नाहीं. तसेंच जास्त लढाऊ जहाजांची जरूरी वाटली तरी साम्राज्यामधील सर्व राष्ट्रांनीं तीं बांधावयाचीं म्हटल्यास कांहींएक विलंब लागणार नाहीं. हिंदुस्तान ब्रिटिश साम्राज्यांत राहिल्यानें हाही एक आपला मोठा फायदा होणार आहे.

पाठ अकरावा.

ब्रिटिश सम्राट्.

अलीकडे जगामध्यें लोकांनीं चळवळ करून जिकडे तिकडे लोकसत्ताक राज्यपद्धति प्रस्थापित केली आहे. लोकांना एकतंत्री राज्यकारभार चिरकाल सुखावह होत नाहीं. श्रीरामचंद्रासारखे कांहीं उत्तम राजे असूं शकतील, तरी पण त्यांच्या पोटीं जन्मास येणारे मुलगे बापाप्रमाणें निघतात अशी खातरी नाहीं. कांहीं तर दुर्व्यसनी आणि स्वार्थी असे निघाले आहेत. या दुर्वर्तनी राजांमुळें कित्येक देशांत क्रांति झाल्या आणि पूर्ण लोकसत्ताक कौन्सिलें प्रस्थापित होऊन राजाच्या ऐवजीं अध्यक्ष अगर प्रेसिडेंट हे राज्यकारभार पाहूं लागले.

इंग्लंडमध्येंसुद्धां फार मागें राजापासून कधीं कधीं पुष्कळ त्रास झाला. परंतु लोकांनीं हळूहळू त्याचें सिंहासन भक्कम ठेवून राज्यघटनेमध्यें सुधारणा केल्या. आतां इंग्लंडमध्यें सर्व सत्ता पार्लमेंटच्या हातांत आहे. पार्लमेंटचा मुख्य मंत्री हा प्रत्येक कायद्याला राजेसाहेबांची सही मिळवितो, आणि ती झाल्याखेरीज कोणत्याही कायद्याला कायमचें स्वरूप येत नाहीं. एकाद्या कायद्याला राजेसाहेबांनीं संमति दिली नाहीं तर कसें? असा कोणी प्रश्न करील, परंतु इंग्लंडमध्यें राजानें कसें वागावें यासंबंधीं प्रत्यक्ष कायदा नसला तरी ज्या वहिवाटी पडल्या आहेत, त्या फार चांगल्या आहेत.

लोकप्रतिनिधींच्या बहुमतानें, भरपूर चर्चा होऊन बिल पास झालेलें असलें म्हणजे राजेसाहेब त्यावर सही करितातच. सही न केल्यानें त्यांचा फायदा कांहींच नाहीं, लोककल्याण करणें हेंच आपलें काम आहे असें ते समजतात. खरें लोककल्याण लोकप्रतिनिधि चांगलें जाणतात. लोकसभेनें बिल पास केलें व त्याला लॉर्डांनीं संमति दिली नाहीं तर

उलट आपल्या अधिकारांत नवे लॉर्ड निर्माण करून तें बिल राजे-साहेब पास करून देतात. म्हणजे राजेसाहेब व लोक यांमध्यें तेथें फार तादात्म्य झालें आहे.

लोक व राजघराणें यांमध्यें मुळींच घर्षण होत नसल्यानें राजा व प्रजा यांमध्यें बेबनाव कधींच उत्पन्न होत नाहीं. एकादी सरकारनें केलेली गोष्ट किंवा सरकारचें धोरण लोकांना नापसंत असल्यास त्या-बद्दल प्रधान अगर त्याचे मंत्री यांना लोक दोष देतात. राजेसाहेबांचें त्यांत नांवसुद्धां निघत नाहीं. इतकेंच नाहीं, तर प्रधान व लोक यांमध्यें तेढ उत्पन्न झाल्याचें राजेसाहेबांच्या नजरेस आल्यास फिरून निवड-णूक करून लोकांना अनुकूल अशा मनुष्याला मंत्रिमंडळ बनविण्यास ते सांगतात.

इंग्लंडमधील लोकांचें आपल्या राजावर फार प्रेम आहे. मुलांच्या अंत:करणांत राजावरील प्रेमाचा उदय लहानपणींच होतो. आई, बाप, शिक्षक व राजा यांविषयीं त्यांच्या मनांत क्रमानें प्रेम उत्पन्न होतें. राजावरील प्रेमाचेंच पर्यवसान शेवटीं देशनिष्ठेंत होतें. लहान मुलांना देशनिष्ठेची कल्पना देतां येत नाहीं. कारण देशाची कल्पना मुलांना देऊन ती आपली माता आहे असें समजावून देणें अवघड आहे. राजाची गोष्ट तशी नाहीं. लहान मुलांस त्याचें प्रत्यक्ष दर्शनही घडूं शकतें. इंग्लिश लोक राजनिष्ठेच्याच मदतीनें देशनिष्ठेचें अगर देशाभिमानाचें शिक्षण देतात.

कधीं कधीं असे कांहीं प्रसंग येतात कीं, त्यावेळीं लोकांना दोन गोष्टी सांगणारा एक त्रयस्थ लागत असतो. देशांतील लोक कोणत्या ना कोणत्या तरी पक्षाचे असतात. एका पक्षाच्या पुढाऱ्यानें केलेला उपदेश दुसऱ्या पक्षांतील लोकांना पटत नाहीं. अशा वेळीं राजेसाहेबांचा उपयोग फार होतो. एकादी गोष्ट राजेसाहेबांनीं सांगितली, कीं देशप्रेमी लोकांची राजनिष्ठा उचंबळून येते. राजेसाहेबांचा उपदेश कीस

न कांढितां लोक स्वीकारतात आणि देशाचें संकट निवारून जातें. सारांश, इंग्लंडनें आपली राज्यसुधारणा पूर्ण लोकसत्ताक केली आहे, परंतु राजघराण्यापासून होणारे फायदे मात्र इतर राष्ट्रांप्रमाणें गमावले नाहींत: राज्यक्रांतीसारखे अवघड प्रसंग सुद्धां मोठ्या युक्तीनें सोडविण्याची इंग्लंडला हातोटी साधली आहे.

पाठ बारावा.

इंग्लंडची राज्यव्यवस्था.

मुलांनों, आपण ब्रिटिश साम्राज्याचे नागरिक आहों, हें तुम्हांला माहीत आहे. या एवढ्या साम्राज्याचे सम्राट् पांचवे जार्ज आहेत. परंतु हे सम्राटच स्वतः सर्व साम्राज्याचा कारभार पाहात नाहींत हें तुम्हांला मागील पाठांत सांगितलें. साम्राज्याची खरी सत्ता इंग्लंडमधील लोकसभेच्या हातांत आहे. या सभेला पार्लमेंट असें म्हणतात. इंग्लंडमध्यें लोकसभेची स्थापना फार पूर्वी झालेली असून जगांतील इतर राष्ट्रांनीं आपापल्या लोकसभा स्थापन करण्यामध्यें इंग्लंडचेंच अनुकरण केलें आहे. अशा लोकसभा असल्या म्हणजे राजाला आपल्या लहरीप्रमाणें राज्यकारभार करितां येत नाहीं. कधीं कधीं लोकसभेपेक्षां राजाचा एकतंत्री कारभार सुटसुटीत, सोयीचा व तडकाफडकी निर्णयाचा असा होतो. आपले रामचंद्रादि राजे अगर शिवाजीमहाराज यांच्या हातून सर्वच लोककल्याणाचीं कामें झालीं. तरी एका माणसाच्या हातून अन्याय होईल तसा लोकसभेच्या हातून होत नाहीं. 'पांचांमुखीं परमेश्वर' अशी जी आपल्यामध्यें म्हण पडली आहे, तिचाही अर्थ हाच आहे. राज्यकारभार लोकसभेमार्फत चालावा, म्हणजे देशांतील राज्यपद्धति लोकसत्ताक असावी, ही गोष्ट आतां सर्वसंमत झाली आहे.

ब्रिटिश लोकसभेसंबंधानें तर एकानें "अशी एकही योजना राष्ट्रसभेवर लादण्यांत आलेली नाहीं, कीं ती पुढील काळांतील शांत व सारासार विचाराला मान्य झालेली नाहीं. अशी एकही चळवळ फुकट गेली नाहीं, कीं ती पुढील पिढीनें नापसंत ठरविली नाहीं." म्हणजे ब्रिटिश पार्लमेंटच्या हातून एकही वाईट गोष्ट झाली नाहीं, अशा अर्थाचे उद्गार काढिले आहेत.

या लोकसभेच्या सभासदांची संख्या ७०७ आहे. हे सभासद निवडून देणारे मतदार एक कोटी साठ लक्ष आहेत. पुरुष मतदाराचें वय एकवीस वर्षांचें असून त्याचें राहाण्याचें घर वर्षास एकशें पन्नास रुपये भाडें येईल अशा दर्जाचें पाहिजे. प्रत्येक मनुष्याला अद्यापि मतदानाचा अधिकार नसला तरी साधारण तीन मनुष्यांस एक या-प्रमाणें मतांची वांटणी झाली आहे. स्त्रियांनाही मत देण्याचा अधिकार मिळाला आहे.

पार्लमेंटची निवडणूक झाली म्हणजे इतर कोणत्याही कारणानें तें मोडण्यांत आलें नाहीं तर त्याची मुदत पांच वर्षें आहे. पूर्ण मुदत संपेपर्यंत पार्लमेंट टिकलें असें क्वचित्. सर्व राज्यकारभाराचे अधिकार या सभेच्या हातीं आहेत. युद्ध पुकारणें, कर बसविणें, परराज्यांबरोबर तह करणें या सर्व गोष्टी पार्लमेंटच करितें. या सभेंत उदार, पुराणमत-वादी व मजूर असे तीन पक्ष आहेत. ज्या पक्षाचें बहुमत असेल म्हणजे ज्या पक्षाचे सभासद जास्त असतील त्या पक्षाच्या पुढाऱ्याला राजेसाहेब बोलावून मंत्रिमंडळ स्थापण्याची विनंति करितात. हें मंत्रि-मंडळ साधारणपणें वीसपासून चाळीस सभासदांचें बनविलेलें असतें. तरीपण त्यांचे पगार पार्लमेंट मंजूर करितें. मंत्रिमंडळाचा पराभव झाल्यास मुख्य प्रधान राजीनामा देतो किंवा जरूर वाटल्यास पुन्हा पार्लमेंटची निवडणूक करवितो.

या सभेला जोडून आणखी एक दुसरी सभा आहे. तिला लॉर्डांची

अगर उमरावांची सभा असें म्हणतात. या सभेंत सर्व सरदार लोक बसतात. या सरदार अगर उमराव लोकांची संख्या ६७० असून ती वरचेवर बदलूं शकते. कारण कांहीं उमराव राजानें बनविलेले असतात. त्यांच्यां मृत्यूमुळें जागा रिकाम्या होतात. लोकसभा व लॉर्डांची सभा यांच्यामध्यें मतभेद झाला म्हणजे लोकसभेंत पास झालेलें बिल अगर ठराव उमराव नापास करितील तर बहुमत होण्याकरितां लागणारे उमराव राजा बनवितो. अशा रीतीनें ही उमरावांची सभा खालील सभेला विरोध करणार नाहीं, अशी व्यवस्था करण्यांत आली आहे.

प्रधानमंडळाला अधिकार फार आहेत. परराष्ट्रांबरोबर तह करणें, साम्राज्यामधील वसाहतींच्या राज्यकारभाराला वळण लावणें, सैन्य व आरमार यांची नेआण करणें, या सर्व गोष्टी प्रधानमंडळ करूं शकतें. लोकसभा प्रधानमंडळाला शासन करूं शकेल, परंतु त्यांच्या कार्याला प्रतिबंध करणार नाहीं. प्रधानमंडळाची सभा भरवून तींत खल करून बहुमतानें विचार ठरला म्हणजे तें प्रधानमंडळाचें अगर कॅबिनेटचें मत असें जाहीर करण्यांत येतें. या मताला लोक-सभेंतील मोठ्या पक्षाचा पाठिंबा मिळतो, म्हणून प्रधानमंडळाला राज्यकारभारामध्यें अडचण होत नाहीं.

प्रधानमंडळाच्या सभासदांकडे निरनिराळीं कामें वांटून दिलीं आहेत. कोणाकडे खजिना तर कोणाकडे परराष्ट्रसंबंध. वसाहतींकरितां एक मंत्री असून एका मंत्र्याकडे सर्व हिंदुस्तानची जबाबदारी टाकलेली आहे. यालाच 'भारतमंत्री' असें म्हणतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय
.....नं.
नि.

पाठ तेरावा.

भारतमंत्री व त्याचें कौन्सिल.

ब्रिटिश प्रधानमंडळामध्यें दोन अधिकारी हिंदुस्तानच्या कारभारावर देखरेख ठेवण्याकरितां असतात. त्यांपैकीं एकाला स्टेट सेक्रेटरी ऑफ इंडिया(भारतमंत्री)व दुसऱ्याला अंडर स्टेट-सेक्रेटरी असें म्हणतात.यांपैकीं एक कोणीतरी शक्य असेल त्याप्रमाणें लोकसभेंत बसतो व दुसरा उमरावांच्या सभेंत बसतो. मॉंटेग्यु हे स्टेट सेक्रेटरी असतांना लोक-सभेंत बसत, कारण ते लार्ड नव्हते; तर लॉर्ड सिंह हे अंडर सेक्रेटरी होते तरी ते लॉर्ड असल्यामुळें उमरावांच्या सभेंत बसत असत. हल्लींचे मुख्य स्टेट-सेक्रेटरी लॉर्ड ऑलिव्हर हे वरच्या सभेंत बसतात व त्यांचे मदतनीस प्रो० रिचर्डस् हे खालच्या सभेंत बसतात. राजाच्या वतीनें हिंदुस्थानसरकारावर पार्लमेंटचा अधिकार चालविणारा भारतमंत्री हा मुख्य अधिकारी असून त्याला नेहमीं पार्लमेंटच्या म्हणजेच प्रधान-मंडळाच्या कलानें चालावें लागतें. प्रधानमंडळांत बदल झाला, कीं हे दोन्ही अधिकारी बदलतात.

या अधिकाऱ्यांना मदत करण्याकरितां म्हणून एक कौन्सिल दिलेलें असतें. त्याला इंडिया कौन्सिल असें नांव आहे. या कौन्सिलचे सभासद आठपासून बारा असतात. त्यांची नेमणूक राजे-साहेब करितात. या सभासदांपैकीं निदान निम्मेतरी हिंदुस्तानांत दहा वर्षें राहिलेले लोक असावे आणि हिंदुस्तान सोडून त्यांना पांच वर्षें झालेलीं नसावीं असा निर्बंध आहे. यांचा पगार महिना १५०० रुपये असून एकादा हिंदी गृहस्थ सभासद असेल तर त्याला या रकमेच्या दीडपट पगार देण्यांत येतो. याचें कारण त्याला आपला देश सोडून पर-मुलुखांत राहावें लागतें हें होय. या कौन्सिलचा खर्च हिंदुस्तान-

सरकार देतें. स्टेट-सेक्रेटरीचा पगारमात्र इंग्लंडच्या खजिन्यांतून देण्यांत येऊं लागला आहे. खर्चाच्या बाबींखेरीज इतर बाबतींत या कौन्सिलाचें मत स्टेट-सेक्रेटरीनें घेतलेंच पाहिजे असें नाहीं.

पॉर्लमेंटमध्यें हिंदुस्तानविषयक विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें स्टेट-सेक्रेटरीला द्यावीं लागतात. हिंदुस्तानच्या बजेटची माहिती पार्लमेंटला सादर करण्याचें काम त्यालाच करावें लागतें. एकादा हिंदुस्तान-विषयक कायदा करावयाचा असला तर त्याची मांडणी त्यालाच करावी लागते. हिंदुस्तानसरकारच्या कारभाराला एकादें नवीन वळण लावण्याचें कामही कधीं कधीं स्टेट-सेक्रेटरी करितो. हिंदी कौन्सिलें व हिंदुस्तान-सरकार यांचें जुळतें असेल तेव्हां स्टेट-सेक्रेटरीनें मध्यें ढवळाढवळ करूं नये असें पार्लमेंटनें त्याचें धोरण ठरविलें आहे.

हिंदुस्तानला जबाबदार राज्यपद्धति देण्याचें वचन ब्रिटिश सरकारनें दिलें आहे. तींत साधारणपणें दहा वर्षांनीं एक अशा हप्त्यानें सुधारणा होणार आहे. ही सुधारणा जसजशी वाढत जाईल म्हणजे स्वराज्याचे हक्क हिंदुस्तानला जसजसे अधिक मिळतील तसतसे स्टेट-सेक्रेटरीचे अधिकार कमी होत जातील. पुढें कांहीं होवो; सध्यां तरी स्टेट-सेक्रेटरी हा मोठा अधिकारी असून त्याचें म्हणणें तें पार्लमेंटचें म्हणणें असें समजण्यांत येतें आणि म्हणून त्याच्या प्रत्येक शब्दाला हिंदुस्तानांत किंमत द्विली जाते.

स्टेट-सेक्रेटरी पार्लमेंटला जबाबदार असल्याकारणानें त्याला साधारण-पणें स्वतंत्र मत देतां येत नाहीं. जें मंत्रिमंडळाचें मत असेल तेंच त्याला बोलावें लागतें. क्वचित्प्रसंगीं परवानगीनें आपलें स्वतःचें मत तो देतो.

हिंदी प्रश्नांची माहिती मिळवून ती पार्लमेंटला पुरविण्याकरितां एक पार्लमेंटरी कमिटी असते. शिवाय एक हाय कमिशनर असतो. तो हिंदुस्तानसरकारला सोयीचा माल विकत घेऊन देण्याचें काम

करितो. रेल्वे किंवा इतर कामाचीं कंत्राटें द्यावयाचीं झाल्यास हिंदुस्तान-सरकार तीं या हाय कमिशनरमार्फत देतें.

पाठ चौदावा.

हिंदुस्तानसरकार.

ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्तानचा दर्जा डिपेन्डन्सीचा आहे. पार्लमेंटच्या वतीनें स्टेट-सेक्रेटरी हे विलायतेंत राहून हिंदुस्तानच्या राज्य-कारभारावर नजर ठेवितात. हिंदुस्तानवर मुख्य अधिकारी असतो त्याला व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल म्हणतात. याची नेमणूक बादशहा स्वतः करितात. या जागेवर साधारणपणें उमरावां-पैकीं एकाची निवड होते. कोठेंतरी मुत्सद्देगिरीचें काम केलेला माणूस बहुधा या जागीं येतो.

गव्हर्नर जनरलच्या दिमतीला एक कार्यकारी कौन्सिल दिलें आहे. त्याचे सभासद किती असावे याला निर्बंध नाहीं. हल्लीं ते सात आहेत. त्यांच्यापैकीं तीन हिंदी असावेत असा नियम आहे. इ. स. १९०९ सालीं मोर्लेमिंटो सुधारणा झाल्या त्यावेळीं एक कार्यकारी कौन्सिलर हिंदी असावा असें ठरलें. आतां एकाचे तीन हिंदी गृहस्थ कौन्सिलांत आहेत. सर्व सभासदांची एकत्र बैठक होऊन सरकारी धोरण ठरत असतें. दोन्ही बाजूंना सारखीं मतें पडल्यास गव्हर्नर जनरल एक निर्णयात्मक मत देतो.

सुधारणांपूर्वीं हिंदुस्तानसरकारला काम होतें, तितकें आतां राहिलें नाहीं. प्रांतिक सरकारला राज्यकारभारामध्यें पुष्कळ स्वायत्तता मिळाली आहे. तेव्हां बऱ्याच प्रांतिक सरकारांकडे सोंपविलेल्या खात्यांवर देखरेख

करण्याचें काम हिंदुस्तानसरकारला करावें लागत नाहीं. फक्त प्रांतिक सरकारांना मार्ग दाखविण्याचेंच काम तें करितें.

हिंदुस्तानसरकारच्या ताब्यांतील खातीं कार्यकारी कौन्सिलच्या सभासदांमध्यें पुढें दिल्याप्रमाणें वांटून दिलीं आहेत. परदेशव्यवहार हें खातें गव्हर्नर जनरल स्वतः पाहातो. सैन्याचा कारभार कमांडर इन् चीफ यांजकडे असतो व तो कार्यकारी कौन्सिलचा सभासद म्हणून समजला जातो. गृहव्यवस्था हें खातें महत्त्वाचें समजलें जातें. सर्वांत जुना सभासद बहुतेक होममेंबर होतो आणि त्याच्याकडेच गृहव्यवस्थेचें काम जातें. फडणविशीकरितां सध्यां तर एक चांगला मनुष्य विलायतेहून आणिला आहे. पैशाची सर्व व्यवस्था हा सभासद पाहातो. जमीनमहसूल व शेतकी, शिक्षण व आरोग्य, व्यापार व उद्यम हीं खातीं, प्रांतांमध्यें सोंपीव म्हणजे साधारणपणें लोकांच्या प्रतिनिधींकडे चालविण्यास दिलीं असल्यामुळें वर हिंदुस्तानसरकारनेंसुद्धां तीं हिंदी सभासदांकडेच ठेविलीं आहेत.

हिंदुस्तानसरकारवर स्टेट-सेक्रेटरीचा ताबा किती चालावा हें निश्चित नाहीं; म्हणून तें सर्वस्वीं स्टेट-सेक्रेटरीला जबाबदार आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. खालीं लोकनियुक्त सभासदांचें बहुमत असलेली असेंब्ली व वर इंडिया ऑफिस म्हणजे स्टेट-सेक्रेटरीची कचेरी या दोहोंमध्यें हिंदुस्तानसरकारला काम करावें लागतें.

हिंदुस्तानसरकारच्या मदतीकरितां सेक्रेटरीएट म्हणजे एक मोठी कचेरी असून प्रत्येक सभासदाच्या मदतीला एक एक सेक्रेटरी असिस्टंट सेक्रेटरी, डेप्युटी सेक्रेटरी वगैरे अनुभविक व हुशार लोक असतात. सरकारी बैठका पांच महिने दिल्लीला व सात महिने सिमल्यास होतात. दिल्ली प्रांत हल्लीं पंजाब प्रांतांतून काढून एका कमिशनरच्या हुकमतीखालीं ठेविला आहे आणि त्या प्रांतामध्यें हिंदुस्तानसरकारच्या कचेऱ्या आहेत.

दिल्ली येथें पुन्हा हिंदुस्तानची राजधानी आल्यानें त्या शहराचें वैभव वाढलें आहे. दिल्ली शहर हें मोठें ऐतिहासिक महत्त्वाचें ठिकाण आहे. प्राचीन काळापासून हिंदुस्तानची राजधानी म्हणून तें समजलें जाई. कलकत्त्याहून दिल्लीला राजधानी नेऊन इंग्रज सरकारनें हिंदी इतिहासाला मान दिला आहे, ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय.

पाठ पंधरावा.

हिंदुस्तानसरकारचें बजेट.

हिंदुस्तानचा खर्च सुमारें एकशेंचार कोटींचा आहे. उत्पन्नही सुमारें तितकेंच आहे. उत्पन्नाच्या मुख्य बाबी प्राप्तीवरील कर, जकात, प्रांतिक खंडण्या आणि रेलवे व मीठ ह्या आहेत. वर्षाच्या सुरवातीला म्हणजे १ मार्चच्या सुमारास असेंब्लीला बजेट सादर करितात. फडणीस एक मोठें भाषण करून एकंदर बजेटाची तोंडमिळवणी कशी केली किंवा करावी याची रूपरेषा देतो. नंतर साधारणपणें टीका करून सभासद कांहीं फरक सुचवितात. दुसऱ्या वाचनाचे वेळीं फरकांचा विचार होऊन, तिसरें वाचन झालें म्हणजे बजेट पास झालें असें समजतात.

बजेटमध्यें कांहीं जास्त खर्चाची तरतूद करण्याकरितां जें बिल केलेलें असतें त्याला फायनॅन्सबिल म्हणतात. या बिलानें कर वाढविण्याची योजना करितां येते. हें बिल दोन्ही कौन्सिलांत पास झालें म्हणजे व्हाइसरॉय यांची त्यावर सही होते. सही झाली कीं बिलाच्या अंमलबजावणीला सुरवात होते.

हिंदुस्तानसरकारचें बजेट म्हणजे हिंदुस्तान देशाचें बजेट असें कांहीं लोक समजतात, ही चूक आहे. हिंदुस्तानचें बजेट म्हणावयाचें

असेल तर त्यामध्यें मध्यवर्ती हिंदुस्तानसरकार, सर्व प्रांतिक सरकारें व संस्थानें यांचीं बजेटें घेतलीं पाहिजेत. शिक्षणावर हिंदुस्तानांत सरकार किती पैसा खर्च करतें म्हणून कोणीं विचारलें तर त्याला हिंदुस्तान-सरकारच्या बजेटांतील तेवढा आंकडा न घेतां संस्थानें व प्रांतिक सरकारें, हीं किती पैसा शिक्षणाला खर्च करीत असतात हेंही पाहिलें पाहिजे.

मिठावर दरमणीं सव्वा रुपाया कर असतो. प्राप्तीवर दोन हजारां-पासून पांच हजारांपर्यंत रुपायास पांच पै, पांच ते दहा हजारांपर्यंत सहा पै, दहा ते वीस हजारांपर्यंत नऊ पै, वीस ते तीस हजारांपर्यंत बारा पै, तीस ते चाळीस हजारांपर्यंत अठरा पै, असें कराचें प्रमाण वाढत गेलें आहे. प्रत्येक कंपनी व नोंदलेली पेढी यांची एकूण प्राप्ति कांहीं-ही असो, त्यांना रुपायाला अठरा पै कर द्यावाच लागतो. शिवाय पन्नास हजारांपेक्षां जास्त उत्पन्न होत असलेल्या कंपन्या व माणसें यांना लाखापर्यंत आणखी एक आणा, पुढें दीड लाखापर्यंत दीड आणा या प्रमाणांत जादा कर द्यावा लागतो. मुंबई इलाख्यामध्यें जादा कर देणारे लोक ५९९ असून कंपन्या ६५७ आहेत.

इ. स. १९२४–१९२५ सालचें म्हणजे १ एप्रिल १९२४ ते ३१ मार्च १९२५ पर्यंत होणाऱ्या उत्पन्न–खर्चाचें हिंदुस्तानसरकारचें बजेट खालीं दिलें आहे:—

अ. नं.	खातें	उत्पन्न	खर्च
१	जकात	४५•१०••••	८४••••
२	प्राप्तिपट्टी	१८२१••••	६५••••
३	मीठ	१•५४••••	१४५••••
४	अफू	४३४••••	२•९••••
५	प्रांतिक खंडणी	७७२••••	
६	लष्कर	२७५••••	६३••,••••
७	टांकसाळ	३६४••••	७७,••••

अ. नं.	खातें	उत्पन्न	खर्च
८	रेलवे	४२७००००	
९	पोस्ट व तार	१०६००००	७१००००
१०	व्याज	३१७००००	१८१५००००
११	संस्थानिकांची खंडणी	८७००००	
१२	अबकारी	४६००००	
१३	शेतसारा	४००००००	
१४	मुलकी खातीं	७३०००००	९८०००००
१५	स्टँप	२७०००००	
१६	जंगल	२२०००००	३४०००००
१७	कालवे	१२०००००	२३०००००
१८	पब्लिक वर्क्स्	१२०००००	
१९	किरकोळ	७०००००	४४८००००
२०	सिव्हिल कामें		२०६००००
२१	एकूण..	१०४६००००००	१०४५७००००

पाठ सोळावा.

हिंदुस्तानसरकारचें लष्कर.

हिंदुस्तानच्या तिन्ही बाजूंनीं पाणी व चवथ्या बाजूनें डोंगर असल्यामुळें या देशाचें शत्रूपासून संरक्षण करण्याचें काम फार सुलभ झालें आहे. तरी पण अद्यापपर्यंत रशियाच्या भीतीमुळें व आतां वझिरिस्तानमधील दंग्यांमुळें हिंदुस्तानसरकारला लष्कराकडे दरसाल सुमारें साठ कोटी रुपये खर्च करावा लागत आहे. सैन्याच्या मानानें इतर गोष्टींवर म्हणजे वैमानिक दल अगर आरमार यांप्रीत्यर्थ आपल्या सरकारला फारच कमी म्हणजे दोन्ही मिळून सुमारें तीन कोटी रुपये इतका खर्च येतो.

हिंदुस्तानसरकारचें खडें सैन्य तीन लक्ष दहा हजार आहे. त्यामध्यें सुमारें ९० हजार लोक युरोपियन आहेत. ब्रिटिश इन्फंट्री, (पायदळ), इंडियन इन्फंट्री, कॅव्हॅलरी (घोडेस्वार), आर्टिलरी (तोफखाना) आणि इतर, असे लष्कराचे मुख्य भाग आहेत. ब्रिटिश इन्फंट्रीमध्यें एकंदर पंचेचाळीस तुकड्या आहेत. प्रत्येक तुकडीमध्यें ८८४ लोक असतात. एका ब्रिटिश शिपायाकरितां सालीना सुमारें दोन हजार पांचशें रुपये खर्च येतो. हिंदी तुकड्या ८० असून प्रत्येकीमध्यें ७६६ शिपाई आहेत. याशिवाय वीस तुकड्यांना नेहमीं शिक्षण चालू असतें. या तुकड्या सहाशें रिक्रूटांच्या असतात. दर हिंदी शिपायाकरितां ६३१ रुपये खर्च येतो. याशिवाय बारा पायोनिअर (अघाडीच्या) तुकड्या असून ३४ हजार शिपाई राखीव सैन्यामध्यें आहेत.

घोडेस्वारांच्या ८ तुकड्या युरोपियन असून हिंदी तुकड्या (रेजिमेंटस्) एकवीस आहेत. आर्टिलरीमध्यें एकंदर २५३४८ लोक आहेत. त्यांपैकीं युरोपियनच जवळजवळ निम्मे आहेत; शिवाय सिग्नल (खुणा दाखविणारे) आणि चिलखती मोटारी असे दोन लष्करी भाग आहेतच.

अलीकडे गेल्या युद्धापासून वैमानिक दल ठेवण्याची जरूरी भासूं लागली आहे. विमानांमधून शत्रूच्या मुलखांत जाऊन वरून बॉंब फेंकून बरीच्च दंगल उडवितां येते.

लष्करामधील लोकांचें आरोग्य चांगलें राहावें म्हणून जागजागीं इस्पितळें चालू ठेविलीं आहेत. त्यांमध्यें एकंदर एकतीस हजार आजारी शिपायांची शुश्रूषा करतां येईल अशी तजवीज केलेली आहे. सैन्याच्या आरोग्याप्रीत्यर्थ डॉक्टर, नर्सेस (रोग्यांची शुश्रूषा करणाऱ्या बाया), हलक्या दर्जाचे नोकर, मिळून पंधरा हजार माणसें सरकारनें ठेविलीं आहेत.

हिशेबी काम करण्याकरितां प्रत्येक भागाला एक ऑफिस जोडलें आहे. या ऑफिसांकरितां सुमारें एक कोटि रुपये सरकार खर्च करितें.

लष्करावर देखरेख करण्याचा मुख्य अधिकार कमान्डर-इन्-चीफ याचा आहे. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी कौन्सिलचा हा एक सभासद असतो. फील्डमार्शल असा याचा हुद्दा आहे. त्याच्या हाताखालीं तीन जनरल असून सहा लेफ्टनंट जनरल आहेत. शिवाय चोवीस मेजर जनरल व ११० कर्नल असे एकंदर मोठे लष्करी अधिकारी आहेत. यांच्या हाताखालीं कॅप्टन्, सुभेदार, हवलदार व नाईक असे आणखी कमी दर्जाचे अधिकारी असतात.

अद्यापपावेतों हिंदुस्तानांतील लोक लष्करामधील वरच्या जागांवर काम करण्यास लायक झालेले नाहींत. तसे ते व्हावे म्हणून दोन हिंदी घोडेस्वारांच्या व सहा हिंदी पायदळांच्या तुकड्या एवढ्यावर हिंदी अधिकारी नेमण्यास सुरवात केली आहे व सव्वीस वर्षांनीं ह्या सर्व तुकड्या देशी होतील असा अंदाज आहे. हिंदी लोकांना लष्करी शिक्षण मिळावें म्हणून डेऱ्हाडून येथें एक लष्करी शाळा काढिली आहे. तेथें पन्नास विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. येथील चांगल्या दहा विद्यार्थ्यांची रवानगी विलायतेंत सँड्हर्स्ट कॉलेजांत होते. तेथून अभ्यासक्रम पुरा करून परत आल्यावर त्या लोकांना रॉयल कमिशन मिळतें; म्हणजे लष्करांत हुद्याची जागा मिळते.

पाठ सतरावा.

रेलवे.

रेलवे हें हिंदुस्तानसरकारचें सैन्याच्या खालोखाल खातें आहे. याच्या कारभारावर सरकारची देखरेख प्रत्यक्ष नसते. रेलवेची व्यवस्था

पहाण्याचें काम एका रेलवेबोर्डाकडे सोपविलें आहे. बोर्डाचा मुख्य अधिकारी असतो, त्याला चीफ कमिशनर म्हणतात. त्याची मुख्य कचेरी दिल्ली येथें आहे. प्रत्येक रेलवेचा एजंट म्हणून एक मुख्य अधिकारी असतो. हिंदुस्तानांत एकंदर दहा मोठ्या रेलवे कंपन्या आहेत. त्यांपैकीं नॉर्थ वेस्टर्न, औध रोहिलखंड आणि पूर्व बंगाल एवढ्या रेलवे आज सरकारी मालकीच्या आहेत. बाकीच्या म्हणजे बंगाल—नागपूर, जी. आय. पी., ईस्ट इंडियन, मुंबई—बडोदा, सदर्न मराठा, दक्षिण हिंदुस्थान व ब्रह्मदेश या व इतर बारीकसारीक रेलवे अद्यापि खाजगी कंपन्यांच्या मालकीच्या आहेत. या सर्व ठराविक मुदतीनंतर सरकारच्या ताब्यांत येणार आहेत. जी. आय. पी. रेलवेची मुदत आतांच भरली आहे.

एकंदर हिंदुस्तानांत रेलवेचा रस्ता सदतीस हजार मैल लांब पसरला आहे. सर्व रेलवेचें उत्पन्न ९७ कोटी सात लक्ष रुपयांचें आहे. हिंदुस्तानसरकारचें एकंदर उत्पन्न १०४ कोटी आणि रेलवेचें ९७ कोटी, म्हणजे जवळ जवळ सारखेंच म्हटलें तरी चालेल; रेलवेचा कारभार पहाणें हें हिंदुस्तानसरकार चालविण्याइतकें अवघड आहे. रेलवेचा खर्च ६७ कोटी असून भांडवलावरील व्याज २६ कोटी रुपये द्यावें लागतें. नुसत्या मुंबईइलाख्यामध्यें तीन रेलवे मिळून अडीच लक्ष लोक पोट भरीत आहेत. एकंदर सर्व रेलवेवर सवा सहाशें कोटी रुपये भांडवल घातलेलें आहे. रेलवेचा अर्धा भाग सांडेपांच फूट रुंदीचा असून बाकीचा मीटर ३ फूट $3\frac{3}{8}$ इंच रुंदीचा रस्ता आहे.

हिंदुस्तानांत रेलवे झाल्यानें प्रवास सुकर झाला आहे. एका भागांतील माणसांच्या संवयी व चालीरीति दुसऱ्या भागांतील माणसांना कळतात. आपला प्रांत सोडून उद्योगधंद्याकरितां लांब देशांतरालासुद्धां जाण्यास मनुष्य तयार होतो, कारण परत घरीं येणें आतां सुलभ झालें आहे.

यामुळें लोकांचे शरीरसंबंध लांबवर होऊं लागले आहेत, आणि त्यामुळेंच हिंदी लोकांमध्यें राष्ट्रीयत्वाची जाणीवही वाढत आहे. लांब राहाणारीं माणसें सोयरीधायरीं झालीं म्हणजे परस्परसंबंध जास्त येतात. एके ठिकाणीं धान्य पिकून फुकट जात असेल तर तें दुष्काळाचे ठिकाणीं नेऊन तेथील लोकांचे प्राण वांचवितां येतात. दुष्काळामध्यें रेलवेचीं कामें करून पुष्कळ लोकांना मजुरीवर गुंतवितां येतें. खेडेगांवांतील जिनसें, धान्य व फळफळावळ शहरांमध्यें नेऊन विकतां येते. शरिराच्या शिरा जशा काळजाला, तशा रेलवे शहराला उपयोगी आहेत. खेडेगांवांतून मुंबईसारख्या शहराला पूर्वीच्या बैलगाडीनें माल नेऊन पुरवितां येणार नाहीं. युद्धाच्या वेळीं सैन्याच्या हालचाली करण्याला रेलवेचा उपयोग फार होतो. जर्मनीसारख्या पाश्चिमात्य देशामध्यें रेलवेचें नुसतें जाळें पसरलें आहे.

आगगाड्या तीन प्रकारच्या आहेत. मेल, पॅसेंजर व मालगाड्या. मेलगाडीचे दर जास्त असतात. मालगाड्यांनीं सर्व प्रकारचा माल जातो. लगेजें व पार्सलें हीं पॅसेंजरगाड्यांतूनही जाऊं शकतात. साधारणपणें गाडीला पहिला, दुसरा, इंटर मिजिएट व तिसरा असे चार वर्ग असतात व त्यांचे अनुक्रमें दर मैलीं २४, १२, ७॥ व ४ पै भाडें आहे. तसेंच प्रत्येक तिकिटामागें अनुक्रमें ६०, ३०, २० व १५ शेर वजन मोफत नेतां येतें. मेलगाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या उतारूंना दर मैलीं ५ पै भाडें पडतें व २० शेर ओझें मोफत नेतां येतें. आगगाडी वेळेवर जातेच असें नाहीं पण वेळापत्रकांत दिलेल्या वेळेच्या अगोदर मात्र ती सुटणार नाहीं. आगगाडी चालू असतां कांहीं धोका वाटल्यास सांखळी ओढावी. ती विनाकारण ओढूं नये; तसें केल्यास पन्नास रुपये दंड होतो.

पाठ अठरावा.

पोस्ट व तारखातें.

सर्व हिंदुस्तानांत इकडून तिकडे हालचाली काय होतील त्यांची मध्यवर्ती म्हणजे दिल्लीसरकारला माहिती लॅागावी व लोकांचे निरोप, पत्रें वगैरे पाठविण्याची व्यवस्था नीट व्हावी म्हणून सरकारनें हें खातें सुरू केलें आहे. याचें मुख्य ऑफिस दिल्लीला असून हिशेबी काम कलकत्ता व नागपूर येथें चालतें. या खात्यावर व्यापारमंत्री म्हणून जो कार्यकारी कौन्सिलचा सभासद असतो त्याची देखरेख चालते. सर्व खात्याचा मुख्य अधिकारी डायरेक्टर जनरल ऑफ पोस्ट आणि टेलीग्राफ्स असतो. इलाख्याला एक प्रेसिडेन्सी पोस्टमास्तर असतो व त्याच्या हाताखालीं, सुमारें दर दोन जिल्हे मिळून एक सुपरिंटेन्डट असतो. बारीकसारीक पोस्टें तपासण्याकरितां प्रत्येक जिल्ह्यांत एक दोन तपासनीस अधिकारी असतात. त्यांस इन्स्पेक्टर म्हणतात.

साधारण मोठ्या ठिकाणीं एक पोष्ट असतें व त्याला आणखी लहान पोस्टें जोडिलेलीं असतात. या पोस्टांना सब् पोस्टें म्हणतात. सब पोस्टांना खेडेगांवांतून आणखी पोस्टें जोडिलेलीं असतात त्यांना ब्रँच पोस्टें म्हणतात. मोठ्या पोस्टावर मुख्य अधिकारी असतो त्याला पोस्ट मास्तर म्हणतात. याच्या दिमतीला कित्येक कारकून दिलेले असतात. खेडेगांवांतील ब्रँच पोस्टें बहुतेक ठिकाणीं शाळामास्तरांच्या ताब्यांत आहेत.कांहीं ठिकाणीं पोस्टखात्याचे ब्रँच पोस्ट मास्तरही आहेत.

टपाल नेण्याचें काम मुख्यत:आगगाडीच्या मार्गानें चालतें. ही सोय नसेल तेथें मोटार अगर टांगा यांची मदत घेण्यांत येते. अगदीं लहान गांवीं थैली नेणाऱ्या माणसाला 'रनर' म्हणतात. पत्रें वांटणाऱ्या माणसाला पोस्टमन म्हणतात. कांहीं ठिकाणीं तो रोज जाऊन पत्रें

वांटून येतो. व कांहीं ठिकाणीं तो आठवड्यांतून दोनदां अगर तीनदां जातो. खेडेगांवीं गेल्यावर आपण वेळेवर आल्याबद्दल कोणातरी सद्-गृहस्थाची सही घेऊन ती त्याला पोस्ट मास्तर यांस दाखवावी लागते.

पोस्टकार्ड अगर पाकीट पोस्टाच्या पेटींत टाकण्याच्या अगोदर पत्ता नीट वाचून पाहावा. चुकीचा पत्ता लिहिला तर पत्र मुंबईस डेड लेटर ऑफिसमध्यें जातें. तेथें तें कोणीं लिहिलें असावें याचा शोध होण्या-करितां फोडून वाचतात आणि लिहिणाऱ्याकडे परत करतात. पोस्टां-तील कोणाही अधिकाऱ्यास अगोदर पत्र वाचण्याची व वाचल्यास तो मजकूर इतरांना सांगण्याची सक्त मनाई आहे. पोस्टकार्डाला हल्लीं अर्धा आणा पडतो. पाकिटाला एक आणा हांशील पडतें. पाकिटाचें वजन अडीच तोळ्यांपेक्षां जास्त असेल तर प्रत्येक अडीच तोळ्यांच्या वजनास किंवा त्याच्या भागास एक आणा हांशील जास्त भरावें लागतें. एखाद्या पाकिटाचें वजन ५। तोळे असेल तर तीन आण्यांचीं तिकिटें लावावयास पाहिजेत.

कांहीं वस्तु बुकपोस्टानें अगर सँपल पोस्टानें पाठवितां येतात. पांच तोळे वजनास अगर त्याचे भागास अर्धा आणाच भरावा लागतो. पार्सल पाठविणें झाल्यास वीस तोळेपर्यंत दोन आणे, चाळीस तोळेपर्यंत तीन आणे व पुढें प्रत्येक चाळीस तोळ्यांस किंवा त्याच्या भागास तीन आण्यांचीं तिकिटें लावावीं. कोणतेंही पाकीट अगर पार्सल दोन आणे फी दिल्यास रजिस्टर केलें जातें. रजिस्टर पत्र जास्त सुरक्षित राहातें. वर आणखी एक आणा भरल्यास तें पोंचल्याबद्दल आपणांला मालकाकडून परत पावती आणून दिली जाते. रजिस्टर पत्राकरितां पोस्टाचीं स्वतंत्र पाकिटें तीन आणे किंमतीस लहान व साडेतीन आणे किंमतीस मोठीं मिळतात. तीं विशिष्ट तऱ्हेचीं असल्यामुळें पोस्टांतील माणसांना ओळखतांना चूक होण्याचा संभव कमी असतो, म्हणून तींच वापरावीं. मौल्यवान वस्तूंचें पार्सल

करणें झाल्यास किंवा फार महत्त्वाचे कागद पाकिटांतून पाठविणें झाल्यास त्यांचा विमा उतरावा. विम्याला वाजवी हाशील व रजिस्टर फी भरून शिवाय दर १०० रुपयें किंवा या रकमेच्या भागास दोन आणे किंमत पडते. पत्राला मोहोर करावी लागते. व तिच्यामध्यें कांहीं कमीजास्त झाल्यास मालकाला जेवढ्या रकमेचा विमा उतरला असेल तेवढी रक्कम भरून मिळते.

पाठ एकोणिसावा.

पोस्ट व तारखातें (पुढें चालू).

व्यापाराच्या अगर खासगी निमित्तानें कोठें पैसे पाठवावयाचे झाल्यास ते पोस्टमार्फत मनीऑर्डरनें पाठवितां येतात. पत्ता अपुरा लिहिला तर मनीऑर्डर परत येते. अर्थात् भरलेलें हांशील फुकट जातें. हांशिलाचे दर पुढें दिल्याप्रमाणें आहेत. दहा रुपये किंवा त्याचे कोणतेही भागास दोन आणे व दहापेक्षां अधिक पण पंचवीसपेक्षां अधिक नाहीं अशा कोणत्याही रकमेस चार आणे हांशील भरावें लागतें.

सेव्हिंग्ज् बँक:—अगदीं गरीब मनुष्यालासुद्धां दोन पैसे संग्रहीं ठेवून आपल्या वृद्धापकाळची तजवीज करतां यावी आणि प्रसंगविशेषीं उपयोग व्हावा म्हणून सब् पोस्ट असेल तेथें व कांहीं लहान पोस्टांमध्येंसुद्धां सेव्हिंग्ज् बँक उघडण्याची व्यवस्था सरकारनें केली आहे. थोडथोडे पैसे शिल्लक टाकण्यानें मनुष्याला काटकसरीनें वागण्याची संवय लागते. प्रत्येकानें थोडथोडें भांडवल औद्योगिक कामाकडे गुंतविलें म्हणजेच भांडवल जमतें. आणि साधारण सुखी लोकांनींसुद्धां आपले शिलकीचे पैसे दागिन्यांत गुंतवून ठेवण्यापेक्षां अगर पुरून ठेवण्यापेक्षां बँकेंत ठेविले तर पैशानें पैसा वाढतो. बँकेचें व्याज अगदीं बेताचें असतें. परंतु

आपला पैसा सुरक्षित राहातो, अडचणीला तो घेतां येतो व सारखा बँकेंत राहिला तर पंचवीस वर्षांनीं त्याची दामदुप्पट होते. शंभर रुपयांचें सोनें घेऊन त्याचे सल्ले केले आणि वापरले तर पंचवीस वर्षांनीं त्यांतील कांहीं मासे सोनें झिजून जाईल. ते हरवण्याची अगर अन्यमार्गानें नाहींसे होण्याची भीति तर असतेच; पण तेच शंभर रुपये बँकेंत ठेविल्यानें पंचवीस वर्षांनीं त्याचे दोनशें होतील. पुरून ठेविले तरी तितकेच राहतील. पोस्टामधील बँकेमध्यें पैसा ठेविल्यानें तो जास्त सुरक्षित राहातो.

अठरा वर्षांचे आंतील मुलाचे पैसे पालन करणाऱ्याच्या नांवानें ठेवितात. एकाच माणसाला दोन खातीं ठेवितां येत नाहींत. एकाच खात्यावर पांचहजारांपेक्षां जास्त रक्कम ठेवीत नाहींत व एकाच वर्षामध्यें सातशें पन्नास रुपयांपेक्षां जास्त रक्कम घेत नाहींत. एकावेळीं चार आणे किंवा जास्त रक्कम भरतां येते. हिशेबाचें बुक वर्षांतून एकदां व्याजाच्या हिशेबाकरितां पोस्टाकडे पाठवावें लागतें.

तारः—पत्र लवकर पोहोंचत नाहीं म्हणून तारेची सोय करण्यांत आलेली आहे. यायोगानें आतां एका प्रांतामधून दुसऱ्या प्रांतामध्येंच नव्हे तर परदेशाशींसुद्धां दळणवळण सोपें व सोयीचें झालें आहे. तारेचे दोन प्रकार आहेत; एक साधी व दुसरी जरूरीची. जरूरीची तार ताबडतोब जाते. तिला हांशीलही दुप्पट पडतें. रविवारची तार करावयाची असेल तर ती जरूरीचीच करावी लागते. साध्या तारेला फार विलंब लागतो. कधीं कधीं साध्या पत्राच्याही पाठीमागून ती जाते. अगदीं खेडेगांवीं तार पाठवावयाची असेल तर तारेच्या स्टेशनापासून पुढें लागणाऱ्या मजुराला देण्याचे पैसे अगोदर भरावे. नाहींपेक्षां ती पोस्टमनबरोबर रवाना होते. तार ऑफिस मोठ्या पोस्टांनाच जोडलेलें असतें.

कोयनेलः—पोस्टखात्यामार्फत गरीब लोकांना कोयनेल पुरवि-

ण्याची सोय सरकारनें केली आहे. ब्रिटिशहिंदुस्तानांत असें एकही गांव आढळणार नाहीं कीं, तेथें आठवड्यांतून एकदां तरी पोस्टमन जात नाहीं. पोस्टमनबरोबर जशीं कार्डें पाकिटें ठेविलेलीं असतात तसेंच कोयनेलही असतें. अतिशय माफक रीतीनें कोयनेल विकण्याची सोय सरकारनें केली आहे. आपल्या देशांतील हवा उष्ण असून पावसामुळें तीं दमट होते आणि हिंवतापाचा उपद्रव फैलावतो. दरसाल दहालक्ष लोक नुसत्या हिंवतापानें मृत्युमुखीं पडतात. कोयनेल हें मलेरिया अगर हिंवताप यांवर रामबाण औषध आहे असें एक वेळ तें घेतल्यानें आपल्या अनुभवास येतें.

पाठ विसावा.

कायदेमंडळें.

हिंदुस्तानसरकार मुख्यतः विलायतेंतील स्टेट-सेक्रेटरीला जबाबदार धरिलें जातें. तरीपण नवीन सुधारणांमुळें त्याच्यावर लोकमताचें दडपण पडत आहे. हिंदुस्तानसरकारला एकंदर तीन कौन्सिलें जोडिलीं आहेत. एक कौन्सिल ऑफ स्टेट, दुसरें लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व तिसरें नरेंद्रमंडळ. यांपैकीं कोणत्याही कौन्सिलचा ठराव स्वीकारण्यास हिंदुस्तानसरकार बांधलेलें नाहीं. तरीपण सनदशीर राज्यकारभारामध्यें मुरलेल्या इंग्लिश लोकांना प्रातिनिधिक संस्थांचें मत फेंकून देऊन राज्यकारभाराचें सुकाणूं हांकण्याची पाळी आली तर त्यांना तो एक अनिष्ट प्रसंगच वाटेल. आणि म्हणूनच कौन्सिलनें केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यास सरकार बांधलें नसलें तरी शक्य तितक्या ठरावांची अंमलबजावणी करण्यांत येते. व एकाद्या लोकोपयोगी सरकारी बिलाला कौन्सिलांची संमति मिळाली नाहीं तर सर्टिफिकेशनचा उपयोग करून सरकार त्या बिलाची अंमलबजावणी करतें.

शांतता आणि सुव्यवस्था या दोन गोष्टींवर देशाची सर्व मदार आहे. या शाबूत ठेवण्याचें काम सरकार न करील तर तें कर्तव्यपराङ्मुख झालें असें म्हणावें लागेल. लोकपक्ष व सरकार या दोघांना शांतता व सुव्यवस्था पाहिजे असते. परंतु आपल्या देशांत लोकपक्षाला अद्यापि प्रातिनिधिक संस्थांच्या साहाय्यानें सनदशीर राज्यघटना कशी चालवावी, याची अनुभवशीर माहिती नाहीं. एकाद्या वेळेला लोकपक्ष भलत्याच बाजूला जाऊन चांगल्या व जरूरीच्या योजनेला विरोध करील तर त्या वेळीं व्हॉइसरॉय यांस प्रसंगीं उपयोगी पडावा म्हणून सर्टिफिकेशनचा अधिकार देऊन ठेविला आहे. त्याअन्वयें कायदा योग्य व जरूर आहे असें सर्टिफिकेट देऊन मग तो जरी एकाद्या कौन्सिलांत नापास झाला असला तरी त्याला कायद्याचें स्वरूप देतां येतें.

कोणताही कायदा प्रथम एका सभेंत आणिला जातो. त्यावर त्रिवार चर्चा झाली, कीं मग तोच दुसऱ्या कौन्सिलमध्यें आणितात. तेथें चर्चा होऊन तो पास झाला म्हणजे गव्हर्नर जनरल त्यावर सही करतो. सही झाल्या दिवसापासून त्याची अंमलबजावणी सुरू होते. गव्हर्नरला व्हेटो देण्याचा म्हणजे कायदा न स्वीकारण्याचा अधिकार आहे. मात्र तो त्याचा उपयोग फार दूरवर विचार करून क्वचित् प्रसंगीं करतो.

सरकारनें आणिलेलें एकादें बिल असेंब्लींत अगर स्टेट कौन्सिलमध्यें पास होत नसेल तर दोन्ही सभा एके ठिकाणीं बोलवाव्या आणि मग चर्चा करावी अशीही व्यवस्था केली आहे. परंतु हा मार्ग क्वचित् धरिला जातो. सर्टिफिकेशन जोडून व शक्य तितका फेर करून तोच कायदा पुन्हा चर्चेला मांडितात आणि पास झाला तर ठीकच; नाहींतर त्याला सर्टिफिकेट जोडून गव्हर्नर जनरल सही करतो व कायद्याची अंमलबजावणी सुरू होते.

सरकार कधीं कधीं नरेंद्रमंडळाची सभा बोलावतें. ब्रिटिश प्रजा-

जनांना या मंडळाशीं विशेष कर्तव्य नाहीं. संस्थानिक लोकांचें हें मंडळ आहे. संस्थानिक प्रजेशीं आपला संबंध थोडा येतो आणि संस्थानिक काय करतात इकडे आपलें लक्ष असतें आणि आपण काय करतों इकडे त्यांचें लक्ष असतें. तरी पण असेंब्ली व स्टेट कौन्सिल यांचें काम लोकांच्या नजरेस येऊं लागलें आहे, तसें नरेंद्रमंडळाचें नाहीं.

पाठ एकविसावा.

स्टेट कौन्सिल.

हिंदुस्तानसरकारला दोन कौन्सिलें जोडिलीं आहेत हें मागील पाठांत सांगितलें. त्यांपैकीं वरच्या कौन्सिलला कौन्सिल ऑफ-स्टेट अगर स्टेट कौन्सिल म्हणतात. ही एक वरच्या म्हणजे धानिक लोकांची सभा आहे, असें मानावयास हरकत नाहीं. या सभेच्या संमतीखेरीज कोणताही कायदा पास समजला जात नाहीं. या सभेचा अध्यक्ष व चार उपाध्यक्ष यांच्या नेमणुका गव्हर्नर जनरल करतो.

स्टेट कौन्सिलच्या सभासदांची संख्या साठ आहे. यांपैकीं तेहतीस सभासद लोकनियुक्त असून सत्तावीस सरकार नेमितें. या सत्ताविसां-पैकीं वीस सरकारी नौकरींतील अधिकारी असतात. वऱ्हाडनें निवडून दिलेल्या व इतर बिन अधिकारी लोकांचा समावेश बाकीच्या सहामध्यें होतो. आपल्या मुंबई इलाख्यातर्फे सहा लोक निवडून द्यावयाचे असतात. त्यांपैकीं ३ मुसलमानेतर, २ मुसलमान व १ मुंबईच्या चेंबर ऑफ कामर्सनें म्हणजे व्यापारी संस्थेनें निवडून द्यावयाचा, अशी वर्गवारी केलेली आहे. स्टेट कौन्सिलच्या सभासदाच्या नांवामागें 'नामदार' हें उपपद लावितात.

इतर मतदारसंघांप्रमाणेंच स्टेट कौन्सिलच्या मतदारांचे मुसलमानेंतर मतदार व मुसलमान मतदार असे निराळे संघ बनविले आहेत. मतदार दोन हजार रुपये सगर जास्त वसूल येईल अशा गांवचा जहागिरदार अगर खोत असला पाहिजे, किंवा तितकीच पट्टी भरणारा जमीनदार असला पाहिजे; किंवा तीस हजार अथवा त्याहून जास्त उत्पन्नावर इन्कमटॅक्स देणारा असला पाहिजे. मतदाराचें वयही एकवीस किंवा त्यापेक्षां जास्त असलें पाहिजे. शहर म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष अगर उपाध्यक्ष, जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष व कौन्सिलचे हल्लींचे व पूर्वीचे सर्व लोकनियुक्त सभासद, महामहोपाध्याय व शम्-सुल-उलेमा या पदव्या मिळालेले शास्त्री व मुलाणी इतक्यांना स्टेट कौन्सिलच्या उमेदवाराला मत देतां येतें.

स्टेट कौन्सिलला उमेदवार उभें राहावयाचें असेल तर तो त्या सभेचा मतदार असून त्याचें वय पंचवीस अगर त्यापेक्षां जास्त पाहिजे. त्याला कोणत्याही फौजदारी गुन्ह्याबद्दल सहा महिन्यांपेक्षां जास्त शिक्षा झाली असल्यास, शिक्षा भोगून पांच वर्षें झालीं असलीं पाहिजेत. वेडे, दिवाळखोर व्यापारी, सनद रद्द झालेले वकील, यांना उमेदवार म्हणून उभें राहातां येत नाहीं. स्त्रीलाही स्टेट कौन्सिलच्या उमेदवारीकरितां अर्ज करितां येत नाहीं.

या स्टेट कौन्सिलची रचना इंग्लंडमधील उमरावांच्या सभेप्रमाणेंच आहे. ती फार मोठी आहे आणि आमचें स्टेट कौन्सिल निवडणुकीच्या मदतीनें फक्त साठ लोकांचें सुटसुटीत केलेलें आहे. तेथें सर्वच उमराव सभेंत येऊन बसतात; तर येथें आमच्याकडील श्रीमंत लोक आपले प्रतिनिधि निवडून देतात. म्हणजे स्टेट कौन्सिल हें बड्या लोकांचेंच कौन्सिल आहे, हें उघड होतें. इंग्लंडमध्यें उमरावांची सभा साधारणपणें लोकसभेच्या विरुद्ध जात नाहीं. स्टेट कौन्सिल मात्र कित्येक वेळेला खालील सभेच्या उलट निर्णय देऊं शकतें; परंतु पूर्ण स्वराज्य मिळाल्यावर

खालील सभेचा दर्जा वाढेल आणि मग स्टेट कौन्सिलला सहसा त्या सभेच्या विरुद्ध मत देऊन चालणार नाहीं. आणि असा काळ लवकरच येईल अशी आशा ज्यांनीं शेवटीं दिलेला बादशाही जाहीरनामा वाचला आहे त्यांना करावयास हरकत नाहीं. स्टेट कौन्सिलची फेर निवडणूक पांच वर्षांनीं व्हावयाची असते.

पाठ बाविसावा.

लेजिस्लेटिव्ह असेंब्ली.

हिंदुस्तानांत सर्वांत जास्त महत्त्वाची प्रातिनिधिक संस्था लेजिस्लेटिव्ह असेंब्ली आहे. विलायतेंतील पार्लमेंटइतके सभासद नसले तरी कामाकाजाची पद्धति व वजनदारपणा यांमध्यें ती पार्लमेंटच्याहीपेक्षां वरही ताण करूं शकेल. असेंब्लीचे एकंदर सभासद एकशें चव्वेचाळीसंच आहेत. ही संख्या लहान असल्याकारणानें असेंब्ली ही एक सुटसुटीत संस्था झाली आहे. शिवाय इतक्या सभासदांपैकीं सुमारें चाळीस सरकार नेमितें. त्यांतील निम्मे तरी बिनसरकारी सभासद असतात. यांमध्यें उत्तम लोक निवडण्याचें सरकारनें ठेविलेलें धोरण प्रशंसनीय आहे. गेल्या निवडणुकीनंतर मुंबईचे सर चिमणलाल सेटलवाड यांना सरकारनें निवडलें आहे. यावरूनच वर सांगितलेली गोष्ट चांगली प्रत्ययास येते.

लोकनियुक्त सभासद फक्त एकशें चार आहेत. तीस कोटी लोकांमधून शोधून काढिलेली ही मंडळी विद्वत्ता व कार्यक्षमता यांमध्यें जगांतील कोणत्याही सभेची बरोबरी करील. प्रत्येक सभासदाच्या पाठीमागें लोकसेवायुक्त तपश्चर्येचें पाठबळ असतेंच. फक्त प्रातिनिधिक संस्थांची परंपरा कमी असल्यामुळें या लोकांच्या हातून थोड्या चुका होतील;

परंतु सरकारनें यांना योग्य वळण लावण्याकरितां विलायतेंतील पार्लमेंटच्या कामकाजांतील एका तज्ज्ञाची असेंब्लीच्या अध्यक्षाच्या जागीं नेमणूक केली आहे. असेंब्लीचे पहिले अध्यक्ष सर फ्रेडरिक व्हाईट यांनीं आपलें काम चोख आणि सहानुभूतिपूर्वक करून हिंदुस्तानांतील मतदारांना ऋणी करून ठेविलें आहे.

मुंबई इलाख्यामधून असेंब्लीकरितां एकंदर सोळा सभासदांची निवडणूक होते. त्यांची वांटणी खालीं दिली आहे.मुसलमानेतर सात,मुसलमान चार, युरोपियन दोन, सरदार,इनामदार एक,मुंबई शहरच्या व्यापाऱ्यांतर्फे एक व मुंबई इलाख्यांतील सर्व गिरणीवाल्यांचा एक. मतदारांचे मुसलमान व मुसलमानेतर असे दोन गट केले आहेत. सालीना ७५ रुपये सारा देणारा जमीनदार, प्राप्तीवरील कर देणारा, कौन्सिलचे माजी बिन सरकारी सभासद, मुंबई कार्पोरेशनचा अध्यक्ष व इतर म्युनिसिपालिट्यांचे व जिल्हा लोकलबोर्डांचे बिनसरकारी अध्यक्ष व उपाध्यक्ष, विश्वविद्यालयाच्या सेनेटचे सभासद अगर त्याचे साधे व सन्मान्य फेलो, तसेंच शमसुल-उलेमा किंवा महामहोपाध्याय या पदव्या मिळालेले लोक, यांना मत देण्याचा अधिकार आहे. रत्नागिरी, पंचमहाल व अपर सिंध फ्रांटिअर हे जिल्हे कंगाल असल्याकारणानें येथें निम्में म्हणजे फक्त ३५ रुपये ८ आणे सारा देणाऱ्यांचा समावेश मतदारांच्या यादींत होतो.

असेंब्लीची निवडणूक झाल्यावर चार उपाध्यक्ष निवडावयाचें काम असतें. त्याच्या अगोदर साम्राज्य–सम्राटशीं राजनिष्ठ असल्याची शपथ देण्यांत येते. ही शपथ देण्याचें काम अध्यक्ष करतो. सरकारनें नेमिलेला पहिला अध्यक्ष चार वर्षें मुदतीचा आहे. याच्यापुढें येणारा अध्यक्ष सभासदांनीं निवडलेला असावयाचा. नवीन निवडणूक होईपर्यंत जुना अध्यक्षच काम करील. असेंब्लीमध्यें अध्यक्ष चोपदाराच्या पुकाऱ्यामध्यें येतो. चोपदाराच्या हातांत राजदंड असून तो अध्यक्षाच्या पुढें

चालतॅो. या अध्यक्षाच्या दर्जाचा अधिकारी पार्लमेंटमध्यें आहे. त्याला स्पीकर म्हणतात. त्याच्या तर आंगरख्याचा झोल धरण्याकरितां आणखी पाठीमागें एक माणूस असतो. असेंब्लीच्या अध्यक्षाच्या अंगांत फिकट मळकट रेशमाचा लांब अस्तन्यांचा झगा असून डोक्यावर पांढुरक्या केंसांचा टोप असतो. टोपाच्या बाळया कानावरून खालीं लोंबीकळत असतात. अध्यक्ष स्वतः शपथ घेऊन ती दुसऱ्यांना देतो. असेंब्लीचें काम सुरू झालें म्हणजे तें साधारणपणें दीड एक महिना चालतें. वर्षांतून तिची दोनदां बैठक होते. एक फेब्रुआरीमध्यें व दुसरी सप्टेंबरमध्यें. क्वचित् मध्यंतरीं एकादा कायदा होणें अत्यंत जरूर असलें तर थोडे दिवस केव्हांही गव्हर्नर जनरल असेंब्लीची जादा बैठक भरवितो.

असेंब्लीच्या सभासदाला एम्. एल्. ए. असा किताब लावितां येतो. या किताबांचा अर्थ लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचा मेंबर असा आहे.

पाठ तेविसावा.

मुंबई प्रांतिक सरकार.

मुंबई इलाख्यावर मुख्य अधिकारी गव्हर्नर असतो. त्याच्या मदतीला कार्यकारी कौन्सिल असतें. त्याच्या मदतीनें गव्हर्नर राखीव खात्यांचा कारभार पाहातो. राखीव खातीं म्हणजे लोकांनीं निवडलेल्या दिवाणांकडे जीं खातीं सोपविलीं नाहींत तीं. पूर्वी सांगितल्याप्रमाणें शांतता व सुव्यवस्था राहावी म्हणून कांहीं खात्यांची जबाबदारी गव्हर्नरवर टाकिलेली आहे. प्रान्तिक कालवे, शेतसारा, दुष्काळनिवारण, न्याय, पोलीस, तुरुंग, कर-वसुली, सरकारी कर्ज वगैरे राखीव खातीं आहेत. ह्या खात्यांसंबंधीं जास्त खुलासा पुढील पाठामध्यें केला आहे. राखीव खात्यांवर खातेवारी खर्च किती होतो हें तेथें दाखविलें आहे.

एकंदर चार कार्यकारी कौन्सिलर आहेत. वरील राखीव खात्यांचे गट करून त्यांची वांटणी या चौघांमध्यें केली आहे. एकाला रेव्हिन्यु मेंबर, दुसऱ्याला होम मेंबर, तिसऱ्याला फायनॅन्स् (हिशेब) मेंबर व चवथ्याला मिसलेनिअस् (किरकोळ) मेंबर म्हणतात. पहिला मुख्यतः सरकारी वसूल करणारें मुलकीखातें व इतर कांहीं खातीं पाहातो. दुसरा होम मेंबर, हा महत्त्वाचा मेंबर समजला जातो. कारण राजकारणामधील गुंतागुंतीचे सर्व प्रश्न सोडवितांना याच मेंबरची सल्ला गव्हर्नर घेतो. याच्याकडे न्याय व पोलीस हीं मुख्य खातीं असतात. तिसरा फायनॅन्स् मेंबर. याचें काम तर फार महत्त्वाचें आहे. कारण कोणतीही गोष्ट पैशाखेरीज होत नाहीं. पैसा आहे किती? नवीन येईल किती? तूट पडली तर ती भरून काढावी कशी? या सर्व प्रश्नांचा विचार याच्याकडे असतो. चवथा मेंबर किरकोळ खात्यांचा. एकादी नवीन योजना करावयाची असली म्हणजे ती याच्याकडे येते. गेल्या सालीं या खात्याचे मेंबर सर चिमणलाल सेटलवाड यांच्याकडे सक्कर च्या धरणाचें काम होतें. एकाद्या नवीन कराची योजना करावयाची झाल्यास ती फायनॅन्स् मेंबर करितो. एकंदर या चार सभासदांपैकीं दोन तरी म्हणजे निमे हिंदी असावेत असा नियम आहे.

राखीव खातीं सोडिलीं म्हणजे बाकी सर्व सोपीव आहेत. हीं सोपीव खातीं पाहाण्याकरितां जे जबाबदार लोक असतात त्यांना दिवाण म्हणतात. लोकनियुक्त सभासदांमधून आपल्या इलाख्यांत तीन दिवाणांची निवड होते. या तीन दिवाणांपैकीं एकाला एज्युकेशन (शिक्षण) दिवाण, दुसऱ्याला जंगल व एक्साइजचा दिवाण व तिसऱ्याला स्थानिक-स्वराज्य दिवाण म्हणतात. या दिवाणांकडेसुद्धां हीं मुख्य खातीं देऊन शिवाय बारीकसारीक इतर खातींही दिलीं आहेत.

अशा रीतीनें आपल्या मुंबईसरकारचे दोन भाग झाले असून त्यांचा परस्पर इतका संबंध आहे, कीं दिवाणांनीं व कार्यकारी कौन्सिलरांनीं एकत्र

बसून विचारविनिमय केल्याखेरीज राज्याचें तारूं सुरक्षित चालणें शक्यच नाहीं व तसें ते करितातही. ही थोडी गैरसोयीची द्विदल राज्यपद्धति स्वीकारण्याचें कारण आपण प्रातिनिधिक संस्था पूर्वी चालविल्या नसल्याकारणानें आपणांवर पूर्ण जबाबदारी टाकितां येईना हें होय. आतां थोड्याच अवकाशांत ही गैरसोयीची पद्धति नाहींशी होईल. कारण संक्रमणकाळाकरितां केलेली योजना कधींही कायम टिकत नसते. एक माघार तरी घ्यावी लागेल किंवा पुढें तरी जावें लागेल. माघार घ्यावी अशी सरकारची व लोकांची इच्छा नाहीं. शिवाय हिंदी लोक शिकवून तयार न होण्याइतके मंद नाहींत; तेव्हां ते तर आपली लायकी दाखविणार आणि या प्रान्तिक द्विदल राज्यपद्धतीचें पर्यवसान लवकरच प्रान्तिक स्वायत्ततेमध्यें होणार हें निश्चित समजावें.

२५५१

पाठ चौविसावा.

ग्रंथ संग्रहालय ..... नं. .....

मुंबईसरकारचें उत्पन्न व खर्च.

बजेट म्हणजे काय हें पूर्वी सांगितलेंच आहे. आतां मुंबईसरकारचें उत्पन्न व खर्च यांची कल्पना यावी म्हणून पुढें कांहीं वर्षांचे आंकडे दिले आहेत:—

१९२२–२३ सालचें आंकडे.

उत्पन्न	१४,१७,२२,६६६
खर्च	१३,५३,१७,२६६
शिल्लक	६४,०५,४००

१९२३-२४ सालचें अंदाजी बजेट.

उत्पन्न	१५,१९,०३,०००
खर्च	१५,७२,१७,०००
तूट	५३,१४,०००

१९२३-२४ सालचें सुधारलेलें बजेट.

उत्पन्न	१४,६९,७२,०००
खर्च	१५,४७,७२,०००
तूट	७८,००,०००

१९२४-२५ सालचें अंदाजी बजेट.

उत्पन्न	१५,८२,७७,०००
खर्च	१६,०२,३९,०००
तूट	१९,६२,०००

थोडीबहुत तूट येते ती कांहीं खर्चाचीं कामें अनेक कारणांमुळें होत नाहींत यामुळें, व काटकसरीनें भरून निघते.

साधारणपणें उत्पन्न व खर्च यांची तोंडमिळवणी कशी तरी होते. यापेक्षां आणखी खर्च करण्यास सरकारजवळ पैसा नाहीं हें वर दिलेल्या आंकड्यांवरून उघड होतें. सक्तीचें शिक्षण, आरोग्य व पाटबंधारे यांना अद्यापि कितीतरी पैसा पाहिजे आहे. कर वाढविल्याखेरीज तो आतां मिळणें शक्य नाहीं. उमेदवार लोक मतदारांना कर न वाढविण्याची हमी देऊन निवडून येतात. परंतु जर कर वाढवावयाचा नाहीं तर सुधारणा तरी कशी होणार? आपल्या मुंबई इलाख्यामध्यें जो राज्यकारभार दर माणशीं साडेसात रुपये खर्चून होतो तेवढ्यासच विलायतेंत साठ रुपये खर्च येतो. यावरून आपला राज्यकारभार काटकसरीनें चालला आहे

हें सिद्ध होतें. म्हणून योग्य कारणाकरितां जास्त करसुद्धां देण्याची तयारी लोकांनीं दाखविली पाहिजे.

पुढें मागील सालच्या खर्चाचे व या सालच्या अंदाजी उत्पन्नाचे खातेवार आंकडे दिले आहेत. त्यांवरून सरकारच्या उत्पन्नाची व खर्चाची विशेष कल्पना होईल.

खातें	राखीव खर्च	सोपीव खर्च
जमीनमहसूल ...	६२,७७,०००	....
एक्साइज ...	...	२२,०७,०००
स्टँप्स् ...	६,३२,०००	...
जंगल ...	...	४२,९७,०००
रेजिस्ट्रेशन ...	...	७,४३,०००
इरिगेशन ...	९८,६८,०००	...
जनरल व्यवस्था ...	९३,१०,०००	....
न्याय ...	५८,७१,०००	....
तुरुंग व गुन्हेगार वसाहती ...	२५,६९,०००	....
पोलीस ...	१,७३,९३,०००	...
बंदरें व धक्के ...	३६,०००	...
शास्त्रीय खातीं ...	...	६७,०००
शिक्षण ...	६,४९,०००	१,७४,२०,०००
वैद्यकखातें ...	८,०००	३६,८७,०००
आरोग्य ...	...	१९,२०,०००
शेतकी आणि गुरांचे दवाखाने ...	...	२३,१४,०००
औद्योगिक ...	...	३,२६,०००
किरकोळ ...	३,७७,०००	१९,०००
लोकोपयोगी ...	३,०४,०००	१,०२,७८,०००
दुष्काळनिवारण ...	३१,६०,०००	...
पेन्शन आणि अलॉन्सेस्	५१,०६,०००	...
छपाई ...	१३,४९,०००	२,८५,०००
सटरफटर	१४,५०,०००	१९,८३,०००
एकूण...	६,४३,५९,०००	४,५५,४६,०००

खातें		उत्पन्न १९२४।१९२५
जमीन महसूल	...	५,७६,००,०००
अबकारी	...	४,०२,००,०००
कालवे	...	६२,००,०००
स्टँप्	...	१,७०,००,०००
जंगल	...	१,२०,०८,०००
न्याय	....	१४,००,०००
भाडेनाकीं	....	१५,००,०००
रेजिस्ट्रेशन	....	१३,००,०००
पेन्शनफंड	....	१३,००,०००
किरकोळ	....	९७,७७,०००
	एकूण...	१५,८२,७७,०००

वर दिलेल्या आंकड्यांवरून राखीव व सोपीव खातीं कशीं आहेत याचीही कल्पना येईल. खर्चाचे आंकडे देतांना कर्ज काढण्यास केलेला खर्च, व्याजीं दिलेल्या रकमा, विलायतेंत मुंबईसरकारनें केलेला खर्च हे सर्व आंकडे सोडले आहेत.

पाठ पंचविसावा.

जमीनमहसूल.

लोकांच्या रक्षणाकरितां तसेंच त्यांच्या सुधारणेकरितां सरकार पोलीस ठेवितें, शाळा चालवितें व तंटे मोडण्याची व्यवस्था करितें. या कामाकरितां सरकारला पैसा लागतो. तो सरकार निरनिराळ्या करांच्या रूपानें रयतेपासून वसूल करितें. कर दोन प्रकारचे असतात. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष. "जो कर आपण स्वतः भरतों त्याला प्रत्यक्ष कर म्हणावें. जमिनीवरील कर आपण स्वतः भरतों. म्हणून त्याला प्रत्यक्ष

कर म्हणावयाचें. पण मिठावरील कर आपण भरीत नाहीं. तें जेथें तयार होतें तेथेंच मिठागरावर तो भरला जातो. आपल्याला मात्र करामुळें तें महाग पडतें. म्हणजे एकंदरींत महागाईच्या रूपानें तो कर आपल्याच खिशांतून जातो; पण कर भरणारास त्याची जाणीव होत नाहीं म्हणून तो अप्रत्यक्ष कर होय.

मुंबई सरकारच्या उत्पन्नापैकीं तिसऱ्या हिश्शापेक्षां जास्त उत्पन्न निवळ जमिनीवरील कराचें आहे. जमिनीवर कर बसवितांना साधारण शेतकरी दोन बैलांच्या मदतीनें जेवढी शेती करील अशा जमिनीचा एक नंबर करून एकंदर जमीन मोजण्यांत येते. व अशा प्रत्येक भागाला सर्वे नंबर देण्यांत येतो. यानंतर नंबरांचें वर्गीकरण होऊन त्यांची आणेवारी लावण्यांत येते. एकादी जमीन उत्तम असेल तर, म्हणजे मातीचा प्रकार, तिची खोली, पर्जन्यमान, पाणी मुरून राहाण्याची शक्यता या सर्व गोष्टी अनुकूल असल्या, तर ती सोळा आणे मगदुराची समजली जाते. कांहीं गोष्टी प्रतिकूल असल्या तर बारा आणे व सर्वच मध्यम असल्या तर आठ आणे, असा मगदूर ठरवून सोळा आणे जमिनीला एकरी ३ रुपये पट्टी असेल तर आठ आणे जमिनीला ती $१\frac{१}{२}$ रुपाया व चार आणे जमिनीला १२ आणे अशी पट्टी बसविण्यांत येते. आपल्या इकडे जमीनमहसूल रयतवारी पद्धतीचा आहे. रयतेला आपल्या जमिनी विकतां येतात किंवा गहाण ठेवितां येतात. म्हणजे त्या शेतकऱ्याच्या मालकीच्या आहेत असें समजावयाचें. जमिनीच्या मालकीची शाबिती व्हावी म्हणून सरकारनें सर्व जमिनींची हक्कनोंदणी करून ठेविली आहे. त्यावरून मालकाकडे जमिनीचा तांबा किती वर्षें आहे? तो कसा आला? वगैरे माहिती मिळते.

जमिनीचा सारा एकदां ठरला म्हणजे त्याची फेरतपासणी तीस वर्षांनीं होते. एवढ्या अवधींत मशागतीनें जमिनीचा मगदूर वाढतो, कित्येक खराब व चाऱ्याकरितां सोडलेल्या जमिनी लागवडीखालीं येतात,

तसेंच रेलवे व दुसऱ्या अनेक सोयींमुळें धान्याची किंमत वाढते. या कारणानें सरकारी सारा कांहीं प्रमाणांत वाढविण्यांत येतो. फेर-तपासणीमध्यें कांहीं ठिकाणीं सारा कमी झाल्याचींही उदाहरणें आहेत.

पाऊस कमी पडल्यामुळें किंवा इतर कांहीं कारणांमुळें जर पीक आलें नाहीं तर साऱ्याची तहकुबी देण्यांत येते. पिकाची आणेवारी लावून आठ आणे पीक असेल तर सर्व सारा वसूल केला जातो. परंतु त्यापेक्षां कमी पीक असेल तर अर्धा वसूल करितात व चार आण्यांपेक्षां कमी पीक असेल तर सर्वच तहकुबी मिळते. तसेंच मागील बाकीचा वसूल चांगलें पीक आल्याखेरीज करीत नाहींत. तीन वर्षें सारखी तहकुबी असेल तर एक वर्षाचा सारा अजिबात माफ होतो. जमिनीचा सारा देणें जड जाऊं नये म्हणून तो दोन किंवा तीन हप्त्यांनीं वसूल करितात.

खेडेगांवीं सारावसूल करण्याकरितां एक किंवा दोन तलाठी असतात. ते हिशेबी काम करितात. प्रत्यक्ष वसूल करण्याचें काम पाटील करितो. पाटलाच्या मदतीला प्रत्येक गांवीं दोन चार महार व कांहीं रामोशी असतात. महारांचीं मुख्य कामें पुढें दिलीं आहेत:—गांवच्या सीमा, चावडी व सरकारी मालमत्ता यांवर नजर ठेवणें, सरकारी अधिकारी व गांवकामगार यांचे हुकूम ऐकणें, भरणा पोहोंचविणें, टपाल नेणें, सरकारी अधिकाऱ्यांना वाट दाखविणें इत्यादि. वसूल झाल्याबरोबर तालुक्यांत पाठवितात. तेथें मुख्य अधिकारी मामलेदार असतो. पेटा असेल तर महालकरी असतो. मामलेदार किंवा महालकरी यांची एक कचेरी असते. तेथील मुख्य कारकुनाला फडणीस म्हणतात. येईल तो पैसा मोजून घेणें, सरकारी तिजोरी संभाळणें व जिल्हा खजिनदाराकडून हुकूम येतील त्याप्रमाणें पैसा देणें हीं मुख्य फडणिसाचीं कामें आहेत. शिवाय तो तिसऱ्या वर्गाचा मॅजिस्ट्रेटही असतो. मामलेदार किंवा महालकरी हा सर्व तालुक्याचा किंवा पेट्याचा अधिकारी समजला जातो.

तो मुख्यतः जमीनमहसुलाचें काम पाहातो. त्याला मॅजिस्ट्रेटचेही अधिकार असतात. म्हणून तो खटले चालवितो. म्युन्सिपालिट्या,लोकल बोर्डें वगैरे स्थानिक संस्थांना सल्लामसलत देतो. शिवाय बहुतेक सरकारी पैसा पसूल करण्याचें काम हाच अधिकारी करितो. तलाठी किंवा कुलकर्णी यांनीं ठेवलेले गांवचे हिशेब, नकाशे, जमाबंदीच्या चोपड्या वगैरे गोष्टी तपासण्याकरितां याला तालुक्यांत वर्षांतून निमे दिवस हिंडावें लागतें.

मामलेदाराच्या वर एक असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टर असतो. त्याच्या देखरेखीखालीं जिल्ह्याचा निमे किंवा तिसरा भाग दिलेला असतो. हा बहुधा पहिल्या वर्गाचा मॅजिस्ट्रेट असतो. याच्यावर जिल्ह्याचा मुख्य अधिकारी कलेक्टर असतो. याला सर्वच प्रकारचीं कामें करावीं लागतात. कलेक्टरावर देखरेख करण्याकरितां एक कमिशनर असतो. त्याची हुकमत पांच किंवा सहा जिल्ह्यांच्या भागावर चालते. कचेरीचें काम पाहाण्याकरितां कमिशनरला एक मदतनीस असतो. मुंबई इलाख्यांत असे चार विभाग आहेत. एक सिंध, दुसरा उत्तरभाग, तिसरा मध्यभाग व चौथा दक्षिणभाग. या चार भागांच्या कमिशनरांवर एकदम मुंबईसरकारच्या रेव्हिन्यु मेंबरची त्या खात्याच्या मुख्य सेक्रेटरी-मार्फत हुकमत चालते.

पाठ सव्विसावा.

प्रचलित न्यायपद्धति.

मुलांनों, आपल्याला कोणापासून उपद्रव होऊं नये, स्वकष्टानें आपण मिळविलेलें धन कोणीं लुबाडून नेऊं नये, तसेंच आपलें शरीर, सामान, कपडे वगैरे सुरक्षित राहावें म्हणून सरकार कायदे

करितें. देवघेवीचे व्यवहार नीट चालावे म्हणून केलेल्या कायद्यांना दिवाणी कायदे म्हणतात. कोणी दांडगाई करील अगर चोरी, खून दरोडे घालणें वगैरे गुन्हे करील, तर त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां केलेले कायदे आहेत त्यांना गुन्हेगारीचे अगर फौजदारी कायदे म्हणतात.

पूर्वी कायद्याप्रमाणें अगर योग्य वाटेल तो न्याय ग्रामपंचायती देत असत. शिवाय राजदरबारीं एक मोठा विद्वान् न्यायाधीश असे. तो मोठमोठ्या खटल्यांचा निवाडा करीत असे. पेशवाईमध्यें रामशास्त्री प्रभुणे म्हणून असाच एक विद्वान् व निःस्पृह न्यायाधीश होऊन गेला. त्यानें खुद्द पेशव्याला देहान्तप्रायश्चित्ताची शिक्षा सांगितली होती. पूर्वी राजेलोक स्वतः न्याय देत असत. अकबर बादशहाचा मुलगा सेलीम ऊर्फ जहांगीर यानें आपल्या कचेरींत घंटा लावून ठेविली होती. कोणाला न्याय पाहिजे असल्यास तिची दोरी ओढिली कीं बादशहा त्याची दाद घेई.

हल्लीं न्याय देण्याच्या कचेरीला कोर्ट म्हणतात. मोठा तालुका असेल तर तालुक्याच्या ठिकाणीं कोर्ट असतें. कोठें दोन तालुके मिळून एक कोर्ट असतें. या कोर्टांमध्यें न्याय देणारा सरकारी अधिकारी असतो, त्याला सबजज्ज अगर मुन्सफ म्हणतात. खटला चालू असतां फिर्यादी अगर त्याच्या बाजूचा वकील आपली बाजू मांडतो. वादीच्या उलट कांहीं सांगावयाचें असल्यास प्रतिवादी स्वतः अगर आपल्या वकीलामार्फत तें सांगतो. जरूर तो साक्षीपुरावा घेऊन पुरावा असेल त्याप्रमाणें मुन्सफ न्याय देतो. मुन्सफ फक्त देवघेवीचे म्हणजे दिवाणी खटले चालवितो.

हाणामारीचे अगर फौजदारी गुन्हे फौजदारामार्फत मामलेदारापुढें दाखल होतात. असे खटले चालविण्याचा अधिकार ज्या लोकांना असतो त्यांना मॅजिस्ट्रेट म्हणतात. मामलेदाराच्या फडणिसापासून तों कलेक्टरपर्यंत मुलकीखात्यांतील सर्व अधिकाऱ्यांना मॅजिस्ट्रेटचे अधिकार

आहेत. हे अधिकार तीन प्रकारचे आहेत. थर्ड क्लास मॅजिस्ट्रेटला दोनशें रुपयेपर्यंत दंड करितां येतो आणि सहा महिनेपर्यंत साधी अगर सक्तमजुरीची शिक्षा देतां येते. दुसऱ्या वर्गाचा मॅजिस्ट्रेट दोन वर्षेपर्यंत कैदेची शिक्षा करूं शकतो व एक हजार रुपये दंड करण्याचा त्याला अधिकार आहे. पहिल्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटला याशिवाय आणखी फटके मारण्याचा अधिकार आहे.

बहुतेक फडणीस, महालकरी आणि कांहीं थोडे मामलेदार यांना थर्ड क्लास मॅजिस्ट्रेटचे अधिकार असतात. बरेच मामलेदार व सर्व असिस्टंट किंवा डेप्युटीकलेक्टर यांना सेकंड क्लास मॅजिस्ट्रेटचे अधिकार आहेत. सर्व कलेक्टर व कांहीं निवडक असिस्टंट कलेक्टर व मामलेदार यांना फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटचे अधिकार दिलेले असतात. कलेक्टरपुढें सेकंड क्लास व थर्ड क्लास मॅजिस्ट्रेट यांनीं दिलेल्या निकालाविरुद्ध अपिलें चालतात. कलेक्टर अपिलें चालविण्याचा अधिकार दुसऱ्या एकाद्या फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटलाही देऊं शकतो.

तुम्हीं कांहीं सभ्य लोकांपुढें खटले चाललेले पाहिले असतील. कांहीं लायक लोकांना सरकार मॅजिस्ट्रेटचे अधिकार देतें. पगार नसतो म्हणून यांना ऑनररी मॅजिस्ट्रेट असें म्हणतात. त्यांना ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणें तिसऱ्या, दुसऱ्या अगर पहिल्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटचे अधिकार असतात. मुलकी अधिकाऱ्यांना खटले चालविण्यास वेळ नसेल तर कांहीं थोडे खटले या लोकांपुढें चालतात.

फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटच्या विरुद्ध अपील करावयाचें झाल्यास तें डिस्ट्रिक्ट जज्जापुढें केलें पाहिजे. साधारण प्रत्येक जिल्ह्याला एक डिस्ट्रिक्ट जज्ज असतो, तो दिवाणी व फौजदारी दोन्ही खटल्यांचा निकाल देतो. दिवाणी खटले चालविण्याकरितां त्याच्या मदतीला एक फर्स्ट क्लास सबजज्ज दिलेला असतो. हाच डिस्ट्रिक्ट जज्ज जेव्हां फौजदारी खटला चालवितो तेव्हां त्याला सेशन जज्ज म्हणतात. फासांवर

चढविण्याची शिक्षा देण्याचा अधिकार या सेशन जज्जाला असतो. त्याच्या हाताखालीं आणखी एक असिस्टंट् जज्जही असतो.

डिस्ट्रिक्ट जज्जाच्यावर हायकोर्ट असतें. आपलें हायकोर्ट मुंबईस आहे. येथें राजानें नेमलेले न्यायाधीश असतात. तें कांहीं नवीन खटले चालवितात व खालील कोर्टांतील दिवाणी अगर फौजदारी खटल्यांचीं अपिलें चालवितात. यांना खटला समजावून देण्याकरितां वकील असून शिवाय बॅरिस्टर असतात. या बॅरिस्टर लोकांना मदत करण्याकरितां सॉलिसिटर म्हणून आणखी कायदेपंडित आहेत.

शिवाय मोठमोठ्या शहरीं दिवाणी खटले चालविण्याकरितां कोर्टें असतात. त्यांना स्मॉल कॉज कोर्टें म्हणतात. तसेंच फौजदारी खटले ऐकण्याकरितां मॅजिस्ट्रेट नेमलेले असतात त्यांना सिटी मॅजिस्ट्रेट म्हणतात.

सिंध प्रांतांतील लोकांस मुंबई हायकोर्टामध्यें अपील करणें फार गैरसोयीचें होतें म्हणून कराचीला एक ज्युडिशियल कमिशनर अधिकारी आहे. त्यालाच हायकोर्ट जज्जाचे अधिकार दिलेले आहेत.

हायकोर्टावर अपील करावयाचें असल्यास विलायतेंत तें प्रिव्ही-कौन्सिलपुढें करितां येतें. कोर्टामध्यें कामें करणारे वकील, बॅरिस्टर वगैरे लोक यांनीं कायद्याच्या परीक्षा दिलेल्या असतात. बॅरिस्टर व्हावयाचें असेल तर विलायतेस जाऊन तेथें परीक्षा द्यावी लागते.

पाठ सत्ताविसावा.

शिक्षण.

ब्रिटिश राज्य सुरू झाल्यापासून अलीकडे शिक्षणाचा फैलाव जोरानें होत आहे. आपल्याकडे पूर्वीच्या काळीं शिक्षण देणें हें सरकारचें मुख्य कर्तव्य समजत नसत. कांहीं लोक खासगी रीतीनें

पंतोजीचें काम करून मुलांना लिहिण्यावाचण्याला शिकवीत. या गांवठी शाळांतून बहुतेक ब्राह्मण लोकांचींच मुलें शिकत. सरकारनें शिक्षणखातें सुरू केल्यापासून बहुतेक गांवांमध्यें हल्लीं शाळा चालू आहेत. गेल्या शंभर वर्षांमध्यें लिहितां वाचतां येतें अशा लोकांचें प्रमाण लोकसंख्येच्या मानानें शेंकडा सहापर्यंत गेलें आहे. नुसत्या पुरुषांचीच गणना केली तर सरासरीनें दहा पुरुषांमध्यें एक साक्षर सांपडतो. बायकांमध्यें मात्र हें प्रमाण शंभरांत एक असें आहे. सुधारलेल्या देशामध्यें शेंकडा ८० ते ९० लोक शिकलेले आढळतात.

आपल्या इकडील शिक्षणसंस्था तीन प्रकारच्या आहेत. प्राथमिक, दुय्यम व उच्च. प्राथमिक शाळा दोन प्रकारच्या असतात. एक खेडेगांवांतील चार किंवा पांच इयत्तांची शाळा व दुसरी मोठ्या गांवांतील सात इयत्तापर्यंतची. दुसरीला पहिल्या दर्जाची शाळा समजतात. खेडेगांवांतील शाळेमध्यें एकाच शिक्षकाला दोन किंवा जास्त इयत्ता शिकवाव्या लागतात. परंतु मोठ्या शाळेमध्यें मुलें जास्त असतात. तेथें एक शिक्षक एकच वर्ग शिकवितो. कांहीं मोठ्या गांवीं मराठी शाळेला इंग्रजी वर्ग जोडून इंग्रजी तीन इयत्तांपर्यंत शिक्षण दिलें जातें. भरपूर मुली असतील तर मुलींची तशीच अस्पृश्य मुलांचीही शाळा निराळी असते. मुलांच्या सातव्या इयत्तेची परीक्षा जिल्ह्याच्या ठिकाणीं होते. तिला व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा म्हणतात. व मुलींची व्ह० फा० परीक्षा जिल्ह्यांतील प्रमुख ठिकाणीं होते. दुय्यम तऱ्हेच्या शाळाही लहानमोठ्या असतात. इंग्रजी तीनच इयत्तांच्या शाळेला मिडलस्कूल, पांच इयत्तांच्या शाळेला ए. व्ही. स्कूल व सात इयत्तांच्या शाळेला हायस्कूल म्हणतात. पहिल्या तीन इयत्तांचा अभ्यास मराठी शाळेमधील वरच्या तीन इयत्तांप्रमाणेंच असतो. फक्त इंग्रजी हाच काय तो जास्त विषय या इयत्तांमध्यें शिकविला जातो. हायस्कूलच्या शेवटीं स्कूलबोर्डाकडून परीक्षा घेण्यांत येते.

तींत संस्कृत वगैरे जास्त विषय घेऊन पास झालेल्या मुलांचा प्रवेश कॉलेजांत होतो. कॉलेजमधील शिक्षणालाच उच्च दर्जाचें शिक्षण म्हणतात. तेथें चार वर्षांचा अभ्यासक्रम व्यवस्थित रीतीनें पार पडला म्हणजे बी. ए.ची साधी अगर जास्त विषयांमध्यें पास झाल्यास सन्मानाची पदवी मिळते. शास्त्रीय अभ्यासक्रमाची बी. एस्सी. अशीही पदवी आहे.

कांहीं थोड्या धंदे शिकविणाऱ्या संस्था आहेत. त्यांपैकीं ट्रेनिंग-कॉलेजें, टेक्निकल स्कूल, मेडिकल स्कूल, ओव्हरसियर आणि मेक्यानिकल वर्ग एवढे सोडिल्यास बाकी सर्व संस्था विश्वविद्यालयाला जोडिलेल्या असून त्या उच्च दर्जाच्या आहेत. कायद्याचा अभ्यास शिकविणारीं एक मुंबईंत व दुसरें पुण्यांत अशीं दोन कॉलेजें आहेत. यांतून बाहेर पडणाऱ्या लोकांना कायद्याची एल्एल्. बी. ही पदवी मिळते. ही पदवी धारण करणारे लोक वकिली करितात किंवा न्यायखात्यांत नोकरी धरितात. मुंबईंत एक मेडिकल कॉलेज आहे. तेथील एम्. बी. बी. एस्. ही पदवी मिळविणारे लोक स्वतःचे दवाखाने चालवितात किंवा वैद्यकीखात्यांत नोकरी धरितात. पुण्यांत एक इंजिनियरिंग कॉलेज आहे. तेथील लोकांना बी. ई. ही पदवी मिळते. हे लोक सरकारी पब्लिक वर्क्सखात्यांत नोकरी धरितात किंवा कोणा कंत्राटदाराचे नकाशे काढून देण्याचा स्वतंत्र धंदा करितात. तसेंच पुण्यांत शेतकी कॉलेज आहे. तेथून बाहेर पडणारे बी. एजी. पदवी मिळवितात. हे शेतकी, सहकारी पतपेढ्या, मुलकी वगैरे खात्यांतून नोकरी न मिळाल्यास स्वतः शेतकी करितात. हीं वर लिहिलेलीं सर्व उच्च दर्जाचीं कॉलेजें मुंबई विश्वविद्यालयाला जोडिलेलीं असून यांच्या परीक्षा घेण्याचेंच काम फक्त विश्वविद्यालय करितें. कांहीं विषयांवर एम्. ए., बी. ए. वगैरे पदवीधरांपुढें चांगल्या लोकांकडून व्याख्यानें देवविण्याचेंही काम मुंबई विश्वविद्यालय करितें. इतर देशांमध्यें प्रत्यक्ष

शिक्षण देणारीं विश्वविद्यालयें आहेत. तशीं आपल्याकडे नाहींत. शिवाय एवढ्या मोठ्या मुंबई इलाख्यामध्यें फक्त एकच विश्वविद्यालय आहे.

औद्योगिक शिक्षण:—अद्यापपर्यंत शिकलेल्या लोकांचीं सोय सरकारी नोकरीमध्यें होत असे. परंतु आतां शिकणाऱ्या लोकांचा भरणा वाढत आहे व सरकारला जिकडे तिकडे काटकसर करावी लागत आहे. यामुळें शिकलेल्या लोकांना कांहीं उद्योग पाहून दिले पाहिजेत या जाणिवेनें औद्योगिक शिक्षणाच्या संस्था काढण्याकडे लोकांची प्रवृत्ति होत आहे. सध्यां चित्रकलेचें आर्ट कॉलेज, तसेंच व्यापारी कॉलेज व शास्त्रीय माहितीकरितां व्हिक्टोरिया टेक्निकल स्कूल इतक्या संस्था मुंबईस चांगल्या चालल्या आहेत. जिल्ह्यांचे ठिकाणीं सुतारकाम, लोहारकाम वगैरे कामें शिकविणारीं टेक्निकल स्कूल्स निघालीं आहेत. परंतु अद्यापि बुद्धिमान् मुलांचा ओघ या संस्थांकडे यावा तसा येत नाहीं. हातानें काम करणें कमी योग्यतेचें आणि खुर्चींवर बसून मास्तरकी अगर कारकुनी करणें मानाचें अशी पूर्वापार चालत आलेली लोकांची समजूत अद्यापि नाहींशी होत नाहीं. तरी पण नाइलाजास्तव कां होईना, आतां आपल्या मुलांना औद्योगिक शिक्षण देण्याची जरूरी सधन लोकांनाही भासूं लागली आहे.

पाठ अठ्ठाविसावा.

शिक्षणाची व्यवस्था.

शिक्षणखात्याची व्यवस्था पाहाणारे अधिकारी पुष्कळ आहेत. प्राथमिक शाळा म्युनिसिपालिटी व लोकलबोर्ड या स्थानिक संस्थांच्या ताब्यांत आहेत. म्युनिसिपल शाळांवर म्युनिसिपालीटीची स्कूल-

कमिटी आपल्या चेअरमनमार्फत देखरेख करिते. सरकारी अधिकारी वर्षांतून एकदां तपासणी करून योग्य त्या सूचना करितात, हिशेब तपासतात व झालेल्या खर्चाच्या निमे मदत देण्याची आपल्या वरिष्ठांकडे शिफारस करितात. लोकलबोर्डाच्या शाळांची व्यवस्था अद्यापपर्यंत जिल्ह्याचे डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर पाहात असत. आतां यापुढें लोकलबोर्ड शाळांचा ताबा आपल्याकडे घेतील, तेव्हां त्याकरितां एक ऍडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर व त्याचे मदतीला सुपरवायझर व हजेरी ऑफिसर असे अधिकारी नेमून त्यांजकडून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था स्वतःच्या स्कूलबोर्डाकडून करवितील. डेप्युटी व त्यांचे मदतनीस शाळा तपासून योग्य ती सल्ला स्कूलबोर्ड व त्यांचे अधिकारी यांना करितील. लोकलबोर्डाला प्राथमिक शिक्षणाकरितां होणाऱ्या खर्चाच्या दोन तृतीयांश मदत सरकारकडून मिळेल.

प्रत्येक भागावर एक एज्युकेशनल इन्स्पेक्टर असतो. हा सर्व तऱ्हांच्या प्राथमिक शाळांवर अप्रत्यक्ष देखरेख करितो. दुय्यम शाळांची प्रत्यक्ष तपासणी करून खासगी शाळांना मदत देणें व सरकारी शाळांवर देखरेख करणें हीं कामें तो करितो. याला एक पर्सनल असिस्टंट म्हणून मदतनीस असतो. आपल्या महाराष्ट्राचें मुंबईभाग व मध्यभाग असे दोन भाग केलेले असून मुंबईभागामध्यें मुंबई, नाशीक, ठाणें, कुलाबा व रत्नागिरी हे जिल्हे मोडतात व मध्यभागामध्यें पुणें, सातारा, सोलापूर, नगर, पूर्वखानदेश व पश्चिमखानदेश या जिल्ह्यांचा समावेश होतो. मुंबई भागाचें मुंबई व मध्यभागाचें पुणें हीं मुख्य ठिकाणें आहेत.

इलाख्यांतील सर्व शिक्षणसंस्थांवर देखरेख करणारा दुसरा एक बडा अधिकारी आहे. त्याला डायरेक्टर ऑफ पाब्लिक इन्स्ट्रक्शन म्हणतात. याच्या मदतीला एक डेप्युटी डायरेक्टर असून शिवाय कचेरीची व्यवस्था पाहाण्याकरितां तीन सुपरिंटेंडन्ट आहेत. सरकारी

दुय्यम व उच्च संस्थांची व्यवस्था पाहाणें, शिक्षणविषयक माहिती सरकारला पुरविणें व योग्य सूचना करणें वगैरे कामें या अधिकाऱ्याला करावीं लागतात.

उच्च दर्जाचें शिक्षण देणारीं कॉलेजें, कांहीं सरकारी व कांहीं निमसरकारी आहेत. सरकारी कॉलेजमध्यें प्रिन्सिपॉल म्हणून मुख्य अधिकारी असतो. प्रत्येक विषयाला एक प्रोफेसर व जरूर असल्यास त्याच्या मदतीला लेक्चरर (विषय सांगणारे) किंवा डिमॉन्स्ट्रेटर(प्रयोग दाखविणारे) दिलेले असतात. खासगी कॉलेजांची व्यवस्था अशीच असते. उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम ठरविण्याचा अधिकार विश्वविद्यालयाला आहे. विश्वविद्यालयाच्या कुलगुरूला चान्सेलर म्हणतात. प्रांताचा गव्हर्नर हाच चान्सेलर असतो. दुसरा दुय्यम चान्सेलर हा सिंडिकेटचा अध्यक्ष समजला जातो. सिंडिकेट म्हणजे विश्वविद्यालयाचें कार्यकारी मंडळ. या मंडळाचा सेक्रेटरी असतो त्याला रजिस्ट्रार म्हणतात. विश्वविद्यालयाचा सर्व पत्रव्यवहार हा रजिस्ट्रार पाहातो. एकंदर नियम करणें वगैरे महत्त्वाचीं कामें करणारी साधारण सभा असते तिला सिनेट म्हणतात. या सिनेटच्या सभासदांपैकीं चारपंचमांश लोक सरकार नेमितें व बाकीचे युनिव्हर्सिटीचे पदवीधर व सिनेटचे सभासद निवडतात. शिवाय प्रत्येक विषयाची एक कमिटी असते. तिला फॅकल्टी म्हणतात. सिनेटच्या सभासदांची संख्या १०७ आहे.

कित्येक विश्वविद्यालयें स्वतः शिकविण्याचें काम करितात. आमचें मुंबईचें विद्यालय फक्त परीक्षा घेण्याचें काम करितें. आपल्या विश्वविद्यालयामध्यें थोडाबहुत फेरफार केला पाहिजे किंवा कसें ह्याचा विचार करण्याकरितां सध्यां एक कमिटी नेमिली आहे.

पाठ एकोणतिसावा.

पोलीसखातें.

"इंग्रजी राज्यामध्यें काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत जावें" अशी म्हण प्रचारांत आली आहे. कोठेंही इंग्लिश लोक जावोत, त्यांच्या बरोबर 'कायदा' हें शस्त्र असतेंच. त्याचा अम्मल करून व्यक्तिमात्राची मालमत्ता व जीवित सुरक्षित ठेवावयाचें हें ब्रिटिश लोक आपलें अगर राज्यकर्त्यांचें आद्यकर्तव्य मानितात. या कामीं मुख्य मदत पोलीसखात्याची होते. इंग्रजी अम्मल सुरू होण्याच्या अगोदर पोलीसखातें नव्हतें. खेडेगांवचे पाटीलबुवा हेच आपले मदतनीस रामोशी व वेसकर यांजकडून पोलीसचें काम करवीत. पोलीसखातें इ. स. १८६० सालीं स्थापन झालें.

खेडेगांवांतून हल्लींसुद्धां महार, रामोशी व पोलीस पाटील हे गुन्हे न होऊं देण्याचें, झाल्यास तपास करण्याचें व जवळच्या पोलीस नाक्यावर वर्दी देण्याचें काम करितात. तालुक्याचे ठिकाणीं एक सब् इन्स्पेक्टर ऑफ पोलीस म्हणून अधिकारी असतो. त्याच्या हाताखालीं जमादार, हवलदार, नाईक व शिपाई असे अधिकारी क्रमानें असतात. मोठ्या तालुक्यांतून एकापेक्षां जास्त सब् इन्स्पेक्टराचीं ठाणीं असतात. कित्येक ठिकाणीं नुसतें पोलीसचें लहान ठाणें असतें. गुन्हेगार म्हणून एकाद्या माणसाचा संशय आल्यास सब् इन्स्पेक्टर चोवीस तासपर्यंत त्यास अटकेंत ठेवूं शकतो. या अवधींत त्याला आरोपीस मॅजिस्ट्रेटपुढें हजर करावें लागतें. खटला भरून पुढें तो पुराव्यानिशीं मांडण्याचें काम सब् इन्स्पेक्टरालाच करावें लागतें.

सब् इन्स्पेक्टरांवर इन्स्पेक्टर ऑफ पोलीस याची देखरेख चालते. जिल्ह्याला एक पोलीस सुपरिन्टेंडन्ट व त्याच्या हाताखालीं डेप्युटी

सुपरिन्टेन्डन्ट ऑफ पोलिस अगर असिस्टंट सुपरिन्टेंडन्ट असे अधिकारी असतात. या अधिकाऱ्यांनासुद्धां कलेक्टरच्या हुकमतीखालीं चागावें लागतें. सर्व इलाख्यावरील अधिकाऱ्याला इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस म्हणतात. याचें ऑफिस पुणें येथें आहे. याच्या मदतीला कांहीं डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल दिलेले आहेत. साध्या कोर्टांत सरकारतर्फे पोलीस अधिकारीच पुरावा मांडितात. सेशनामध्यें मात्र हें काम सरकारी वकील करितो. या वकिलाला पब्लिक प्रॉसिक्यूटर म्हणतात.

या चित्रांत विलायतेंतील पोलीस (बोंबी) एका सायकलवरून जाणाऱ्या तीन मुलांना मोठ्या आस्थेनें वाट दाखवीत आहे.

अद्यापपर्यंत पोलीसखात्यामध्यें सुशिक्षित लोकांचा भरणा कमीं असे. आतां नाशिक येथें पोलीस ट्रेनिंग स्कूल निघालें आहे. तेथें तयार झालेल्या लोकांमध्यें, ते सुशिक्षित असल्यामुळें, सौजन्य जास्त प्रमाणांत दिसून येतें. पोलीसखात्याच्या मदतीला गुप्तपोलीसखातें जोडण्यांत आलें आहे. गुन्हे शोधून काढण्याच्या कामीं या खात्याचा उपयोग फार होतो. मुंबईसारख्या मोठ्या शहरीं पोलीस कमिशनर म्हणून एक अधिकारी आहे. कित्येक संस्थांनाना किंवा म्युनिसिपालिट्यांना सरकारी शिपाई तात्पुरते दिलेले आहेत. रेलवेचे पोलीस लोक निराळे आहेत, तरी ते लोक व आमचे शिपाई एका जुटीनें काम करितात. एकादे ठिकाणीं दंगा झाल्यास तसाच पुन्हा दंगा त्या ठिकाणीं होऊं नये म्हणून जादा पोलीस ठेवितात. या जादा तुकडीचा खर्च त्या ठिकाणच्या लोकांपासून वसूल करून घेण्यांत येतो.

पाठ तिसावा.

तुरुंग.

गुन्हेगाराला चौकशीअंतीं साधी अगर सक्तमजुरीची कांहीं मुदतीची शिक्षा होते. तो पंधरा वर्षांच्या आंतील असल्यास त्याला येरवडा येथील रेफर्मेटरी शाळेंत पाठवितात. तेथें त्याला लिहिण्यावाचण्यास शिकविण्यांत येतेंच, शिवाय थोडें औद्योगिक शिक्षणही देण्यांत येतें. तो सुटून घरीं गेला म्हणजे उद्योग करून पोट भरतो. ही शाळा शिक्षणखात्याच्या देखरेखीखालीं चालते. पंधरा वर्षांपेक्षां जास्त वयाच्या लोकांना तुरुंगांत ठेवितात. हे तुरुंग तीन प्रकारचे आहेत. एक मध्यवर्ति. येथें पुष्कळ मुदतीचे कैदी असतात. येरवडा येथें असा एक मोठा तुरुंग आहे. दुसरा जिल्हा तुरुंग. येथें एक वर्ष मुदतीचे कैदी असतात. धुळें, रत्नागिरी, ठाणें व नगर येथें

असे तुरुंग आहेत. तिसरा दुय्यम दर्जाचा. यांत अटकेंत असलेले लोक किंवा पंधरा दिवसांपेक्षां कमी सज़ा झालेले गुन्हेगार यांस ठेवितात.

सर्व तुरुंगांवर देखरेख करणारा एक इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स म्हणून अधिकारी असतो. शिस्त राखणें, काम सांगणें, शिक्षा देणें, खर्च मंजूर करणें व कैदी सोडणें वगैरे कामें तो करितो. शिवाय एक डॉक्टर असून त्याला एक मदतनीस असतो. हे अधिकारी कैद्यांचें आरोग्य राखण्याच्या कामीं झटतात. शिवाय जेलर म्हणून एक अधिकारी असतो. तो सुपरिन्टेंडन्टच्या हुकुमाप्रमाणेंच आंतील सर्व व्यवस्था पाहातो. कोणाही कैद्याला नऊ तासांपेक्षां जास्त काम दिलें जात नाहीं. पुरुष व स्त्रिया यांना एके ठिकाणीं ठेवीत नाहींत. कैद्यांना अन्न डॉक्टर सांगतील त्याप्रमाणें मोजून देण्यांत येतें. आजारी माणसांना निराळें अन्न देतात. जाळलूट न करितां कैदेंत गेलेले सुशिक्षित लोक यांचा निराळा वर्ग करण्यांत आलेला असून अशा कैद्यांना वाचावयास वर्तमानपत्रें, कमी मेहनतीचें काम व बरें अन्न या सवलती देण्यांत येणार आहेत. कैदी आपली वर्तणूक चांगली ठेवील तर अधिकारी त्याला बऱ्याच सवलती देतात. कैद्यांवर देखरेख करणारे वार्डर लोक हे अशाच प्रकारचे कैदी असतात. चांगल्या वागणुकीबद्दल वर्षास एक महिना याप्रमाणें कैदेची सूट मिळते. सरकारनें आतां प्रत्येक तुरुंगाच्या ठिकाणीं वजनदार लोकांची कमिटी स्थापून तिच्याकडून कैद्यांच्या वागणुकीवर नजर ठेवण्याचें काम करून घेण्याचें ठरविलें आहे. या कमिटीनें एकाद्या कैद्यास सोडून देण्याची शिफारस केली तर सरकार त्याला सोडून देईल.

आपणांमध्यें कांहीं जातींना मूळपासून चोऱ्या करण्याची संवय लागलेली आहे. हे लोक चोऱ्या करण्यामध्यें कांहीं एक पाप समजत नाहींत. चोरी करणें हा आपला धंदा आहे असा हे लोक कोर्टांत

शपथेवर जबाब देतात. चोऱ्या, मारामारी, दरोडे वगैरे गोष्टी याच गुन्हेगार जातींच्या लोकांकडून होत असतात. या लोकांना सक्तीनें एके ठिकाणीं ठेवून घेऊन त्यांना काम देऊन गुंतवून ठेवण्याकरितां सरकारनें या लोकांचीं वसतिस्थानें केलीं आहेत. विजापूर व बारामती या दोन ठिकाणीं यांच्या वसाहती चांगल्या चालल्या आहेत. अशा एकंदर अकरा वसाहती इलाख्यांत आहेत. शिवाय हिंडणाऱ्या लोकांच्या टोळ्या जेथें असतील तेथें त्यांच्यावर पोलीस देखरेख ठेवितें. यामुळेंही अलीकडे चोऱ्यांचा उपद्रव पुष्कळ कमी झाला आहे.

फार मोठ्या गुन्ह्याला फांसाची अगर जन्मठेप काळ्यापाण्याची किंवा कांहीं वर्षें काळ्यापाण्याची शिक्षा होते. फांशीच्या शिक्षेला हायकोर्टाची मंजुरी आणावी लागते. काळ्यापाण्याचे कैदी अंदमान बेटांत पोर्ट ब्लेअर या ठिकाणीं रवाना होतात. येथें कैद्यांच्या पांच पायऱ्या आहेत. खालच्या पायरीवरून वरच्या पायरीवर जावें तसें कैद्यांचें जीवित कमी कष्टमय होतें. वीस वर्षांनंतर साधारणपणें कैद्याची मुक्तता होते. दरवडेखोर असेल तर त्याला आणखी पांच वर्षें म्हणजे पंचवीस वर्षें राबावें लागतें. पहिल्या वर्गांतील कैद्यांना आपलीं माणसें घेऊन स्वतंत्रपणें राहातां येतें. दिवसानुदिवस काळ्यापाण्यावर कैदी पाठवू नये असा सरकारचा कल आहे.

पाठ एकतिसावा.

लोकोपयोगी कामें करणारें खातें.

या खात्याला पब्लिकवर्क्स् डिपार्टमेंट म्हणतात. याच्या दोन शाखा आहेत. एक पाणी पुरवठा करण्याचें खातें, यालाच इरिगेशन खातें म्हणतात; आणि दुसरें सडका व सरकारी इमारती बांधणारें

खातें, याला पब्लिकवर्क्स् खातें असें म्हणतात. सरकारी खर्चामध्यें काटकसर करण्याची पाळी आली तर प्रथम लोकोपयोगी कामें तहकूब करितात. अशा वेळी नोकर लोकही कमी करतां यावे म्हणून या खात्यांतील बऱ्याच सरकारी नोकरांची नेमणूक तात्पुरती असते. कांहीं कामें खात्याकडून करविण्यांत येतात तर कांहींचीं कंत्राटें देतात आणि सरकारी अधिकारी फक्त कंत्राटदार काम नीट करीत आहे किंवा नाहीं एवढ्याच गोष्टीवर नजर ठेवितात.

इरिगेशन खातें:—आपल्याकडे शेती हा मोठा धंदा आहे आणि तो सर्वस्वीं पाऊस पडला तर होणारा आहे. शेतकऱ्याची नजर सारखी आभाळाकडे असते. पाऊस पाडणें ही गोष्ट परमेश्वराच्या मर्जीची आहे, तेथें कांहीं स्वावलंबनाला जागा नाहीं. म्हणून शेतकरी पाऊस न पडेल तर कपाळाकडे बोट दाखवून आपलें नशीब वाईट समजतो. शेतकरी वर्ग असा परावलंबी असल्यामुळें व त्याच्या श्रमाचें चीज होणें ही गोष्ट अत्यंत अनिश्चित असल्यामुळें फार दैवभारी झाला आहे. व त्यामुळेंच 'पांडुरंगाची' मर्जी असेल तर खाटल्यावरही भाकर मिळेल, असल्या घातुक कल्पना समाजामध्यें रूढ होऊन बसल्या आहेत. परंतु इंग्रज सरकारनें यालाही तोड म्हणून इरिगेशन खातें स्थापून पाऊस कमी पडतो तेथें पाण्याचा पुरवठा करण्याची थोडीबहुत व्यवस्था केली आहे.

महाराष्ट्रांत देशावर पाऊस साधारणपणें कमी पडतो. नगर, सोलापूर, पुणें, हे जिल्हे तसेंच सातारा व नाशिक ह्या जिल्ह्यांचा पूर्वभाग या ठिकाणीं तर नेहमीं दुष्काळच असतो. परंतु या भागांमधून वाहणाऱ्या गोदावरी व भीमा यांना मिळणाऱ्या बऱ्याच उपनद्या पश्चिम घाटामध्यें उगम पावत असल्यामुळें त्यांचें पाणी सहसा आटत नाहीं. म्हणून त्यांना उंच ठिकाणीं मोठाले बंधारे बांधून पाणी अडवून तें सखल व खोलगट प्रदेशांत सोडण्याची

व्यवस्था सरकारनें केली आहे. आपल्याकडील पहिला मुठा कालवा हा मुठा नदीला पुण्याजवळ खडकवासलें येथें धरण बांधून सुरू केला आहे. पुणें शहराला याच कालव्याचें पाणी मिळतें. पुण्याच्या आसपास थोडी उंसाची लागवडही झाली आहे. शिवाय इतर पिकांनाही पाणी देण्यांत येतें. दुसरा नीरा कालवा. भोरजवळ भाटघर येथें मोठें धरण बांधून ह्या कालव्याचें पाणी नीरेपासून पुणें जिल्ह्याच्या सर्व दक्षिण भागामध्यें नीरा नदीच्या उत्तर किनाऱ्याला पुरविण्यांत येतें. या कालव्यामुळेंच बारामतीजवीक मालेगांव येथें साखरेची गिरणी चालली आहे. नीरेचा उजवीकडील फांटा फलटण संस्थानामधून जाऊन सोलापूर जिल्ह्यामधील कांहीं जमीन लवकरच भिजवूं लागेल. नाशिक व अहमदनगर जिल्ह्यांत गोदावरीच्या उजव्या तीरावरील एक व डाव्या तीरावरील एक असे दोन कालवे आहेत; तसेंच प्रवरेच्या उजव्या व डाव्या तीरांवरून दोन कालवे जातात. प्रवरेला भंडारदरा येथें एक मोठें धरण बांधण्यांत येत आहे. शिवाय 'लेक आर्थर हिल' म्हणून एक तलावही बांधण्यांत येत आहे. बेलापूर येथें कंपनीनें ऊंस लावण्याकरितां व साखरेचा कारखाना काढण्याकरितां दोन हजार एकर जमीन आपल्या कबज्यांत घेतली आहे. नीरा नदीच्या आसपासच्या मुलखाची जशी भरभराट झाली आहे तशीच या कालव्यांमुळें या प्रदेशाचीही होईल.

धरणाच्या कामावर स्वतंत्र इंजिनिअरची नेमणूक होते. इरिगेशनचे निरनिराळे जिल्हे करून प्रत्येकावर एक एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर म्हणून अधिकारी असतो. त्याच्या हाताखालीं असिस्टंट इंजिनिअर असतात. यांनाच सब् डिव्हिजनल ऑफिसर म्हणतात. ते आपल्या भागावर देखरेख करितात. त्यांच्या हाताखालीं ओव्हरसिअर, सेक्शन ऑफिसर, इन्स्पेक्टर व पाटकरी अशी अधिकाऱ्यांची मालिका लागलेली आहे. पाटकरी हा सर्वांत लहान अधिकारी असला तरी लोकांच्या

सोयी पाहण्याचें त्याचें काम असतें म्हणून त्याला पोलीस शिपायापेक्षां जास्त मान मिळतो.

रस्ते किंवा इमारती बांधण्याचें काम पाहाण्याकरितां जिल्ह्यावर एक एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअर असतो. त्याच्या हाताखालीं एक किंवा दोन असिस्टंट इंजिनिअर असतात. शिवाय कित्येक ओव्हरसिअर असतात. जागजागीं बांधलेल्या रहदारीच्या बंगल्यांची डागडुजीही पब्लिक वर्क्स् खात्याला करावी लागते. ठिकठिकाणीं सामान ठेवण्याकरितां स्टोअरकीपर म्हणून अधिकारी असतात. डाक (रहदारी) बंगल्यामध्यें मुलकी अधिकाऱ्यांच्या परवानगीनें कोणालाही भाडें देऊन राहातां येतें. सरकारी नोकरांना दहा दिवसपर्यंत मोफत बंगला मिळतो.

बारीकसारीक रस्ते दुरुस्त करण्याचें काम लोकलबोर्डाकडे आहे. पुणें, सोलापूर, मुंबई, आग्रा असे मोठाले रस्ते फक्त पब्लिक वर्क्स् खात्याकडे राहिले आहेत; म्हणून खेडेगांवांतील लोकांशीं या खात्याचा संबंध फारच थोडा येतो.

पाठ बत्तिसावा.

शेतकीखातें.

मुलांनों; आपल्या देशांतील बहुतेक लोक आपली उदरनिर्वाह शेतकीवर करितात हें तुम्हांस माहीत आहेच. आपल्या उद्योगधंद्या-मध्येंसुद्धां मुख्य धंदा शेतीचा. जमिनी मुबलक व बऱ्याच भागांत भरपूर पाऊस; यामुळें अद्यापपावेतों लोकांचा चरितार्थ शेतकीवर चालला, परंतु यापुढें मात्र हल्लीं पीक निघत आहे तेवढ्यानें आपलें भागणार नाहीं. शेतकरी आपल्या शेतांत धान्य पिकवितो, त्यांतून त्याला कित्येक गोष्टी करावयाच्या असतात. धान्य विकूनच तो शेत-

सारा भरतो, कर्जवाम फेडतो, कपड्यालत्त्याकरितां पैसे खर्च करितो व मुलांमुलींचीं लग्नें वगैरे कामें करितो. त्याला या सर्व अडचणींमुळें धान्य विकणें भाग पडतें. साधारणपणें जास्त किंमत देऊनही परदेशचे लोक येथून धान्य नेतात. हें त्यांनीं नेलें नाहीं, तर आपल्या शेतकऱ्याला कमी दरानें धान्य विकावें लागेल, आणि घरगुती कामाकरितां त्याला भरपूर पैसा मिळणार नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार करून जमिनीचा मगदूर वाढवून जास्त धान्य पिकेल अशी व्यवस्था करण्याकरितां मुंबई सरकारनें इ. स. १८७७ सालच्या मोठ्या दुष्काळानंतर शेतकीखातें सुरू केलें. या खात्याप्रीत्यर्थ सरकार सुमारें सव्वीस लक्ष रुपये खर्च करितें.

शेतकीखात्याकडून मुख्यतः खत व बीं याची सुधारणा व्हावी म्हणून जास्त प्रयत्न चालू आहेत. शिवाय सुधारलेलीं आउतें उपयोगांत यावींत म्हणूनही या खात्याकडून खटपट होत आहे. जनावरांची पैदास चांगली व्हावी, शेतकऱ्याला शेताचे कामीं सशक्त बैल मिळावे म्हणून या खात्यानें बरीच मेहनत चालविली आहे. सुधारलेल्या पद्धतीची माहिती व्हावी म्हणून जागजागीं शेतकी सभा स्थापन करण्यांत आल्या आहेत. या सभांकडून शेतकऱ्यांना शेतकीविषयक उपयुक्त माहिती सांगितली जाते. शिवाय 'शेतकी व शेतकरी' या सारखीं मासिकेंही शेतकऱ्यांच्या हितार्थ चालविलीं जात आहेत.

शेतकी हा विषय सुशिक्षित लोकांच्या हातीं जावा व अशा लोकांकडून शेतकीसुधारणेला मदत व्हावी म्हणून सरकारनें पंधरा वर्षांपूर्वीं पुणें येथें एक शेतकी कॉलेज काढिलें. हिंदुस्तान देशांत हें पहिलेंच शेतकी कॉलेज होय. सुमारें दोनशें विद्यार्थी येथें शेतकीचें शिक्षण घेत आहेत. त्यांना शिक्षण देणारा शिक्षकवर्गसुद्धां मोठा आहे. एकंदर सव्वीस लोक तेथें लहान मोठ्या शिक्षकाचें काम करीत आहेत. इंग्रजी सातवी म्हणजे स्कूल-लीव्हिंग परीक्षा झाल्यानंतर कॉलेज

मधील एक परीक्षा पास होऊन मग विद्यार्थ्यांचा या कॉलेजमध्यें प्रवेश होतो. येथील तीन वर्षांचा अभ्यासक्रम पुरा झाला म्हणजे 'बी. एजी.' अशी त्याला मुंबई विश्वविद्यालयाचीं पदवी मिळते. शक्य तितके शेतकी करणारे लोकच येथें तयार व्हावे, अशी या कामीं सरकारची इच्छा आहे. पुसा येथें एक शेतकी कॉलेज असून तेथें शेतकीविषयक नवीन शोध करितात.

या शिवाय कमी शिकलेल्या मुलांना सुद्धां शेतकीचें शिक्षण मिळावें म्हणून थोडया शेतकी शाळा काढण्यांत आल्या आहेत. पुण्याजवळ लोणी येथें एक चांगली शेतकी शाळा चालू आहे. कोंकणामध्यें जांबूळ येथें दुसरी एक आहे. लोणी येथील शाळेंत आज पन्नासवर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अभ्यासक्रम दोन वर्षांचा असून साधारण शिक्षण मिळालेल्या मुलांचा तेथें प्रवेश होतो. कल्याण तालुक्यांत म्हणजे जांबूळ येथें सुमारें तीस विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. धुळें येथेंही नुकतीच एक शेतकी शाळा निघाली आहे. शेतकी शिक्षणाचा फैलाव होऊन साधारण शेतकऱ्याला तें मिळावें म्हणून मोठमोठ्या प्राथमिक शाळांमधून शेतकीचे वर्ग सुरू करण्याचा विचार आहे. थोड्याच वर्षांत निदान प्रत्येक तालुक्यांतून एक तरी शेतकी शाळा अगर शेतकीवर्ग सुरू झालेला आपणांला दिसेल.

शेतकीखात्यामार्फत एक इंजिनिअर पंप लावून पाणी काढणें, यंत्राच्या मदतीनें विहिरी कोठें खणाव्या वगैरे बाबतींत सल्ला देणें हीं कामें करितो. कॉलेजमधील प्रोफेसर यांच्याकडे एक एक खातें सोंपविलें असून त्याविषयीं नवीन शोध काय केले याचा प्रत्येकाला स्वतंत्र रीतीनें जबाब द्यावा लागतो. कांहीं ठिकाणीं खार लागलेल्या जमिनी दुरुस्त करण्याचे प्रयोग चालले आहेत. व कांहीं ठिकाणीं नमुन्याचीं शेतें चालविलीं आहेत. धुळें, बारामती, कोपरगांव वगैरे ठिकाणीं अशीं शेतें आहेत. शिवाय लोकांना माहिती देण्याकरितां म्हणून प्रत्येक जिल्ह्याला एक ॲग्रि-

कल्चरल ओन्हरसियर या नांवाचा अधिकारी असतो. तीन किंवा चार जिल्ह्यांच्या भागावर सर्व प्रकारची देखरेख करण्याकरितां एक शेतकीचा डेप्युटी डायरेक्टर असतो. आपल्या महाराष्ट्राचे असे तीन भाग केलेले आहेत. पूर्वखानदेश, पश्चिमखानदेश व नाशिक या जिल्ह्यांचा एक भाग केलेला आहे, याला उत्तर-मध्यभाग असें म्हणतात. याचें मुख्य ठिकाण नाशिक शहर आहे. पुणें, सातारा, सोलापूर व अहमदनगर या जिल्ह्यांचा एक भाग असून त्याचें मुख्य ठिकाण पुणें समजलें जातें; या भागाला दक्षिण—मध्यभाग म्हणतात. शिवाय ठाणें, कुलाबा, रत्नागिरी व कारवार या जास्त पाऊस पडणाऱ्या जिल्ह्यांचा एक गट केलेला आहे, याला कोंकणभाग म्हणतात. या भागाचें मुख्य ठिकाण रत्नागिरी आहे.

शेतकीखात्याचा इतर खात्यांशीं निकट संबंध येतो. विशेषतः सहकारी पतपेढ्यांवर व पाटबंधाऱ्यांवर शेतकीची मदार जास्त असते. शेतकऱ्याला पैसा पाहिजे व पाऊस नसेल तेथें पाणी पाहिजे म्हणून सहकारीखातें, पाटबंधारेखातें व शेतकीखातें यांचे परस्परसंबंध नीट राहाणें अवश्य आहे.

पाठ तेहतिसावा.

सहकारी पतपेढ्या.

हिंदुस्तान देशांत शेतकऱ्यांचा भरणा मोठा आहे. परंतु वरचेवर पडणारे दुष्काळ, भारत आपआपसांत वेगळे होतात त्यामुळें होणारे जमिनीचे तुकडे, लोकांचें अज्ञान, सावकारांचा तगादा इत्यादि गोष्टींमुळें शेतकऱ्यांची स्थिति फार हलाखीची झाली आहे. शेतकऱ्यांना

कमी व्याजानें पैसे मिळून त्यांचें शेतीचें काम सुरळीत चालावें म्हणून अलीकडे सहकारी पतपेढ्या निघाल्या आहेत.

आपसांत भांडवल उभारून अल्पशा व्याजानें त्या रकमा आपल्यांतील कर्जाची जरूरी असणारास पुरविणें, व हप्त्याहप्त्यांनीं कर्जाची फेड करून घेऊन कर्जांतून त्याची मुक्तता करणें हा सोसायट्यांचा मुख्य उद्देश आहे. व्यवस्थितपणानें वागल्यास यांच्या योगानें (१) थोड्या व्याजानें कर्ज मिळतें. (२) कर्जफेडीस सवलत मिळते. (३) सावकारी त्रास चुकतो. (४) खर्चांत काटकसर करून बचत होते. (५) व मनुष्य कर्जांतून मुक्त होतो.

कांहीं मंडळी एकत्र जमून भांडवल जमविणें, कर्ज देणें, व्याज आकारणें, मेंबर लोक मिळविणें वगैरे बाबींचा खल करितात. नंतर प्रत्यक्ष कार्य करण्याकरितां अध्यक्ष व कार्यकारी मेंबर यांची निवड केली जाते. जरूर तर सोसायट्यांचे रजिस्ट्रार यांची संमति मिळविण्यांत येते आणि मग प्रत्यक्ष कार्यास सुरवात होते.

शेतकऱ्यांच्या पतपेढ्या एक किंवा जास्तही एकें ठिकाणीं काढितां येतात. प्रत्येक पेढी सरकारकडे रजिस्टर करावी लागते. मेंबर लोक सभा भरवून आपणांपैकीं सात लोकांची एक कमिटी नेमितात. या सातां मधूनच एकाला अध्यक्ष निवडतात. कर्ज कोणाला द्यावें? किती द्यावें? तारण बरोबर आहे किंवा नाहीं? तहकुबी द्यावी किंवा नाहीं? दिलीच तर किती द्यावी? या गोष्टींचा निकाल व्यवस्थापक कमिटी करिते. चालचलाऊ काम पाहाण्याकरितां एक मनुष्य असतो त्याला सेक्रेटरी म्हणतात. हप्ते चुकल्यास जबर व्याज भरावें लागतें व इतकेंही करून कर्जाची फेड झाली नाहीं तर जमिनीचें लिलांव पुकारून पैसे वसूल करण्यांत येतात.

तीन किंवा जास्त पतपेढ्या एकत्र झाल्या म्हणजे त्याला युनियन म्हणतात. युनिअनमध्यें जावें किंवा नाहीं हें सोसायट्यांनींच ठरवावयाचें

असतें. युनिअनमधील पतपेढ्यांचे सर्व मेंबर युनिअनचे मेंबर समजले जातात. प्रत्येक मेंबरला युनिअनकरितां वीस पासून दोनशें रुपयांपर्यंत जबाबदारी घ्यावी लागते. या एकंदर जबाबदारीच्या सहापट रक्कम जिल्हा बँक अगर प्रांतिक बँक प्रत्येक युनिअनला देऊं शकते. आपली पेढी स्वतंत्र ठेविली तर अशी कर्जाऊ रक्कम सुलभ रीतीनें मिळत नाहीं. युनिअनमार्फत ती मिळते. हाच युनिअनमध्यें जाण्यापासून होणारा फायदा होय. युनिअनलाही आपलें व्यवस्थापक मंडळ, सेक्रेटरी व सुपरवायझर (देखरेख करणारे) इतके अधिकारी नेमण्याचा अधिकार आहे. आपल्या गांवच्या पतपेढीनें जेवढ्या रकमेची जबाबदारी घेतली असेल त्याच्या बारापट कर्जाऊ रक्कम आपणाला युनिअन देऊं शकते.

शेतकऱ्यांप्रमाणेंच इतर कामदार लोकांनाही आपली स्वतंत्र पतपेढी काढितां येते. अशा पतपेढ्यांचे भाग म्हणजे शेअर काढितात व ते घेणारांनाच मेंबर होतां येतें. प्रसंगीं कर्ज मिळून अडचण दूर व्हावी म्हणून लोक या पेढ्यांचे मेंबर होतात. कांहीं पेढ्यांत शेअर घेऊन शिवाय मेंबर लोकांना प्रवेश फी व पुढें दर महिनाही फी भरावी लागते. या फीचें रूपांतर पुढें शेअरांमध्यें करितां येतें. खेडेगांवात व्यवस्थापकांना कर्ज मागणाराची पत पूर्ण माहीत असते. शहरांत तसें नसतें, म्हणून शहरांतील पतपेढ्यांवर शेअर घेण्याची मुख्य अट लादलेली आहे.

जिल्हा बँकमधून सर्व पतपेढ्यांना लागणारी कर्जाऊ रक्कम ताबडतोब मिळते. प्रत्येक पतपेढीला बँकेचा एक तरी शेअर घ्यावा लागतो. या बँकेंत ठेवीच्या अगर कर्जाच्या रूपानें आलेला पुष्कळ पैसा शिलक असतो. तो थोड्या जास्त व्याजानें पतपेढ्यांना अगर युनिअनांना कर्जाऊ मिळतो. बँकेचे अधिकारी कधीं पतपेढ्यांची तपासणी मात्र करितात.

आपणाला दिसणाऱ्या यां सर्व पतपेढ्या सरकारी असतील असा तुमचा समज असेल तर तो साफ चुकीचा आहे. पतपेढ्या लोकांच्या आहेत आणि

लोकच आपल्या देखरेखीखालीं त्या चालवितात. व अशाच त्या चालाव्या अशी सरकारची इच्छा आहे. लोकांना लबाडी करण्यास सवड सांपडूं नये व गोरगरीब बुडूं नयेत म्हणून फक्त सरकार आपली देखरेख ठेवितें.

या देखरेखीच्या कामाकरितां मुंबई सरकारचा एक बडा अधिकारी आहे; त्याला रजिस्ट्रार असें म्हणतात. त्याच्या हाताखालीं साधारण तीन चार जिल्ह्यांवर एक असिस्टंट रजिस्ट्रार असतो. या असिस्टंट रजिस्ट्रारच्या हाताखालीं साधारणपणें शंभर पतपेढ्यांवर एक असा ऑडिटर म्हणजे हिशेबतपासनीस असतो. आपल्या भागांतील सर्व पेढ्या तो वर्षांतून एकदांतरी तपासतो व प्रत्यक पेढीवर आपला रिपोर्ट लिहून त्याची एक प्रत पतपेढीच्या अधिकाऱ्यांकडे व दुसरी रजिस्ट्रारकडे पाठवितो.

या तपासणीमुळेंच पतपेढ्यांचें काम व्यवस्थित चाललें आहे. तपासणारा अधिकारी त्रयस्थ असून त्याच्यावर सरकारची नजर असते म्हणून त्याचें काम चोख होतें. ऑडिटरचे चांगले अभिप्राय एकाद्या पतपेढीवर पडले म्हणजे लोक आपल्या ठेवी तीमध्यें ठेवितात. अशा रीतीनें स्वतःचें भांडवल झालें म्हणजे पतपेढीचा दर्जा वाढतो. कधीं कधीं भागाचे असिस्टंट रजिस्ट्रार हेही एकाद्या पेढीचें दफ्तर तपासतात.

पाठ चौतिसावा.

आरोग्य.

हिंदुस्तानमध्यें अज्ञान, नाशवंत देह म्हणून त्याला तुच्छ लेखण्याची प्रवृत्ति, वारंवार पडणारे दुष्काळ या व इतर अनेक कारणांनीं लोकांचें आरोग्य कमी होत चाललें आहे. Health is wealth (आरोग्य म्हणजेच संपत्ति) अशी इंग्रजी भाषेमध्यें एक म्हण प्रचारांत

आहे. शरीर नीट नसेल तर संपत्ति मिळवितां येत नाहीं, वाडवाडिलांनीं ती मिळवून ठेविली असली तर रोगी माणसांना तिचा उपभोग घेतां येत नाहीं. 'घट्टाकटी गरिबी व लुळीपांगळी श्रीमंती' ही गोष्ट सर्वांना माहीत आहेच.

लोकांना शरीरपोषणाकरितां लागणाऱ्या अवश्य वस्तु महाग झाल्यामुळेंही त्यांचें आरोग्य खालावत आहे. विशेषतः खेडेगांवांतून प्रवासी माणसालासुद्धां दूध मिळण्याची किती पंचाईत पडते याचा अनुभव बऱ्याच लोकाना आहे. दोन पैसे जवळ असले तर त्यांचा उपयोग शरीरसंवर्धनाकडे करण्यापेक्षां डामडौल करण्याकडे केला तर लोक आपणांला मोठे म्हणतील अशी लोकांची चुकीची समजूत आहे. खेडेगांवीं थोडा उद्योग करून आपला चरितार्थ चालवितां येईल असे लोकसुद्धां शहरांत जाऊन राहाण्याचा प्रयत्न करितात. शहरांत घाणीमुळें निरनिराळे स्पर्शजन्य रोग उत्पन्न होतात. त्यांचा फैलाव खेडेगांवीं होऊन पटकी, प्लेग, देवी व इन्फ्लुएंझा या रोगांनीं तर हिंदुस्तान हें आपलें माहेरघर केलें आहे. मलेरिया (हिंवताप) याचें ठाण तर घरधन्याप्रमाणेंच झालें आहे.

शहरांमध्यें मुलांची मृत्युसंख्या तिहींस एक या प्रमाणांत आहे. प्लेगमुळें गेल्या पंचवीस वर्षांत एक कोटीपेक्षां जास्त माणसें मृत्युमुखीं पडलीं. इन्फ्लुएंझा तापाची सांथ येतांच तीन महिन्याच्या आंत साठ लक्ष माणसें काळानें ओढून नेलीं. नुसत्या हिंवतापानें वर्षांमध्यें दहा लक्ष माणसें मृत्यूला बळी पडतात. या सर्व गोष्टी आपला कमकुवतपणा दाखवितात. रोगाबरोबर झगडा करून त्याला चीत करण्याची ताकद आपल्या शरिराला नाहीं. म्हणूनच लाखोंलोकांचा सालीना संहार होत आहे.

शरीरामधील ताकद गेली आहे. ती पुन्हा येईल कशी? याबद्दल विचार करून प्रत्येकानें ती मिळविण्याचा यथाशक्ति प्रयत्न केला

पाहिजें. लोकांना भरपूर हवा, उजेड, दूध व शुद्ध अन्न यांचा पुरवठा झाला पाहिजे. रोगांच्या बाबतींतलें लोकांचें अज्ञान घालविलें पाहिजे. पुष्कळ रोग योग्य काळजी घेतली असतां निवारितां येतात. स्थलांतर केल्यानें अगर टोंचून घेतल्यानें प्लेगापासून बचाव होतो. उंदीर नाहींसे केल्यानें प्लेग पसरत नाहीं असें आतां अनुभवानें सिद्ध झालें आहे. देवी टोंचून घेतल्यानें किती फायदा होतो हें सर्वांच्या प्रत्ययास आलें आहे. पाणी तापवून व गाळून प्याल्यानें पटकी व नारू यांपासून आपण अलिप्त राहातों हेंही आतां सर्वांस पटलें आहे. याही गोष्टी निव्वळ आळसामुळें न करणारे लोक आपणांमध्यें कितीतरी आहेत. तरी पण आमचें आयुष्य संपेल तेव्हां आम्ही मरूं, तोंपर्यंत आम्हांला कांहीं होणार नाहीं असें म्हणून प्लेगमध्यें जागींच मरणाऱ्या दैववादी लोकांची संख्या कमीं होत आहे ही एक आनंदाची गोष्ट होय.

रोगप्रतिबंधक उपाय योजण्याकरितां सरकारनें आरोग्यखातें निर्माण केलें आहे. डिरेक्टर ऑफ हेल्थ हा या खात्याचा अधिकारी आहे. जागजागीं प्रयोग करून लसी तयार करणें, त्यांचा वेळच्या वेळीं पुरवठा करणें हीं कामें तो करितो. देवी टोंचण्याकरितां देवीडॉक्टर हिंडत असतात. त्यांना ताज्या लशीचा पुरवठा बेळगांवाहून होतो. प्लेगची लस मुंबई येथें एक प्रयोगशाळा आहे तींत तयार होते. पिसाळलेलें कुत्रें चावलें तर त्यावर उपाययोजना करण्याची व्यवस्था जिल्ह्याच्या ठिकाणीं केली आहे. मोठमोठ्या गांवीं, तालुक्याच्या ठिकाणीं व जिल्ह्याच्या ठिकाणीं दवाखाने ठेविले आहेत. जिल्ह्याला एक इस्पितळ असतें. तेथील मुख्य अधिकारी एक मोठा डॉक्टर असतो. त्याला सिव्हिल सर्जन म्हणतात. त्याच्या मदतीला क्वचित् असिस्टंट सर्जन व बरेच सब् असिस्टंट सर्जन असतात. इलाख्यावरील अधिकाऱ्याला सर्जन जनरल म्हणतात. खेडेगांवींसुद्धां रोगांवर उपाययोजना व्हावी म्हणून कांहीं शिक्षक तयार करून त्यांच्याजवळ

औषधांचा सांठा ठेवण्याची व्यवस्था करण्याच्या विचारांत सरकार आहे. वैद्यकीचें एक मोठें विद्यालय मुंबईंत असून पुणें, अहमदाबाद व हैदराबाद येथें सब् असिस्टंट सर्जन तयार करणाऱ्या शाळा आहेत. वैद्य लोक तयार करावयाच्या शाळाही निघत आहेत. पुणें, सातारा, नगर, वगैरे ठिकाणीं त्या खासगी रीतीनें चालू आहेत.

आरोग्य विशेषतः स्वच्छतेवर अवलंबून असतें. स्वच्छता राखणें हें जसें सरकारचें काम आहे तसेंच तें लोकांचेंही आहे. नुसतें आपलें घर स्वच्छ ठेवून भागणार नाहीं. आपल्या शेजाऱ्यांचींही तीं तशीं पाहिजेत. याकरितां त्यांनाही स्वच्छतेसंबंधीं आपण उपदेश केला पाहिजे. आपल्या घरचा केर दुसऱ्याच्या दारांशीं टाकणाऱ्या लोकांची गणना कशांत करावी हें सांगणें कठीण आहे.

पाठ पस्तिसावा.

औद्योगिकखातें.

औद्योगिक उन्नति व्हावयाची म्हणजे मोठमोठाल्या गिरण्या निघाल्या पाहिजेत असेंच नाहीं. खेडेगांवामध्येंसुद्धां जे धंदे घरीं बसून करितां येतील असेही काढण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. आतांपर्यंत शिकलेल्या लोकांना सरकारी नोकऱ्या मिळत असत. परंतु गरजेपेक्षां जास्त उमेदवार आतां पैदा होत आहेत. यामुळें त्यांची बाजारामध्यें किंमतही कमी झाली आहे. शाळेमधील अभ्यासक्रम संपला म्हणजे नोकरीच्या अभावीं लोक फार चिंताग्रस्त होतात. परंतु घरच्याघरीं उद्योग केल्यास आपला चरितार्थ चांगला चालेल ही त्यांना कल्पनाही नसते.

घरींच राहून सुतारकी, लोहारकी, विणकाम, रंगकाम, छपाई, मातीचीं कामें, शिवणकाम, पुस्तकें बांधण्याचें काम, पत्र्यांचें काम, लांकूड, घोंडा

व धातुं इत्यादिकांवरील कोरींव काम, तसेंच कांतींव काम, साइनबोर्ड, म्हणजे नांवाच्या पाट्या रंगविण्याचें काम, फोटो घेण्याचें काम, दोर वळण्याचें काम, परीट काम, बांबूचें व वेताचें विणकाम, खेळणीं करणें, रबराचे स्टॅम्प करणें इत्यादि हस्तकौशल्याचीं कामें कोणालाही करितां येतील. तसेंच घडीचे पंखे, साधे पंखे, हंड्याझुंबरें, कमळें, फुलें, हार, गजरे, माळा, तोरणें, मंडोळ्या, बाशिंग, द्रोण, सांखळ्या, कमानी, मखरें, बांबूच्या चोया, आकाशदिवे, काड्यांची गाडी, बंदूक, धनुष्य, बाण, चेंडू, बाहुल्या इत्यादि खेळणीं करून कोणाचाही चरितार्थ सहज चालेल.

आपण शाळेंत बौद्धिक शिक्षण घेतों तसेंच तें औद्योगिक बाबतींतही घेतलें पाहिजे. बडोद्याचें कलाभुवन, मुंबईची व्हिक्टोरिया जुबिली टेक्निकल इन्स्टिटचूट, धुळें, अहमदनगर, पंढरपूर व पुणें येथील टेक्निकल शाळा यांमध्यें औद्योगिक शिक्षण मिळतें. उत्तम शिक्षण कारखान्यामध्यें राहून मिळतें. हुषार विद्यार्थ्यांनींसुध्दां औद्योगिक शिक्षण घ्यावें; कारण औद्योगिक शिक्षणानें बौद्धिक शिक्षण मिळतें; परंतु एकांगी बौद्धिक शिक्षणानें मात्र शारीरिक श्रमाची नावड उत्पन्न होते व मनुष्य सर्वस्वीं उद्योगाला नालायक होतो.

सरकारनें एक औद्यौगिक खातें ठेविलें आहे. त्यावर डिरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज म्हणून एक मुख्य अधिकारी आहे. याच्याकडून जरूर ती माहिती व सल्ला मिळूं शकेल. एकाद्याला साबणाचा धंदा काढावयाचा असेल तर साबणाला लागणारा कच्चा माल कोठें मिळूं शकेल ही माहिती हा अधिकारी देईल. याच खात्याकडून लेबर ब्यूरो चालविला जातो. हा ब्यूरो धान्याचे भाव वगैरे माहिती मिळवून मजुरांच्या राहाणीमध्यें होणाऱ्या चढउतारांची माहिती पुरवितो. हिंदुस्तानसरकारचेंसुद्धां औद्योगिकखातें आहे. शाळांमधून औद्योगिक शिक्षण कसें द्यावें याबद्दलही मुंबईसरकारजवळ एक योजना तयार आहे.

परदेशीं जाऊन तेथें कांहीं धंद्यांची माहिती मिळवावी म्हणून हिंदुस्तानसरकार इ. स. १९०१ पासून सालीना दीडशें पौंडांच्या दहा शिष्यवृत्त्या देत आहे. हल्लीं ही रक्कम २४० पौंडांपर्यंत वाढली आहे. शिवाय फी व प्रवासखर्चही देण्यांत येतो. परंतु पूर्वीच्या पाठांत सांगितल्याप्रमाणें औद्योगिक उन्नति एकदम होणार नाहीं. ती शास्त्रीय विषय घेऊन पास झालेल्या पदवीधरांनीं स्वार्थत्यागपूर्वक काम केल्यानेंच व्हावयाची आहे.

नवीन धंदा काढतांना प्रत्येकानें आपल्या सभोंवतालच्या भागांची पाहाणी करावी. धंद्याला लागणारा कच्चा माल, तो मिळण्याचें ठिकाण, त्याचा दर, वाहतुकीचा खर्च, तयार होणाऱ्या मालाची पैदास व खप या सर्व गोष्टींचा विचार करावा. नाहींतर आपल्याजवळ असेल तें भांडवल जाऊन पाठीमागून पस्तावा होण्याची पाळी यावयाची.

पाठ छत्तिसावा.

दुष्काळनिवारण.

महाराष्ट्रीयांस दुष्काळाचा चांगला परिचय आहे. निदान तीन वर्षांतून दोनदां दुष्काळ पडतो अशीं ठिकाणें या भागांत पुष्कळ आहेत. कधीं पाऊस अजिबात न पडल्यामुळें तर कधीं तो फार पडल्यानें दुष्काळ पडतात. महाराष्ट्राच्या पूर्वभागामध्यें पाऊस कमीच पडतो. या ठिकाणींसुद्धां तोच हंगामीं पडला तर पिकें चांगलीं येतील, परंतु बहुधा तो वेळेवर पडत नाहीं. आपली शेती तर सर्वस्वीं लहरी पावसावर अवलंबून असल्यामुळें अगोदर पेरतां येईल कीं नाहीं, पेरलें तर उगवेल कीं नाहीं, उगवलें तर हातीं येईल कीं नाहीं याबद्दल शेतकऱ्याला भरवंसा नसतो.

दुष्काळामध्यें पूर्वी लोकांना उपयोगीं पडेल असे धान्याचे व वैरणीचे (जित्रापाचे) सांठे शेतकऱ्यांजवळ असत. आतां शिलकीचें धान्य व कडबा शेतकरी अनेक कारणांमुळें विकतो. बरें, विकून जे पैसे येतील ते तरी त्याच्याजवळ शिल्लक राहातील अशी खातरी कोठें आहे? वैरणीच्या महर्गतेमुळें जनावरें पाळणें शेतकऱ्याला डोईजड होतें. तीं विकिलीं तर पैसा कमी येतो. न विकावीं तर चाऱ्याच्या अभावीं तीं उठवणीस येतात व मरून जातात. जनावरें मेलीं म्हणजे शेतकऱ्याला पुन्हा सुरवातीपासून नवीन तयारी करावी लागते. अशा प्रसंगीं तो कर्जबाजारी तरी होतो; किंवा शेती सोडून मुंबईस पोट भरण्यास तरी निघून जातो.

पूर्वीपेक्षां दुष्काळाचें स्वरूप आतां कमी तीव्र झालें आहे. हिंदुस्थानामध्यें सर्वच ठिकाणीं एकाच वेळेला सारखा दुष्काळ पडतो असें नाहीं. मुंबई इलाख्यामध्यें गहूं पिकला नाहीं तर तो पंजाबांत पिकतो. मावळांत तांदूळ झाला नाहीं तर तो ब्रह्मदेशामध्यें भरपूर होतो. रेलवे व आगबोटी यांच्या साहाय्यानें तो आणितां येतो. तो विकत घेण्यास पैसा पाहिजे व मजूरी करून तो मिळवितां येतो. दुष्काळाच्या दिवसांत पोट भरण्याकरितां लोक बाहेर पडतात. मजूरीचे दर यामुळें कमी होतात. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन धनिक लोक आपली इमारतीचीं वगैरे कामें सुरू करितात. शक्य तितकीं जवळपास दुष्काळी कामें सरकार सुरू करितें. अलीकडे मोठाले दुष्काळ पडले, त्यावेळीं धान्याच्या किंमती वाढल्या, पण धान्य नाहीं म्हणून मनुष्य उपाशीं मेला असें उदाहरण क्वचितच घडलें असेल.

सडका बांधणें, तलाव खोदणें, इमारती बांधणें हीं कामें सरकार काढतें. ज्या लोकांना कामावर जातां येत नाहीं अशीं लुळींपांगळीं माणसें, लहानमुलें, अब्रूदार स्त्रिया यांस सरकार डोल देतें. अशा लोकांची यादी मुलकी अधिकाऱ्यांजवळ तयार असते. पावसाचा रागरंग

पाहून बजेटमध्यें या कामाकरितां निराळी रक्कम राखून ठेवण्यांत येते. शेतकऱ्यांना तगाई व सूट देतात. धान्याच्या महागाईमुळें जें मिळेल तें धान्य खाऊन लोक राहातात. आणि पुढें कोणता तरी रोग फैलावून लाखों लोक प्राणास मुकतात. दुष्काळामध्यें लोकांना मदत करण्याकरितां सरकाराजवळ एक फंड आहे. त्याची व्यवस्था करण्याकरितां चार लोकांची एक कमिटी नेमिलेली आहे.

दुष्काळ नाहींसा करण्याकरितां पुष्कळ उपाय करितां येतील. पाऊस पडतो तें पाणी वाहून जाऊं नये, व जमिनींत मुरावें म्हणून ताली बांधणें, विहिरी खोदणें, पाण्याचे मोठाले तलाव खोदून काढणें, जागजागीं नद्यांना बंधारे बांधून पाणी अडवून ठेवणें, या योगानें शेतीचें कांहीं उत्पन्न निश्चित होईल. शेतकऱ्यांना यांपैकीं थोडीं कामें स्वतः करितां येतील. त्यांना सहकारी पतपेढीमधून पैसा कर्जाऊ घेऊन पाणी सांपडेल अशा ठिकाणीं विहिरी खणतां येतील, आणि अशानें वारंवार येणाऱ्या दुष्काळाला तोंड देण्याची त्यांच्या आंगीं धमक येईल.

पाठ सदतिसावा.

प्रान्तिक किरकोळ खातीं.

जंगल—जंगलामुळें हवा समशीतोष्ण होऊन, पाऊस पुष्कळ पडतो. सरपण व गुरांकरितां चारा यांचा पुरवठा करण्याला उत्तम साधन जंगल राखणें हें होय. हिंदुस्तानामधील लोकवस्तीचें प्रमाण घेतलें म्हणजे शंभर चौरस मैलांच्या क्षेत्रफळामधील लोकांस निवळ सरपणाचा पुरवठा करण्याकरितां सोळा चौरस मैल क्षेत्रामध्यें जंगल राखावें लागतें. आपल्या मुंबई इलाख्यामध्यें तें फक्त शेंकडा बारा आहे.

राखून ठेविलेलीं, संरक्षण केलेलीं आणि गांवकीचीं अशीं तीन

प्रकारचीं जंगलें आहेत. पहिल्या प्रकारच्या जंगलाचे ग्रूप केलेले असतात. त्यांत झाडांच्या गटांचा समावेश होतो. एक ग्रूप तयार होण्यास चाळीस वर्षें लागतात. दुसऱ्या प्रकारचें जंगल वाढलें म्हणजे त्याचें रूपांतर पहिल्या प्रकारांत होतें. तिसऱ्या प्रकारचें जंगल फार आहे.

जंगलखातें इ. स. १८६१ सालीं सुरू करण्यांत आलें. आज हें खातें चांगलें उत्पन्नाचें झालें आहे. हिंदुस्तानांत पन्नास लाखांपेक्षां जास्त लोक या खात्याच्या मदतीनें आपली उपजीविका करीत आहेत. इलाख्याचे चार भाग केले आहेत. प्रत्येक भागावर एक कॉन्झर्वेटर असतो. पोटभागांवर असिस्टंट कॉंझर्वेटर अगर डिव्हिजनल ऑफिसर असतात. त्यांच्या हाताखालीं रेंजर, राउंडगार्ड व बीटगार्ड म्हणून छोटे अधिकारी असतात. जंगलखात्यामधील लोकांना वाईट हवेंत काम करावें लागतें. आज लाविलेलीं झाडें चाळीस वर्षांनीं तयार होतात. म्हणजे कामाचें प्रत्यक्ष स्वरूप त्यांच्या हयातींत दिसत नाहीं. रेंजर लोकांना शिक्षण देणाऱ्या शाळा डेराडून व कोइमतूर येथें आहेत.

अबकारी—देशी दारू, अफू, भांग, गांज्या यांसारख्या मादक पदार्थांवर सरकारनें कर ठेवून त्यांचा खप कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. दुकानाचा मक्ता मक्तेदार लोकांना देण्यांत येतो. मक्ते लिलावानें देतात. सरकारनें घातलेले नियम पाळले जातात किंवा नाहीं हें पाहाण्याकरितां अबकारी सुपरिंटेन्डन्ट व इन्स्पेक्टर असे अधिकारी असतात. ते कलेक्टरच्या सल्लामसलतीनेंच काम करितात. मादक पदार्थांची दुकानें फक्त ठराविक वेळीं उघडीं ठेवून, एका मनुष्याला एकाच वेळीं किती पदार्थ खरेदी करितां यावा यासंबंधीं नियम घालून दारूबाजीसारख्या व्यसनांना आळा घालणें हें सरकारी धोरण आहे.

रजिस्ट्रेशन—कोणताही कागद सरकारी कचेरींत नोंदल्याखेरीज त्याला कायदेशीर स्वरूप येत नाहीं. विशेषतः गहाणखत, खरेदीपत्र, मृत्युपत्र वगैरे महत्त्वाचे कागद नोंदतांना कचेरींतील अधिकाऱ्या-

पुढें प्रत्यक्ष जाब द्यावा लागतो. या अधिकाऱ्याला सब् रजिस्टर म्हणतात. प्रत्येक तालुक्याला एक सब् रजिस्टर असून तालुका मोठा असेल तर कोठें दोनही असतात. जिल्ह्याच्या ठिकाणीं रजिस्टरची मोठी कचेरी असते. मुलकीखात्याचेंच हें एक अंग आहे असें म्हटलें तरी चालेल. या खात्याचा जिल्ह्यांतील अधिकारी कलेक्टर समजला पाहिजे. रजिस्टरांच्या कचेऱ्यांची तपासणी करण्याकरितां इन्स्पेक्टर असतात. व इन्स्पेक्टरांवर इलाख्याचा मुख्य अधिकारी असतो. त्याला इन्स्पेक्टर जनरल ऑफ रेजिस्ट्रेशन असें म्हणतात. त्याचें ऑफीस पुणें येथें आहे.

गुरांचे रोग बरे करण्याकरितां जागजागीं गुरांचे दवाखाने ठेविले आहेत. प्रत्येक दवाखान्यावर एक गुरांचा डॉक्टर असतो. तो मुंबईच्या व्हेटरीनरी कॉलेजमध्यें शिकून पास झालेला असतो.

वेडे लोक समाजाला फार त्रासदायक होतात. शिवाय अनुकूल परिस्थिति व स्वास्थ्य या दोन गोष्टी मिळाल्या तर पुष्कळ वेडे लोक बरेही होतात. याकरितां सरकारनें जागजागीं वेड्यांचीं इस्पितळें ठेविलीं आहेत. तेथें वेड्याचें मन उद्योगांत व्यवस्थितपणें गुंतवून ठेवितात. ठाणें येथील वेड्यांचें इस्पितळ प्रसिद्ध आहे. पुणें येथेंही एक वेड्यांचें मध्यवर्ती इस्पितळ आहे.

एकादा मनुष्य मयत झाला आणि पाठीमागें त्याच्या मुलाचें कोणी पालन करणारा नसेल तर सरकार त्या मुलाच्या जिनगीची सर्व व्यवस्था लावतें. सरकारतर्फे कोर्ट ऑफ वॉर्डसकडे सर्व जिनगी जाते. कोर्टांतील नाझर तिची व्यवस्था पाहातो. मुलगा सज्ञान झाल्यावर खर्च वजा करून बाकीचा पैसा मुलाला परत मिळतो.

अलीकडे–पुराण–वस्तु–संशोधनाचें काम करण्याकरितां एक सुपरिंटेंडन्ट व त्याला मदतनीस अधिकारी दिले आहेत. हे जुन्या इमारती अगर त्यांचे भाग नीट शाबूत ठेवण्याची खबरदारी घेतात.

डायरेक्टर ऑफ् इन्फर्मेशन म्हणून एक अधिकारी मुंबईस आहे. लोकांना जरूर ती माहिती पुरविण्याचें काम हा अधिकारी करितो.

पाठ अडतिसावा.

सरकारी नोकर.

इंग्रजसरकारनें नोकर ठेवून त्यांना नोकरीमध्यें टिकून राहातां येईल अशी तरतूद केली आहे. यामुळेंच अद्यापपर्यंत आपल्या इकडील बहुतेक होतकरू माणसें सरकारी नोकरींत शिरलीं. साधारण, मध्यम अगर कनिष्ठ वर्गांतील माणूस आपलें थोडें जें कांहीं जवळ असेल, तें खर्चीं घालण्यापेक्षां तसेंच ठेवून बिनबोभाट पगार घरीं आणणारी सरकारी नोकरी धरितो. सरकारी नियम व व्यवस्था उत्तम असल्यामुळें व सरकारी नोकरांच्या वागणुकीचे नियम पाळल्यानें नोकराचा योगक्षेम तो जिवंत असे तोंपर्यंत ठीक चालतो.

सरकारी नोकरीमध्यें जिन्याच्या पायऱ्यांप्रमाणें एकावर एक अधिकारी नेमिलेले आहेत. या अधिकाऱ्यांची परंपरा मोठी आहे अशी कित्येकांची ओरड आहे. परंतु या परंपरेमुळेंच सर्व नोकर आपलें काम बऱ्या प्रकारें करीत आहेत. खालच्या दर्जाच्या नोकरांनासुद्धां महत्त्वाचीं कामें करावीं लागतात. यांपैकीं कांहींना पगार व शिक्षण बेताचें असतें. कांहींमध्यें स्वकर्तव्याची जाणीव विशेष तारीफ करण्याजोगी असते असेंही नाहीं. यांच्यावर वरच्या अधिकाऱ्यांची कडक नजर असेल तरच रयतेचें कल्याण होईल.

सरकारी नोकरांचे दोन वर्ग पडतात. कारकून होण्यास व्हर्नाक्युलर फायनल, स्कूल-लीव्हिंग व पूर्वीच्या परीक्षा दिलेले लोक लायक समजले जातात. अधिकारी लोकांचे आणखी तीन वर्ग आहेत. एक सबॉर्डिनेट म्हणजे खालच्या दर्जाचे लोक. दुसरे प्रांतिक सरकारच्या ताब्यांतले आणि तिसरे हिंदुस्तानच्या स्टेट-सेक्रेटरीच्या ताब्यांतील. पहिल्या वर्गांतील लोकांच्याच हातून कच्चा राज्यकारभार हांकला

जातो. म्हणून सर्व दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांतील लोक देखरेख, नियमन व दिशा दाखविण्याकरितां आहेत असें धरून चालण्यास हरकत नाहीं; व त्यांकरितां एकंदर बजेटमध्यें शेंकडा साडेअकरापेक्षां जास्त खर्च झालेला दिसत नाहीं.

राज्यकारभाराचें काम अवघड आहे. सरकारी धोरण ठरविणें व प्रांतिक खात्यांवर देखरेख करणें हीं कामें तिसऱ्या वर्गांतील अधिकारी करीत असतात. या अधिकाऱ्यांमध्यें अद्यापपर्यंत युरोपियन लोकांचा विशेष भरणा होता. हिंदी लोकांचा राज्यकारभारामध्यें बराच शिरकाव व्हावा म्हणून हळुहळूं हिंदी अधिकाऱ्यांचें प्रमाण वाढविण्याचें सरकारी धोरण आहे. यालाच इंडियनायझेशन म्हणतात. या अधिकाऱ्यांचे पगार भरपूर असले पाहिजेत. एकादा बुद्धिमान् तरुण डॉक्टर झाला तर आपली प्राप्ति दरमहा पांच हजारांच्या वर नेतो. वकील किंवा बॅरिस्टर झाला तर त्यांच्या प्राप्तीपुढें प्रांतिक गव्हर्नर फिका पडतोच; परंतु व्हाइसरॉयला सुद्धां त्यांची बरोबरी करितां येत नाहीं. कित्येक बॅरिस्टरांची प्राप्ति तीस हजारांपर्यंत असल्याचें आपण ऐकतों. मग कमिशनरचें काम बॅरिस्टर किंवा डॉक्टर, यांपेक्षां जास्त जबाबदारीचें आहे, तर त्यालाही तीन चार हजार रुपये पगार पाहिजे. नोकरांचे पगार ठरवितांना त्याच दर्जाचीं माणसें सतत दुसऱ्या धंद्यांत राहिलीं तर त्यांच्या प्राप्तीची मजल कोठपर्यंत जाईल या गोष्टीचा विचार करावयाचा असतो.

प्रत्येक खात्यामध्यें वर लिहिलेल्या तिन्ही प्रकारांचे सरकारी अधिकारी असतात. मुलकीखातें घेतलें तर मामलेदार कनिष्ठ, डेप्युटी कलेक्टर प्रांतिक व कलेक्टर इम्पीरियल. शाळाखातें घेतलें तर असिस्टंट डेप्युटी कनिष्ठ, डेप्युटी इन्स्पेक्टर प्रांतिक व एज्युकेशनल इन्स्पेक्टर इम्पीरियल. पोलीसखातें घेतलें तर सब् इन्स्पेक्टर कनिष्ठ, डेप्युटी सुपरिंटेंडन्ट प्रान्तिक व सुपरिंटेंडन्ट इम्पीरियल. कांहीं महत्त्वाचीं खातीं

सोडिलीं तर जिल्हाधिकाऱ्यांच्यावर बहुतेक अधिकारी इम्पीरियल नोकरीचे आहेत.

या सर्व नोकरांचे पगार टाइमस्केलमध्यें बसविले आहेत. १००—५—२०० असें टाइमस्केल असेल तर मनुष्य शंभर रुपयांवर लागून सालीना पांच याप्रमाणें त्याचा वीस वर्षांत दोनशें पगार होईल. ४०—५—८०. या स्केलमध्यें वर्षास वाढ न होतां ती दोन वर्षांनीं पांच याप्रमाणें होते. प्रत्येक नोकराचा पेन्शनफंड सरकार भरतें व पूर्ण म्हणजे तीस वर्षें नोकरी झाल्यावर पगाराच्या निम्में पेन्शन मिळतें. पेन्शनऐवजीं प्राव्हिडंट फंड भरून नोकरी सोडते वेळीं एकदम रक्कम मिळण्याची सोय होण्याचा यापुढें संभव आहे.

पाठ एकुणचाळिसावा.

मुंबई प्रान्तिक कायदेकौन्सिल.

मुलांनों, प्रत्येक प्रान्तावर एक मुख्य अधिकारी असतो. त्याला आपण गव्हर्नर म्हणतों. या गव्हर्नरच्या मदतीला कार्यकारी कौन्सिल आणि दिवाणमंडळ असतें पण तेवढ्यानें काम भागत नाहीं. या राज्यकारभार हांकणाऱ्या लोकांना रयतेचीं सुखदुःखें काय आहेत याची स्वतंत्रपणें माहिती व्हावी म्हणून, तसेंच त्यांच्या राज्यकारभारावर लोकमताची छाप पडावी म्हणून, त्यांच्या मदतीला एक कायदेकौन्सिल दिलेलें आहे. या कौन्सिलनें खर्चाचा अंदाजी खर्डा म्हणजे बजेट मंजूर करावयाचें असतें. प्रत्येक कायद्याला या कौन्सिलची संमति मिळवावी लागते. नवीन कर कौन्सिलच्या परवानगीखेरीज बसवितां येत नाहींत.

या कौन्सिलचे एकंदर सभासद १११ असतात. त्यांपैकीं २५ सभासद सरकार नेमितें व ८६ लोकांनीं निवडून दिलेले असतात.

लोकनियुक्तांपैकीं २७ मुसलमान समाजाचे सभासद असतात व बाकीच्यांपैकीं ११ सभासद मुंबई, कराची, अहमदाबाद, पुणें व सोलापूर या शहरांतील लोक निवडतात. नुसत्या मुंबई शहराचे ६ प्रतिनिधि असून पुणें व सोलापूर या शहरांतील प्रत्येकीं १।१ असतो. जिल्ह्यांमधून एकंदर ३५ लोक निवडून येतात. त्यांपैकीं महाराष्ट्रांत पूर्व खानदेश ३, सातारा ३, नगर २, नाशीक २, पुणें २, पश्चिम-खानदेश व सोलापूर प्रत्येकीं १, ठाणें २, रत्नागिरी २ व कुलाबा १ अशी प्रतिनिधींची वांटणी केलेली आहे.

विशिष्ट मतदारसंघाचे १३ सभासद असून त्यांची विभागणी पुढें लिहिल्याप्रमाणें केली आहे. मुंबई शहर १ व इतर ठिकाणच्या इलाख्यांतील युरोपियन लोकांचा १ मिळून २ युरोपियन सभासद; गुजराथ, डेक्कन व सिंध येथील जमीनदारांचा प्रत्येकीं १ प्रमाणें ३; मुंबई व अहमदाबाद येथील गिरण्यांचे मालक यांचे २; मुंबई युनि-व्हर्सिटीच्या सात वर्षांवरील पदवीधरांचा १; मुंबई चेंबर ऑफ कॉमर्सचे २; कराची चेंबर ऑफ कॉमर्स १; मुंबई येथील व्यापारी मंडळ १ व इंडियन मर्चंट चेंबर १.

सरकारी पंचवीस सभासदांपैकीं फक्त सोळा सरकारी अधिकारी असतात. निवडणुकीमध्यें एकाद्या वर्गाचा अगर जातीचा मनुष्य निवडून न आल्यास सरकार नेमणुकीनें तो दोष नाहींसा करितें. अस्पृश्यवर्गाचा एक मनुष्य सरकारकडून नेमण्यांत येतो. एकाद्या पक्षाचा निवडणुकीमध्यें पूर्ण पराभव झाला तर त्या पक्षांतीलसुद्धां कांहीं माणसें सरकारकडून नेमिलीं जातात.

साधारणपणें निवडणुकी व्यवस्थित व्हाव्या, एकाच धर्माच्या लोकांचें प्रस्थ अधिक माजून राहूं नये, म्हणून मुसलमान व मुसलमानेतर असे दोन मतदारसंघ सरकारनें केले आहेत. मध्यप्रान्तातून ३ मुंबई शहर दोन, पुणें व सोलापूर या दोन शहरां मिळून १ शिवाय

उत्तरभाग ३ व दक्षिण भाग ३, अहमदाबाद व सुरत शहर मिळून १, असे १३ व सिंधप्रांतांतून निवळ १४ मिळून एकंदर २७ मुसलमान सभासदांची निवडून येण्याची व्यवस्था केलेली आहे.

मुसलमानेतर मतदारसंघांतून निवडून आलेल्या उमेदवारांपैकीं पूर्वखानदेश, नाशीक, नगर, सातारा, पुणें, ठाणें, मुंबई व रत्नागिरी या जिल्ह्यांतून एक तरी विधेंत मागासलेल्या वर्गांपैकीं म्हणजे मराठ्यांपैकीं उमेदवार निवडलाच पाहिजे असा निर्बंध आहे. सोलापूर, कुलाबा व पश्चिमखानदेश यांपैकीं पाळीनें एक जागा मराठ्यांकडे जावयाची अशी व्यवस्था केली आहे. एकाद्या जिल्ह्यांत सात उमेदवार उभे आहेत असें समजा. आतां तेथें जागा जर तीनच असतील आणि निवडून आलेल्या पहिल्या तिहींत एकही मराठा नसेल तर त्यांपैकीं दोन सभासदांची निवडणूक कायम होते आणि तिसरी जागा मराठे उमेदवारांपैकीं सर्वांत जास्त मतें मिळविणारास मिळते. सोलापूरची जागा पहिल्या, कुलाब्याची दुसऱ्या व पश्चिम खानदेशची तिसऱ्या निवडणुकीला मराठ्याकडे जावयाची असें ठरलें आहे या बाबतींत मराठे म्हणजे मराठे माळी, कुणबी, न्हावी, तेली वगैरे असा अर्थ समजावा. अस्पृश्यांचा उमेदवार सरकार निराळ्या रीतीनें नेमतें हें वर सांगितलेंच आहे.

वर लिहिलेल्या सर्व मतदारसंघांमध्यें विश्वविद्यालयाच्या पदवीधरांचा मतदारसंघ फार महत्त्वाचा आहे. या संघाचा मतदार नुसता पदवीधर नसतो तर पदवी घेऊन कमींतकमी सात वर्षें तो मुरलेला असतो. पदवीधर लोक राजकारणाचा अभ्यास चांगला करितात. शहरामध्यें ते राहणारे असून जगामधील हालचालींची त्यांना चांगली माहिती असते. अशा लोकांनीं आपणाला निवडून द्यावें अशी अपेक्षा करणारा माणूस बऱ्याच लायकीचा असावा लागतो. शिवाय या संघाच्या निवडणुकीवरून देशांतील सुशिक्षित लोकांचा कल

कोणत्या दिशेकडे आहे हेंही अजमावितां येतें. पहिल्या निवडणुकींमध्यें या संघातर्फे डॉ० रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे प्रिन्सिपाल फर्ग्युसन कॉलेज पुणें हे निवडून आले होते. दुसऱ्या निवडणुकींत या संघानें मुंबईचे प्रख्यात बॅरिस्टर मुकुंदरावजी जयकर यांना बहुमतानें निवडलें.

पूर्वी कौन्सिलच्या सभासदांस नामदार ही बहुमानाची पदवी असे. आतां ती फक्त कार्यकारी कौन्सिलर, दिवाण, कौन्सिलाचे अध्यक्ष व स्टेट कौन्सिलचे सभासद यांसच लाविता येते. प्रान्तिक कौन्सिलच्या सभासदांस एम्. एल्. सी. असा किताब धारण करितां येतो. एम्.एल्. सी. म्हणजे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचा सभासद असें समजावें.

पाठ चाळिसावा.

उमेदवार व त्यांनीं पाळावयाचे नियम.

कौन्सिलनिवडणुकीकरितां उभा राहाणारा उमेदवार वयानें पंचवीसाच्या वर असला पाहिजे. मतदारांच्या यादींत त्याचें नांव असलें पाहिजे. (१) ब्रिटिश प्रजाजन नसलेले (२) स्त्रिया (३) दुसऱ्या एकाद्या कायदेमंडळाचे शपथविधि होऊन सभासद झालेले (४) सनद रद्द केलेले किंवा काढून घेतलेले वकील (५) कोर्टानें वेडे ठरविलेले (६) कर्जमुक्त न झालेला नादार (७) ज्यांनीं आपली नादारी दुर्दैवानें झाली असें कोर्टाकडून सर्टिफिकेट मिळविलें नाहीं असे दिवाळखोर, इतक्या लोकांना उमेदवार म्हणून उभें राहातां येत नाहीं. फौजदारी कोर्टांत गुन्हा शाबीत होऊन ज्यांस काळें पाणी किंवा सहा महिन्यांपेक्षां जास्त कैदेची शिक्षा झाली असेल, व त्या गुन्ह्याबद्दल माफी मिळाली नसेल तर त्यांना शिक्षा संपल्यापासून पांच वर्षेंपर्यंत निवडणुकीला उभें राहातां येत नाहीं. तसेंच इंडियन पिनल कोडाच्या ९ व्या कलमा-

प्रमाणें सहा महिन्यांपेक्षां जास्त शिक्षा झाली असेल तर पांच वर्षें-पर्यंत व निवडणुकीमध्यें लबाडी केल्याचें सिद्ध झालें तर तीन वर्षें पर्यंत उमेदवाराला निवडणुकीला उभें रहातां येत नाहीं. तसेंच उमेद-वारानें आपलें खर्चासंबंधाचें पत्रक योग्य अवधीमध्यें सादर केलें नाहीं किंवा तें अयोग्य ठरविण्यांत आलें तर उमेदवार व त्याचा एजंट यांस पुढें पांच वर्षें उमेदवार म्हणून निवडणुकीला उभें राहतां येत नाहीं. उमेदवार ज्या विभागातर्फे उभा असेल त्या विभागामध्यें अगर तो विभाग ज्या डिव्हिजनमध्यें असेल त्या डिव्हिजनमध्यें नॉमिनेशनच्या तारखेपूर्वी सहा महिने तो राहात असला पाहिजे.

प्रांतिक सरकार निवडणूक करण्याचें जाहीर केल्यावर चवदा दिवसां-चे आंत उमेदवारांच्या अर्जाकरितां दिवस नेमितें. यालाच नॉमिने-शनचा दिवस म्हणतात. या दिवशीं ठराविक मसुद्यावर सही करून रिटर्निंग ऑफिसरकडे अर्ज करावयाचा असतो त्यावर सूचना देणारा व अनुमोदन देणारा म्हणून दोन इसमांच्या सह्या लागतात. हे दोन्ही गृहस्थ उमेदवाराच्या विभागांत मतदार असले पाहिजेत. अर्जाबरोबर एजंट नेमले असल्यास स्वतांच्या सहीचा तसा दाखला द्यावा लागतो. आपला उभें राहाण्याचा बेत रहित करावयाचा असेल तर अर्जाच्या तपास-णीकरितां नेमलेल्या दिवसापर्यंत रिटर्निंग ऑफिसरला कळवावें लागतें.

प्रत्येक उमेदवारानें अर्जाबरोबर २५० रुपये अगर चालू भावानें तितक्याच किंमतीच्या सरकारी प्रॉमिसरी नोटा भराव्यात अगर भर-ण्याची व्यवस्था करावी. नोंदलेल्या मतांच्या आठव्या अंशापेक्षां कमी मतें पडल्यास ही रक्कम जप्त होते. तसेंच शपथविधि झाला नाहीं तरीही डिपाझिट रक्कम जप्त होते. एरव्हीं म्हणजे निवडणुकीचा बेत रहित केल्यास किंवा ठराविक संख्येपेक्षां जास्त मतें मिळूनही निवडून न आल्यास किंवा निवडून येऊन शपथविधि करून कामाला सुरवात केल्यास ही रक्कम उमेदवाराला परत मिळते.

जितक्या जागा तितकेच उमेदवार असतील तर निवडणूक न करितां ते सर्व निवडून आल्याचें जाहीर केलें जातें. पुष्कळ उमेदवार असून मराठा एकच असेल तर राखीव जागेकरितां तो निवडून आल्याचें जाहीर केलें जातें. बाकीच्या उमेदवारांची रीतसर निवडणूक होते. मराठे उमेदवारही एकापेक्षां जास्त असतील तर त्यांची सुद्धां रीतसर निवडणूक होईल. मतें बॅलट पद्धतीनें म्हणजे कोणाला मत दिलें हें दुसऱ्याला कळणार नाहीं अशा रीतीनें घेतलीं जातात. जितके प्रतिनिधि तितकीं मतें देण्याचा अधिकार मतदाराला असतो. हीं मतें अनेकांमध्यें वांटावयाचीं किंवा तीं एकाच उमेदवाराला द्यावयाचीं ही गोष्ट मतदाराच्या मर्जीची आहे. रिटर्निंग ऑफिसर मतें मोजील तेव्हां उमेदवार अगर त्याचा गुमास्ता यास हजर राहाण्याचा अधिकार आहे. दोघां उमेदवारांस सारखींच मतें पडलीं तर चिठ्या टाकून ज्याचें नांव येईल त्याला एकमत जास्त देण्याचा अधिकार रिटर्निंग ऑफिसरला असतो.

एजंट बदलावयाचा असेल तर तसें रिटर्निंग ऑफिसरकडे लेखी कळवावें. निवडणुकीचा निकाल झाल्यानंतर ३५ दिवसांच्या आंत आपल्या एजंटाच्या सहीनें मसुद्याबरहुकूम निवडणुकीच्या खर्चाचें पत्रक रिटर्निंग ऑफिसरकडे पाठवावें. हें पत्रक कोणासही एक रुपाया फी देऊन पाहावयास मिळतें. खर्चाचें पत्रक करितांना जमेकडे स्वतः केलेले खर्च अगर दुसरा कोणी इसम, क्लब, समाज अगर मंडळ यांच्याकरितां मिळालेल्या कोणत्याही स्वरूपांतील रकमा तपशीलवार मांडाव्या लागतात. खर्चाकडे (१) उमेदवारास लागलेला प्रवास खर्च; (२) एजंट कारकून व शिपाई यांचीं नांवें व पगार; (३) त्यांना लागलेला प्रवासखर्च; (४) बिन बिगारी इसमांनीं केलेला प्रवासखर्च असा लिहावा. पांच रुपायांवरील खर्चाबद्दल पावती जोडावी लागते. खर्चाचें पत्रक खोटें ठरल्यास उमेदवारास पुढें पांच वर्षेपर्यंत निवडणुकीस उभें राहतां येत नाहीं हें वर सांगितलेंच आहे.

पाठ एकेचाळिसावा.

मतदारांविषयीं माहिती.

मुसलमान व मुसलमानेतर असे दोन मतदारसंघ केलेले आहेत. एका संघांतील मतदाराला दुसऱ्या संघांतील उमेदवाराला मत देतां येत नाहीं. शहरामध्यें मतदारांची लायकी राहाण्याच्या घरावरून ठरविली जाते. मुंबईस दरमहा दहा रुपये भाडें देणारा, कराचीमध्यें पांच व इतर शहरांमध्यें तीन रुपये भाडें देणारा मतदार होऊं शकतो. स्वतःच्या मालकीचें घर असलें तर तें मुंबईस सहा हजार, कराचीस तीन हजार व इतर शहरांमध्यें दीड हजार रुपये किंमतीचें असलें पाहिजे. इन्कम टॅक्स देणारे, लष्करमधील माजी अगर सध्यांचे अधिकारी, तसेच जमीनदार इत्यादि लोकांना मतें देण्याचा अधिकार आहे.

शहरें सोडून इतर ठिकाणीं रत्नागिरी, पंचमहाल व अपरसिंध फ्रांटियर या जिल्ह्यांत सालीना १६ रुपये व इतर जिल्ह्यांतून ३२ रुपये किंवा जास्त सारा देणारे लोक, इन्कम टॅक्स देणारे लोक, लष्करी पेन्शनर अगर अधिकारी, रत्नागिरी व पंचमहाल जिल्ह्यांत महिना दोन रुपये भाडें देणारे, इतर जिल्ह्यांतून महिना तीन रुपये भाडें देणारे किंवा रत्नागिरी व पंचमहाल जिल्ह्यांत एक हजार रुपये किंमतीच्या घरांत राहाणारे लोक मतदार होऊं शकतात.

सरदार व इनामदार या मतदारसंघामध्यें ज्यांचें नांव सरदारांच्या यादींत असेल अशा सरदारांचा किंवा जे एका सबंध गांवाचा वसूल करूं शकतात अशा इनामदारांचा समावेश होतो.

विश्वविद्यालयसंघामध्यें ज्यांना एक एप्रिलच्या अगोदर पदवी घेऊन सात वर्षें झालीं आहेत, किंवा सिनेटचे सभासद व सदस्य असतील त्यांचा अंतर्भाव होतो.

निवडणुकीच्या अगोदर तीन महिने तरी कच्च्या याद्या तयार होतात. त्यांमध्यें आपलें नांव वगळलें असेल तर जवळच्या मॅजिस्ट्रेटाकडे तक्रार-अर्ज करून आपली दाद लावून घ्यावी. पुढें एक महिन्यानें पक्क्या याद्या सर्व गांवांत, म्युनिसिपल शहरांचे सर्व वार्डांत व सर्व जिल्ह्यांचे मुख्य वार्डांचे ठिकाणीं प्रसिद्ध करण्यांत येतात. कौन्सिल व असेंब्ली ह्या दोन्ही मतदारांच्या वेगवेगळ्या याद्या प्रत्येक क्षेत्रांत प्रसिद्ध करण्यांत येतात. त्या पाहून किती मतदारसंघांत मत देण्याचा आपणाला अधिकार आहे हें समजेल. यादींत आपल्या नांवापाठीमागें अनुक्रम नंबर असतो तो टिपून ठेवावा.

मतें देण्याच्या जागा सोयीस्कर अशा ठरवितात. व कोणत्या मतदारांनीं कोणते ठिकाणीं मत द्यावें याची माहिती प्रसिद्ध करण्यांत येते. जी जागा ठरली असेल त्याच ठिकाणीं मतदारानें जाऊन मत दिलें पाहिजे. इतर ठिकाणीं तें देऊन चालावयाचें नाहीं. प्रत्येक तालुक्यांत पांच सहा जागा ठरविण्यांत येतात व कोणत्या भागांतील मतदारांनीं कोणत्या जागीं जावयाचें हें जाहीर करण्यांत येतें. मत देण्याचे ठिकाणाला पोलिंग स्टेशन म्हणतात. प्रत्येक पोलिंग स्टेशनवर एक मुख्य अधिकारी असतो त्यास प्रिसायडिंग ऑफिसर व त्याचे मदतीला मतांची नोंद करणारे आणखी अधिकारी असतात. त्यांस पोलिंग ऑफिसर म्हणतात.

मतदारांनीं मत देण्याच्या ठिकाणीं लवकर जावें. सकाळीं ८ ते १२ व दुपारीं १ ते ६ ही मतें नोंदण्याची साधारण वेळ असते. बरोबर ६ वाजतां जेवढे लोक आंत असतील तेवढ्यांनाच मत देतां येतें. मत देणें हा आपला हक्क आहे. तो कोणींही गमावूं नये. कोणाला मत द्यावयाचें यासंबंधीं आपला निश्चय सहसा दुसऱ्याला कळूं देऊं नये. प्रत्येक उमेदवाराला कांहींतरी खूण दिलेली असते. जितक्या जागा तितकीं मतें द्यावयाचीं असतात. पोलिंग स्टेशनचा अधिकारी आपणाला एक मतपत्रिका देतो. तीवर सर्व उमेदवारांचीं नांवें छापिले-

लीं असतात. प्रत्येक नांवापुढें उमेदवाराला दिलेल्या खुणा काढलेल्या असतात. खुणेपुढें अगर मागें कोरी जागा ठेविलेली असते. ह्या कोऱ्या जागेंत ज्याला आपणाला मत द्यावयाचें असेल त्याचे नांवासमोर मतदारानें फुली करावी. जितकीं मतें तितक्या फुल्या कराव्या.मतांची वांटणी मतदाराला आपल्या मर्जीप्रमाणें करितां येते. समजा, पुणें जिल्ह्यातर्फे तीन उमेदवार उभे आहेत. दोन निवडून यावयाचे आहेत. तर मतदाराला दोन मतें देण्याचा अधिकार असतो. वाटल्यास त्यानें एकाच उमेदवारास तीं दोन्हीं मतें द्यावीं किंवा एकाला एक व दुसऱ्याला एक अशी त्यांची वांटणी करावी. वाजवीपेक्षां जास्त फुल्या पडल्या किंवा राखून ठेविलेल्या जागीं त्या न करितां इतर ठिकाणीं केल्या तर ती मतपत्रिका रद्द मानण्यांत येते. मतपत्रिकेची घडी करून ती पेटींत टाकावी व लगेच बाहेर यावें. आपली मतपत्रिका खराब झाली तर ती बदलून घ्यावी. जेथें एकच जागा असेल तेथें मतदारास एकच मत असेल व कितीही उमेदवार असले तरी त्यास एकच फुली करितां येईल. मतदारास वाटेल तो खुलासा पोलिंगस्टेशनवरील अधिकारी यांजकडून मिळूं शकेल. मतपत्रिकेचा नमुना खालीं दिला आहे.

नंबर	नांव	मतें	खूण	नंबर
१	हेमंत सुंदर	×		१
२	श्यामलाल गिरिधर	×		२
३	पुरुषोत्तमराव नेमाडे			३

पाठ बेचाळिसावा.

महाराष्ट्रांतील पक्षभेद.

राजकारण व पक्षभेद यांचा संबंध अगदीं निकट असतो. अलीकडील लोकसत्ताक राज्यपद्धतीमध्यें तर पक्षभेदांना ऊत आलेला आहे. निरनिराळ्या पक्षांच्या लोकांकडून आपला पक्ष पुढें आणण्याकरितां कसून प्रयत्न होतो आणि यामुळें देशाचें पाऊल पुढें पडण्याचा संभवही बराच असतो. परंतु पक्षभेदामुळें भलतींच भांडणें सुरू होऊन कधीं कधीं देशाचें नुकसानही होतें आणि पुष्कळ लोक मनांत म्हणतही असतील कीं, जर पक्षभेदांखेरीज जग चालेल तर किती चांगलें होईल !

हल्लीं असा एकही देश नाहीं कीं त्यामध्यें दोन किंवा जास्त राजकीय पक्ष नाहींत. इंग्लंडकडे प्रातिनिधिक संस्था चालवून दाखविण्याचें पुढारीपण आलें आहे; पण तेथें सुद्धां पक्षभेद आहेतच. पक्षभेद मनुष्यस्वभावाला धरून असल्यामुळें त्यासंबंधीं नाक मुरडून तरी काय उपयोग ! प्रचलित पक्षभेदांतूनच शक्य तितका देशाचा फायदा करून घेण्याच्या मार्गाला आपण लागावें, हें बरें.

आपल्या महाराष्ट्रामध्यें आज तीन पक्ष आहेत. एक उदारपक्ष, दुसरा राष्ट्रीयपक्ष व तिसरा मागासलेल्या वर्गांचा पक्ष. हे तिन्ही पक्ष इंग्रजी अमलामध्येंच एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सुरू झाले. वेळोवेळीं या पक्षांना निरनिराळीं नांवें मिळालीं आहेत. परंतु स्वभावधर्मामुळेंच पक्ष बनत असल्यामुळें थोडाबहुत फेरबदल होऊनही त्यांची मूळ मांडणी कायम आहे.

उदारपक्षाची स्थापना कै० न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांनीं

केली. काँग्रेसच्या स्थापनेपासून म्हणजे इ० स० १८८५ पासून इ० स० १९१५ पर्यंत हा पक्ष प्रबल होता. रानडे यांची कामगिरी पाहिली म्हणजे या पक्षाची कल्पना होते. 'देशाची सुधारणा सर्व अंगांनीं झाली पाहिजे असें त्यांचें मत होतें. प्रार्थनासमाज, विधवाविवाह, धर्मसहिष्णुता वगैरे गोष्टींवर त्यांनीं भर दिला. सरकारी

गुरुवर्य डॉ० र. पु. परांजप्ये.

नोकरींत राहूनही महाराष्ट्राला राजकीय व सामाजिक कार्यकर्तेपणाचा धडा त्यांनींच घालून दिला. वक्तृत्वसमारंभ, वसंतव्याख्यानमाला, औद्योगिक परिषद्, प्रदर्शन, फीमेल हायस्कूल, प्रार्थनासमाज, वाचनालय, सार्वजनिक संस्था, थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे पुण्यांतील प्रत्येक सार्वजनिक संस्थेंत ते भाग घेत असत रानडे यांची परंपरा गेल्या पिढींत कै० रा० रा० गोपाळ कृष्ण गोखले यांनीं चालवून तिला योग्य वळण लाविलें. यांच्या हयातींत रानडे यांच्या पक्षाला नेमस्त म्हणून नांव मिळालें होतें. हल्लीं या पक्षाचें नांव बदललें आहे.

आतां लोकांना हा उदारपक्ष म्हणून माहीत आहे. याचें पुंढारीपण आपल्या प्रांतांत तरी डॉ० रघुनाथ पुरुषोत्तम परांजप्ये यांजकडे आहे.

श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर, एम्. एल्. ए.

दुसरा पक्ष रानडे यांच्या हयातींतच पुढें आला. याला राष्ट्रीय पक्ष असें नांव मिळालें. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्याकडे हा पक्ष निर्माण करण्याचा मान येतो. शास्त्रीबुवांनीं न्यू इंग्लिशस्कूल, किताबखाना, चित्रशाळा, केसरी व मराठा हीं वर्तमानपत्रें वगैरे संस्था काढिल्या. आपल्या निबंधमालेंत लिहिलेल्या लेखांमुळें ते फार प्रसिद्धीस आले. आपला धर्म, आपली संस्कृति, आपली भाषा, आपले पूर्वज इत्यादिकांविषयीं योग्य आदर उत्पन्न होईल असें वाङ्मय त्यांनीं निर्माण केलें. महाराष्ट्रीयांच्या मनांत देशाभिमानाची व आत्म-विश्वासाची जागृति त्यांनीं करून दिली. शास्त्रीबुवांच्या पाठीमागून कै० रा० रा० बाळ गंगाधर टिळक यांनीं या पक्षाला राजकीय आखाड्यांत ओढून आणिलें. देशी भाषे-मधून जोरदार लेख प्रसिद्ध करून लोकांची राजकीय सुधारणांविषयीं भूक त्यांनीं वाढविली. त्यांच्या पाठीमागें या पक्षाचें पुढारीपण महा-राष्ट्रांतील प्रसिद्ध लेखक रा० रा० नरसिंह चिंतामण केळकर यांज-कडे आलें आहे.

ना० रा. ब. भास्करराव जाधव, एम्. एल्. सी.

तिसरा पक्ष मागास-लेल्या वर्गांचा होय.

याचे संस्थापक कै० रा०रा० जोतीराव फुले यांनीं इ. स. १८७३ सालीं सत्यशोधक समाजाची स्थापना केली. '—भिक्षुकवर्गाचें धार्मिक प्राबल्य कमी करावें असा या समाजाचा मुख्य हेतु होता. सामाजिक सुधारणा कराव्या, मद्यपानासारख्या व्यसनांपासून निवृत्त व्हावें वगैरे गोष्टींचाही ते उपदेश करीत. मी कोणत्याही जातीच्या घरीं अन्नग्रहण करीन असें ते म्हणत. या मतांचा फैलाव करण्याकरितांच 'दीनमित्र' वर्तमानपत्र काढण्यांत आलें होतें. त्यांनीं गुलामगिरी, आसूड, सत्सागर, इषारा, सार्वजनिक सत्यधर्म वगैरे पुस्तकें मागासलेल्या लोकांच्या हिताकरितां लिहिलीं. जोतिरावांच्या पाठीमागून त्यांच्या मतांचा पुरस्कार कै० छत्रपति शाहूमहाराज यांनीं केला. हल्लींचे शिक्षणमंत्री ना० भास्कर विठोजी जाधव हे या पक्षाचे एक प्रमुख गृहस्थ आहेत.

पाठ त्रेचाळिसावा.

महाराष्ट्रापुढील कार्य.

मागील पाठांत महाराष्ट्रांतील निरनिराळे तीन पक्ष कसे उत्पन्न झाले हें सांगितलें. हे सर्व पक्ष देशसेवा करण्याच्या लालसेनेंच निर्माण झाले असून प्रत्येकानें लोकशिक्षण हेंच साधन घेऊन कार्यक्रम आंखला आहे. म्हणून आपण सर्व पक्षांबद्दल आदर बाळगिला पाहिजे. एकाद्या पक्षाच्या देशभक्तीबद्दल संशय अगर तिरस्कार व्यक्त करणें निंद्य आहे. काळाच्या पोटांत काय आहे कोणीं सांगावें ? प्रत्येकाला आपला धर्म आचरून जसा मोक्ष मिळतो तसेंच प्रत्येक पक्षाच्या कार्यक्रमानें देशसुधारणा होणार नाहीं कशावरून ? मुसलमान आपलें धर्माचरण करीत असतां जसें हिंदूनें हंसूं नये त्याचप्रमाणें उदारपक्षीय

देशसेवक आपला मार्ग चोखाळीत असतांना राष्ट्रीयानें त्याचा उपहास करूं नये.

निवडणुकीच्या वेळेला उमेदवार किंवा त्याचे मुनीम मत मागण्याकरितां येतात त्यावेळीं तो उमेदवार कोणत्या पक्षाचा आहे हें न पाहातां त्याचा कार्यक्रम पाहावा. आपणाला ज्या गोष्टी पाहिजेत त्या सर्व त्याच्या कार्यक्रमामध्यें आहेत किंवा नाहींत हें पाहून तो कार्यक्रम पार पाडण्याकरितां लागणारी विद्वत्ता, मनोधैर्य, काम करण्याची हौस, देशाविषयीं तळमळ वगैरे गोष्टी त्याजपाशीं असतील तरच त्यास मत देण्याचें ठरवावें. कार्यक्रम पसंत करतांना पुढील गोष्टींचा अवश्य विचार करावा.

(१) स्वराज्याकरितां लोकांची लायकी वाढविणें व सरकारला ती पटविणें; (२) सक्तीच्या शिक्षणाचा प्रसार करणें; (३) दुय्यम शिक्षणामध्यें औद्योगिक शिक्षणाची तरतूद करणें; (४) उच्च शिक्षणामध्यें शोधकबुद्धीच्या विकासाला अवसर सांपडेल अशी व्यवस्था करणें (५) पुरुष आणि स्त्री यांमधील बौद्धिक अंतर कमी करणें; (६) निरनिराळ्या धर्मांच्या लोकांची एकी करणें; (७) परधर्मीय लोकांविषयीं सहानुभूति बाळगणें; (८) हिंदुस्तानामध्यें वार्षिक उत्पन्नाची सरासरी काढून पाहतां ती फक्त दर माणसीं साठ रुपये आहे, म्हणून राज्यकारभारामध्यें शक्य तर काटकसर करणें (९) शेतकऱ्यांच्या पतपेढ्या गांवोगांव काढून त्यांमधून विहिरी बांधण्याकरितां कमी व्याजानें पैसा मिळविण्याची सोय करणें; (१०) शेतकऱ्यांना प्रसंगीं दुसरा धंदा करितां यावा म्हणून जागजागीं कोणत्या तरी एका धंद्याचे वर्ग काढणें; (११) कज्जेबाजीचें व्यसन कमी होईल अशी खटपट करणें; (१२) दारू, गांजा व अफू यांचा खप शक्य तितका कमी करणें; (१३) आरोग्यविषयक काळजी घेण्याकरितां प्रत्येक तालुक्याला अधिकारी ठेवणें; (१४) तालुक्यांतून मोठ्या गांवीं दवाखाने ठेवणें;

(१५) स्थानिक अडचणी लोकलबोर्डाकडून व सरकारी अधिकाऱ्यांकडून दूर करून घेणें; (१६) स्थानिक संस्था आपलें काम बरोबर करीत नसतील तर ती गोष्ट सरकारच्या नजरेस आणणें; (१७) शहरांमधून राहाणाऱ्या लोकांना शुद्ध दूध व स्वच्छ पाणी यांचा पुरवठा करणें; (१८) मजूर लोकांच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करणें; (१९) भांडवलवाले लोक आपलें भांडवल आनंदानें बाहेर काढतील अशी परिस्थिति राखणें; (२०) सट्टेबाजीला आळा घालणें; (२१) आगगाड्या व आगबोटी यांचे दर बेताचे ठेवणें; (२२) शरीरपोषक द्रव्यांवर शक्य तितका कमी कर बसविणें; (२३) अप्रत्यक्ष कर शक्य तितका कमी वाढविणें; (२४) अस्पृश्यता नाहींशी करणें; व अस्पृश्य लोकांना नागरिकत्वाचे सर्व हक्क उपभोगूं देणें; या व अशाच आणखी कित्येक गोष्टी पाहून मग कार्यक्रम पसंत करावा.

मतदार ज्या लोकांना मतें देतो ते लोक कौन्सिलांत जातात. त्यांच्याच बहुमतानें कायदे होतात. गरीब बिचारे दिवाण त्या कायद्यांची फक्त अंमलबजावणी करितात. अंमलबजावणी करणाऱ्यापेक्षां कायदेमंडळाचें महत्त्व जास्त आणि कायदेमंडळापेक्षां त्याच्या सभासदांना निवडून देणारे जे मतदार त्यांचें महत्त्व जास्त. म्हणजे हल्लींच्या लोकसत्ताक काळांत राजाचे अधिकार मतदारांस लाभले आहेत; मतदारच राजा झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पाठ चव्वेचाळिसावा.

स्थानिकस्वराज्य व ग्रामपंचायती.

गांवांतील बारीकसारीक कामें स्वतःच्या देखरेखीखालीं करविण्यापेक्षां प्रान्तिक सरकार तीं स्थानिक लोकांकडून करवून घेतें.

लोकांना राज्यकारभाराचें प्रत्यक्ष शिक्षण देण्याच्या उद्देशानेंच सरकारनें स्थानिक स्वराज्याची सुरवात इ. स. १८४२ सालीं केली; तरी इ. स. १८५० पासून खऱ्या कामाला सुरवात झाली. इ. स. १८८२ मध्यें लॉर्ड रिपन यांनीं तर स्वराज्याचा पाया म्हणूनच स्थानिक स्वराज्याचा ठराव केला आणि त्यांत अधिकाऱ्यांनीं शक्य तितकी स्थानिक लोकांना आपला कारभार चालविण्यास शिकण्याची संधि द्यावी असें ठरविलें.

स्थानिक स्वराज्याचें कार्यक्षेत्र प्रान्तिक सरकारापेक्षां आकुंचित आहे. याची व्याप्ति जिल्ह्यापेक्षां जास्त नसते. ग्रामपंचायती, म्युन्सिपालिट्या, तालुका लोकलबोर्डें व जिल्हा लोकलबोर्डें या मुख्य स्थानिक संस्था आहेत. शेजाधर्म राखणें हें स्थानिक संस्थांचें मुख्य काम आहे. कोणाकडून त्याच्या शेजाऱ्याला उपसर्ग होत असेल व कोणी आपल्या किंवा शेजाऱ्याच्या घराजवळ घाण करील तर त्याचा बंदोबस्त करणें, तसेंच लोकांना चांगलें अन्न, शुद्ध पाणी व स्वच्छ दूध मिळवून देण्याची व्यवस्था करणें आणि रस्ते दुरुस्त करून त्यांवर दिवे लावणें हीं स्थानिक संस्थांचीं मुख्य कामें आहेत.

स्थानिक स्वराज्याची कल्पना आपणाला नवीन असली तरी पूर्वी आपल्याकडे ग्रामसंस्था असत. त्या याच तत्त्वांवर चालत. खेडेगांव हें एक लहानसें राज्यच मानलें जाई. कोणी राजा असेल त्याला वसुलाचा कांहींसा भाग दिला कीं, बाकी सर्व व्यवस्था लोकच पाहात असत. हीं सर्व कामें बारा बलुत्यांकडून करून घेतलीं जात. प्रत्येक गांवांत सुतार, सोनार, चांभार, तेली वगैरे लोक असत. यांनीं पडेल तें काम करावें आणि मळणीच्या वेळेला खळ्यावर हजर राहावें. शेतकरी यांपैकीं प्रत्येकाला शिरस्त्याप्रमाणें थोडें तरी धान्य देई. ज्योतिषी, उपाध्या, न्हावी, महार व रामोशी हे बारा बलुत्यांपैकींच गणले जात. गांवचा राजा पाटील. बलुते हे सर्व त्याच्या हाताखालचे नोकर. यांच्या

मदतीनें गांवांतील सर्व व्यवस्था पाटील लावीत असे. पाटील इतर लोकांची मदत घेत असे. यांनाच पंच म्हणतां येईल. एकादा तंटा असला तर पंच पसंत करण्याचें काम स्वतः वादी, प्रतिवादी अगर फिर्यादी आणि आरोपी हे करीत. कोठें पांच कोसांच्या टापूंतील गांवांची पंचायत असे. पंचक्रोशी हा शब्द अद्यापि प्रचारांत आहे.

हल्लीं कांहीं निवडक गांवीं सरकारनें ग्रामपंचायती सुरू केल्या आहेत. पंचांची निवड सर्व लोक करितात. पाटील पंचायतीचा अध्यक्ष असतो. आरोग्य, दिवाबत्ती, रस्ते, शाळेवर देखरेख वगैरे कामें ग्रामपंचायतीनें करावयाचीं असतात. या कामाकरितां लागणारा खर्च भागविण्याकरितां कर बसविण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला आहे. ग्रामपंचायतींवर देखरेख करण्याचें काम जिल्हाबोर्डाकडे सोपविलें आहे.

मतदारांना प्रातिनिधिक संस्थांचें शिक्षण चांगल्या प्रकारें मिळण्यास ग्रामपंचायत ही एक उत्तम संस्था आहे. आपण निवडून दिलेला प्रतिनिधि कसें काम करितो तें मतदाराला डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहतां येतें. आपण मत देतांना भाळले गेलों असलों तर त्यापासून कसे दुष्परिणाम होतात, बरोबर विचार न करितां दिलेल्या मताचा कसा दुरुपयोग होतो, या सर्व गोष्टी त्याच्या प्रत्ययास येतात आणि या अनुभवानें शहाणपण शिकून मत देणें ही एक जबाबदारीची गोष्ट आहे असें समजून तो मत देऊं लागतो. म्हणून प्रत्येक सुशिक्षित गृहस्थानें ग्रामपंचायतीचा फैलाव करण्याचा शक्य तितका प्रयत्न करावा. कारण तेणेंकरून स्वराज्यासंबंधीं आपली लायकी वाढणार आहे.

पाठ पंचेचाळिसावा.

म्युन्सिपालिट्या.

स्थानिक स्वराज्याचे म्युन्सिपालिट्या व लोकलबोर्डें असे दोन भाग आहेत. शहरांमधील स्थानिक संस्थांना म्युन्सिपालिट्या म्हणतात. शहरांव्यतिरिक्त भागाच्या गरजा भागविणाऱ्यांना लोकलबोर्डें म्हणतात. पांच हजारांपेक्षां जास्त लोकवस्तीच्या शहराला साधारणपणें म्युन्सिपालिटी असते. यापेक्षां लहान शहरें असतील तर सॅनिटरी बोर्ड अगर ग्रामपंचायत स्थापून तेथील आरोग्यविषयक काळजी घेतली जाते.

स्थानिक संस्थांमध्यें सर्वांत जुनी व नांवरूपास आलेली संस्था मुंबई म्युन्सिपालिटी होय. हिलाच मुंबई कॉर्पोरेशन असें दुसरें नांव आहे. या संस्थेचे सभासद १०६ आहेत. यांपैकीं ७६ सभासद मतदारांनीं निवडलेले असतात. दहारुपये भाडें देणारा इसम मुंबईंत मतदार होऊं शकतो. राहिलेल्यांपैकीं कांहीं सरकार नेमितें व कांहीं जे. पी. लोकांनीं निवडलेले असतात. मुंबईंत वजनदार लोकांकडे शहरांतील शांतता राखण्याचें काम सोंपविण्याच्या उद्देशानें एक मानाची पदवी केली आहे. तिलाच जस्टिस ऑफ धी पीस अगर जे. पी. म्हणतात. पदवी दिलेल्या लोकांची यादी सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध होत असते.

म्युन्सिपालिटीचा अध्यक्ष सभासदांनींच निवडून दिलेला असतो. कार्यवाहकाचें काम करणारा मात्र वरच्या दर्जाचा सरकारी नोकर असतो. याला कमिशनर म्हणतात. सभासदांबरोबर याचा बेबनाव झाल्यास याची बदली मागण्याचा अधिकार कॉर्पोरेशनला आहे. इतर नोकर कमिशनरनें कॉर्पोरेशनच्या पसंतीनें नेमिलेले असतात.

मुंबई कॉर्पोरेशनची सांपत्तिक स्थिति चांगली आहे. सालीना दोन

कोटी रुपयांचें तिचें उत्पन्न आहे. नोकरलोकांचे पगारही चांगले असून त्यांचा दर्जा व स्थैर्य सरकारी खात्यांतील नोकरांच्याप्रमाणें चांगलें आहे. नोकर टिकून राहिले म्हणजे अनुभवानें त्यांची लायकी वाढते. आणि कामाची व्यवस्थाही चांगली राहाते. कोणतीही संस्था नीट चालण्याकरितां तन व मन अर्पण करणारा नोकरवर्ग लागत असतो.

इतर ठिकाणच्या म्युनिसिपालिट्यांची घटना निराळ्या कायद्यानें केली आहे. लोकवस्तीच्या मानानें सभासदांची संख्या सरकार ठरवितें. साधारण सर्व जातींचे प्रतिनिधि निवडले जातील असे वॉर्ड केलेले असतात. प्रत्येक वॉर्डाला लोकसंख्येच्या मानानें उमेदवार ठरविलेले असतात. जितके उमेदवार तितकीं मतें असतात. कोणत्याही म्युन्सिपालिटीचा कर भरणारा अगर दरमहा तीन रुपये भाडें देणारा इसम मतदार होऊं शकतो. मतदारांमध्यें पुरुष व स्त्री हा भेदभाव केलेला नाहीं. मतदाराला आपलीं मतें एकाच उमेदवाराला देण्याची अगर पाहिजे तशी वांटणी करण्याचा अधिकार आहे.

म्युन्सिपालिट्यांना आपले अधिकारी नेमण्याचा अधिकार आहे. चीफ ऑफिसर, इंजिनियर, शाळांचे सुपरिंटेन्डन्ट वगैरे अधिकारी असतात. लहान म्युन्सिपालिटी एक सेक्रेटरी नेमिते आणि त्याच्याकडून सर्व कामें करून घेते. सभासदांमधील लोकांच्या शाळा, आरोग्य व सर्वसाधारण व्यवस्थेच्याकरितां कमिट्या नेमिलेल्या असतात. सर्व सभासदांपैकीं एक चतुर्थांश सरकार नेमिते. अध्यक्ष व चेअरमन हे सभासदांनींच निवडलेले असतात.

(१) रस्त्यांची व म्युनिसिपल इमारतींची डागडुजी करणें; (२) औषधोपचार, देवी टोंचणें, पाणी-पुरवठा वगैरे कामें करणें; (३) सांथीचा प्रतिबंध करणें, (४) प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करणें हीं प्रायः म्युन्सिपालिट्यांचीं कामें होत. तीं करण्याकरितां घरपट्टी, वाहनांवर कर, म्युनिसिपल हद्दींत येणाऱ्या मालावर जकात, भंगीपट्टी,

पाणीपट्टी वगैरे कर ठेवण्याचा अधिकार म्युन्सिपालिट्यांस दिलेला आहे. म्युन्सिपालिटयांवर कलेक्टर व कमिशनर यांची देखरेख असते. ते सहानुभूतिपूर्वक सल्ला देतात. कामाची फार अव्यवस्था झालेली आढळल्यास म्युन्सिपालिटी रद्द करण्याचा अधिकार कमिशनर यास आहे.

मुंबई शहरांत बंदराची व्यवस्था पाहाण्याकरितां सरकारी व निम-सरकारी लोकांचें एक मंडळ आहे त्याला पोर्ट-ट्रस्ट म्हणतात.

पाठ सेहेचाळिसावा.

लोकलबोर्ड.

शहरांमधील व्यवस्था ठेवण्याचें काम म्युनिसिपालिटीकडे असतें तसेंच खेडेगांवांकरितां प्रत्येक तालुक्याचें तालुकाबोर्ड व जिल्ह्याचें जिल्हा-बोर्ड अशा स्थानिक संस्था आहेत. यांनाच लोकलबोर्डें म्हणतात. तालुकाबोर्डाला कांहीं पैसा व कामें जिल्हाबोर्ड तोडून देतें. म्हणजे जिल्हाबोर्ड हीच मुख्य स्थानिक संस्था होय. एकाद्या ठिकाणीं तालुका-बोर्ड नसलें तरी चालण्यासारखें असेल तर तें बंद करण्याचा अधिकार जिल्हाबोर्डाला आहे.

जिल्हाबोर्डाचीं मुख्य कामें पुढें दिलीं आहेत. रस्ते, दवाखाने, मार्केट, धर्मशाळा, तळीं, विहिरी व इतर सार्वजनिक सोयीच्या विहिरी बांधणें व चालविणें, शाळागृहांची सोय करणें, प्राथमिक शाळा चालविणें, देवी काढणें, झाडें लावणें, नमुनेदार शेतें राखणें, शेत-कऱ्यास बीं पुरविणें, जनावरांची चांगली आवलाद निर्माण करणें, दुष्काळीं कामें काढणें, लाईट रेलवे बांधणें, प्रदर्शन भरविणें हीं कामें करून शिवाय जिल्हाबोर्डाचा अध्यक्ष कोणाच्याही घरांत दिवसां शिरून घाण वगैरे दिसल्यास घराच्या मालकाला पंचवीस रुपये दंड करूं शकतो.

बोर्डाच्या उत्पन्नाच्या बाबी पुढें दिल्या आहेत. लोकलफंड, बोर्डाच्या इमारतीचें भाडें, दस्तुरी, कोंडवाडा, वाळूखडी, खाण, खासगी देणग्या, मासे धरणें व सरकारी मदत. एकंदर उत्पन्नापैकीं एकतृतीयांश शिक्षणाकडे खर्च झाला पाहिजे अशी सक्ति आहे. कमिशनरच्या परवानगीनें कर वाढविण्याचा अधिकार बोर्डाला आहे. तालुकाबोर्डाचें अंदाजपत्रक जिल्हाबोर्डानें पसंत करावें व जिल्हाबोर्डाचें अंदाजपत्रक त्यानें स्वतः मंजूर करावें असें ठरलें आहे. पांच हजार रुपये तरी जिल्हाबोर्डाचा व दोनशे तरी ता. बो. चा शिलकी फंड असला पाहिजे.

जिल्हाबोर्डाचे व तालुकाबोर्डाचे मुसलमान व मुसलमानेतर असे दोन मतदारसंघ असतील. मुसलमानांचे जिल्ह्यावर व इतरांचे तालुकावार गट केले आहेत. ३२ रुपये सारा देणारा जिल्हाबोर्डाचा व ८ रुपये सारा देणारा तालुकाबोर्डाचा मतदार समजला जाईल. एकवीस वर्षांहून कमी वयाचा, दिवाणी कोर्टाचा जज्ज, सहा महिन्यांहून जास्त शिक्षा झालेला, सनदा रद्द झालेला वकील व तुरुंगांतून सुटून पांच वर्षें न झालेला गृहस्थ यांना मत देतां येणार नाहीं.

बोर्डाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या नेमणुका सभासदांनींच करावयाच्या आहेत. कामाची व्यवस्था पाहाण्याकरितां एक स्टॅन्डिंग कमिटी नेमितात. चीफ ऑफिसर, हेल्थ ऑफिसर, इंजिनियर वगैरे अधिकारी सरकारच्या मंजुरीनें नेमितात. त्यांच्या पगाराचा दोन तृतीयांश भाग सरकार देतें. सरकारी अधिकाऱ्यांचा जरूर तेव्हां बोर्डाला सल्ला घेतां येतो. निकृष्ट वर्गाचा सभासद निवडून न आल्यास त्या वर्गातील एक सभासद सरकार नेमील. सरकारनियुक्त सभासदांची संख्या एकचतुर्थांशापेक्षां जास्त असणार नाहीं. साधारण जिल्हाबोर्डाच्या सभासदांची संख्या २४ ते ४० असून तालुकाबोर्डाची १२ ते २० असते.

आतां यापुढें प्राथमिक शिक्षणाचा संपूर्ण ताबा लोकलबोर्डाकडे जाणार आहे. शिक्षणाची सक्ति करण्याचा अधिकार बोर्डाला मिळाला

आहे. बोर्ड दहापासून पंधरा लोकांचा एक स्कूलबोर्ड नेमील. या बोर्डाच्या मदतीला एक कार्यवाहक दिला जाईल. त्याला ऍडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर असें म्हणण्यांत येईल. याच्या मदतीला तपासणीकरितां व हजेरी पाहाण्याकरितां अधिकारी दिले जातील. एकंदर शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा दोनतृतीयांश खर्च सरकार झेंपील. बाकीच्या खर्चाची व्यवस्था लोकलबोर्डाला पाहावी लागेल.

लोकलबोर्ड व म्युन्सिपालिट्या या कार्यक्षम होतील तितक्या प्रमाणांत त्यांच्याकडे जबाबदाऱ्याही जास्त टाकण्याचा सरकारी कल आहे. मात्र त्या जबाबदारींतून पार पाडण्याकरितां लागणारा पैसा जमा करण्याची तयारी स्थानिक संस्थांनीं दाखविली पाहिजे. सरकार या कामीं शक्य ती मदत करण्यास तयार आहेच.

पाठ सत्तेचाळिसावा.

मजुरांचे संघ.

मुंबईसारख्या शहरांमध्यें धनिक लोकांनीं मोठाले धंदे सुरू केले आहेत. या धंद्यांपासून जो फायदा होतो तो भांडवलवाल्या लोकांना मिळतो. भांडवलवाले लोक श्रम न करितां अपरंपार फायदा मिळवितात परंतु गरीब मजूर लोकांची मात्र ते भरपूर काळजी घेत नाहींत. ती घेण्यास भाग पाडावें म्हणून मजूर लोक आपली संघटना करीत आहेत. पाश्चिमात्य देशांत मोठमोठाले मजूरसंघ अस्तित्वांत आले आहेत. आपल्या इकडेसुद्धां मजूर लोक आतां जागे होत आहेत. आज घटकेला आपल्या इलाख्यांत त्यांचे २३ संघ असून सभासदांची संख्या ५२ हजारांच्यावर गेली आहे.

मजूर म्हणजे निवळ हातापायांनीं काम करणारा अशिक्षित माणूस

अशी आपली समजूत आहे. ती चुकीची आहे. निव्वळ वेतन घेऊन आपली मालकी नसलेल्या धंद्यांमध्यें काम करणारा कोणताही मनुष्य असो, तो मजूरच समजला पाहिजे. गिरणीच्या कंपनीमध्यें एकही भाग (शेअर) नसेल तर स्वतःचा दरमहा पांचशें रुपये मिळविणारा गिरणीचा मॅनेजर हाही एक मजूरच आहे. बौद्धिक कामें करणारे लोक उघड उघड मजुरांस मिळत नाहींत याचें कारण ते थोडे असतात आणि त्यांच्या गरजा भागतील इतकें वेतन त्यांना मिळतें, म्हणून ते संतुष्ट असतात हें होय.

सध्यांची स्थिति अशी झाली आहे, कीं कांहीं थोड्या व्यक्ति श्रीमान् तर बहुजनसमाज अत्यंत दरिद्री. श्रीमंत लोकांचा स्वतःच्या संपत्तीवर हक्क आहे. ती त्यांनीं किंवा त्यांच्या पूर्वजांनीं उद्योगाच्या बळावर मिळविली आहे. तिचा उपभोग त्यांनींच घ्यावा. परंतु तिचा सट्टेबाजीमध्यें दुरुपयोग करून त्यांनीं गरीब लोकांना महागाईच्या किंवा अल्पवेतनाच्या मार्गानें नाडूं नये इतकी काळजी जनतेनें घेतली पाहिजे.

मजूर लोकांचा रोजमुरा अगोदर ठरविलेला असतो. धंद्यांत होणाऱ्या कमीअधिक नफ्याशीं त्यांचा कांहींएक संबंध नसतो. त्यामुळें त्यांना कामांत आपलेपणा वाटत नाहीं. जर मजुरांना कारखान्यामध्यें थोडा कां होईना पण मालकी-हक्क मिळाला तर किती तरी धनोत्पादक काम त्यांच्या हातून होईल. जनतेच्या सोयीसाठीं मजूरलोक खपत असतात. समाजावर संकट येतें तेव्हां हेच लोक समाजसंरक्षणासाठीं आपले प्राण देण्यास तयार होतात. म्हणून हे लोक यथाशक्ति काम करीत असतां त्यांच्या नैसर्गिक शक्तींचा विकास करितां येईल इतकें वेतन त्यांना मिळालेंच पाहिजे. दारू न पितां आपली नैतिक उन्नति करून त्यांना थोडे पैसे शिल्लक टाकितां आले पाहिजेत. हीच शिल्लक भांडवलांत गुंतली कीं, मजूरच भांडवलवाले होतील; आणि मजूर व भांडवलवाले यांमधील लढा नाहींसा होईल.

हल्लीं मजूर लोक आपली संघटना करीत आहेत. वेतनामधून-पैसे कापून ते उतारवयाकरितां आपली तजवीज करून ठेवीत आहेत. परंतु ह्यांतील बराच पैसा संपामध्यें उडत आहे. संप म्हणजे राष्ट्रावरील एक अरिष्टच होय. कामें बंद पाडून मालाची पैदास कमी झाल्यानें महर्गता होते. आणि मग भांडून जास्त मिळविलेलें वेतन न मिळाल्यासारखें होतें. संपाच्या वेळीं मजूर व कारखानदार यांमध्यें असलेला विरोध नाहींसा करण्याकरितां तडजोडमंडळें नेमण्याचा प्रघात पडला आहे. यांच्या हातून तंटा न मिटल्यास संप केला तर हरकत नाहीं. परंतु मजूरवर्गानें उठल्यासुटल्या संपाचा धाक घातल्यानें धनिक लोकांचेंच नव्हे पण साधारण लोकांचेंसुद्धां नुकसान होतें ही गोष्ट सर्वांनीं लक्षांत ठेविली पाहिजे.

पाठ अठ्ठेचाळिसावा.

राजेसाहेबांचा जाहीर संदेश.

आतांपर्यंत दिलेल्या पाठांमध्यें हिंदुस्तानची आजची स्थिति कशी आहे याचें साधारण खुलासेवार वर्णन झालें. आतां यापुढें होणारी सुधारणा हिंदी लोक व राज्यकर्ते यांच्यामधील सहकारितेवर अवलंबून राहाणारी आहे. हिंदी लोक मिळालेल्या अधिकारांचा चांगला उपयोग करून दाखवितील तर त्याचा परिणाम काय होईल याचा बरोबर खुलासा, आपले राजेसाहेब पांचवे जॉर्ज यांनीं इ. स. १९१९ च्या हिंदुस्तानविषयक सुधारणांच्या कायद्यावर सही केली त्यावेळीं त्यांनीं एक हिंदी जनतेला जाहीर संदेश पाठविला होता, त्यामध्यें पूर्णपणें केलेला आहे. त्यांतील कांहीं उतारे पुढें दिले आहेत.

"हिंदुस्तानच्या इतिहासांत आंज एका नवीन युगास आरंभ झाला आहे. हिंदुस्तानचा कारभार अधिक चांगल्या रीतीनें चालण्या-



पंचम जॉर्ज.

साठीं आणि हिंदुस्तानच्या लोकांचा अधिक संतोष होण्यासाठीं ब्रिटिश साम्राज्याच्या पार्लमेंटनें पास केलेल्या इतिहासप्रसिद्ध अशा महत्त्वाच्या कायद्यांत ज्याची गणना करतां येईल अशा ॲक्टास आम्हीं आमची बादशाही मंजुरी दिली आहे. नामदार ईस्ट इंडिया कंपनीच्या विद्यमानें कारभाराची व न्यायाची नियमित पद्धति स्थापण्यासाठीं सन १७७३ व १७८४ सालच्या ॲक्टांची योजना करण्यांत आली.

सन १८३३ च्या ॲक्टाच्या योगानें हिंदी लोकांस सरकारी नोकरीचें व हुद्यांचें द्वार खुलें करण्यांत आलें होतें. सन १८५८ च्या ॲक्टान्वयें हिंदुस्तानचा राज्यकारभार कंपनीकडून ब्रिटिश सरकारकडे गेला आणि लोकमताचा शिरकाव झालेला जो कारभार आज हिंदुस्तानांत अस्तित्वांत आहे त्याचा पाया या ॲक्टानें घातला. प्रातिनिधिक संस्थांचें बीज सन १८६१ च्या ॲक्टानें पेरलें आणि सन १९०९ च्या ॲक्टानें ह्या बीजांत चैतन्य उत्पन्न केलें. आतां जो ॲक्ट (कायदा) झाला आहे त्या ॲक्टान्वयें निवडलेल्या लोकांच्या प्रतिनिधींस राज्यकारभारांत एक निश्चित भाग देण्यांत आला आहे, आणि तो ॲक्ट भविष्यकाळीं पूर्ण जबाबदार राज्यपद्धति प्राप्त करून घेण्याचा मार्ग दर्शवीत आहे. आम्हांला पूर्ण भरंवसा आहे कीं, या ॲक्टावरून जें धोरण अमलांत येणार आहे त्या धोरणाचा हेतु जर सिद्धीस जाईल तर त्यानें मानवी प्रगतीच्या इतिहासांत महत्त्वाचे परिणाम घडून येतील आणि गतगोष्टींचा विचार करण्यास व भविष्यकाळाविषयीं आमच्या मनांत वसत असलेल्या आशांप्रमाणें आशा बाळगण्यास तुम्हांस आज आम्ही सांगणें हें समयोचित व वाजवी होणार आहे.....खरें म्हटलें असतां राजकीय जबाबदारीची इच्छा प्रादुर्भूत होण्याचें कारण हिंदुस्तानचा ब्रिटिश लोकांशीं आलेला संबंध हेंच होय.मानवी विचार व इतिहास यांचा अधिक खोल व विस्तृत असा अभ्यास हिंदुस्तानच्या लोकांना त्या संबंधामुळें करतां येऊं लागला. ह्या अभ्यासामुळें अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न होणें अनिवार्य आहे. तसें झालें नसतें तर हिंदुस्तानांतील ब्रिटिश लोकांचें काम अपुरें राहिलें असतें.....लोकांचे पुढारी—जे आतां दिवाण होणार-ते **खऱ्या स्वदेशभक्तीला पक्षभेदाच्या व जातिभेदाच्या मर्यादांची बाधा होत नसते,** हें लक्ष्यांत ठेवून देशाच्या हितासाठीं पुष्कळ झीज सोसतील.....असा आम्हांला भरंवसा आहे.

आमच्या सर्व प्रजेबरोबर आमची सर्व शक्तिमान् परमेश्वराजवळ अशी प्रार्थना आहे कीं, त्याच्या प्रेरणेमुळें व साहाय्यानें हिंदुस्तानची उत्तरोत्तर भरभराट होवो व त्यांतील लोकांस अधिकाधिक संतोष होवो आणि त्यांस **पूर्ण राजकीय स्वातंत्र्य** मिळो."

राष्ट्रगीत

भो परमेश्वर, करुणासागर, जगदीशा, ।
सकलशुभाकर देवा ॥ धृ० ॥

श्रीमज्जॉर्ज धराधिपतीतें। भव्यपथ सुखमय।
कर, दे अक्षय। आयुर्बल जय ॥१॥

सदया, अमुच्या बादशहाचें।
अरि निर्दालुन। कर संरक्षण। तूं रात्रंदिन ॥२॥

आंग्लभूमिचें, हिंदभूमिचें। नातें प्रेमल ।
मधुतर निर्मल। कर दृढबहुबल ॥३॥

राज्य जगत्संग्रहकारी हें। अनुपम सुखकर।
परिवर्धित कर। ह्या धरणीवर ॥४॥

समाप्त.

२५५७

REFBK-0002551